**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**राज्यात विशेषत : पुणे, नाशिक, औरगांबाद नगर जिल्ह्यात बिगर शेती (एन.ए) व जमिनींची महसूल आकारणी करताना झालेला घोटाळा**

**(१) * २२०८२ श्रीमती शोभाताई फडणवीस , श्री.संजय केळकर , श्री.विनोद तावडे , श्री.धनंजय मुंडे , श्री.चंद्रकांत पाटील , श्रीमती विद्या चव्हाण , श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत : पुणे, नाशिक, औरंगाबाद नगर जिल्ह्यात बिगर शेती (एन.ए) व जमिनींची महसूल आकारणी करताना ७५१ कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०११ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल विभागाच्या लेखा परिक्षणांत याबाबत ठपका ठेवण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व संबंधितांवर कोणती कारवाई केली, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री.प्रकाश सोळंके,श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (१), (२) व (३) महालेखापाल-१ मुंबई यांनी राज्यातील चार महसूल विभागीय कार्यालयाचे व सहा जिल्हाधिकारी कर्यालयांचे सन २००५ ते २०१० या वित्तीय वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षण करुन त्याबाबतचा प्रारुप परिच्छेद अहवाल माहे, सप्टेंबर, २०११ मध्ये शासनास सादर केला आहे. प्रारुप परिच्छेद सन २०१०-२०११ च्या महसूली जमा अहवालात अंतिमत: समाविष्ठ करण्यापूर्वी सदरहू प्रारुप परिच्छेदावर शासनाचे अभिप्राय/अहवाल मागविण्यात आले आहेत, प्रारुप परिच्छेद जमीन महसूल, शासकीय जमीनींचे वाटप व वापर फेरमुल्यांकन बिनशेती कर इ. विविध विषयासंदर्भातील असून राज्यातील संबंधितांवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महसूल विभागीय कार्यालयांकडून व सहा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अभिप्राय/ अहवाल प्राप्त करुन महालेखापाल-१ मुंबई यांचेकडे सहमती करीता पाठविण्यात आले आहेत. सहमती प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच अहमदनगर जिल्ह्यातील एका प्रकरणात प्रारुप परिच्छेद महालेखापाल-२, नागपूर यांच्याकडून प्राप्त झाला असून त्यावर सुध्दा माहिती सहमतीसाठी पाठविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने जी काही वस्तुस्थिती मांडली आहे, ती सर्व वस्तुस्थिती शासनाने जवळपास मान्य केली आहे. या प्रारुपाच्या अनुषंगाने विभागीय कार्यालयाकडून तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडून अभिप्राय आणि अहवाल मागितला आहे. महसुली आकारणी करताना कोणत्या चूका अधिकाऱ्यांकडून झाल्या आहेत ? एन.ए.प्रकरणामध्ये नियमाला धरुन हाताळणी केली गेली नाही हे खरे आहे काय ? बिल्डरांसाठी जाणुनबूजून चूका केल्या आहेत हेही खरे आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या ठिकाणी आक्षेप आलेले आहेत त्याचे साधारणत: स्वरुप आहे, त्याबाबतची मी माहिती देतो. सवलतीच्या दरात जमिनीचे वाटप करताना शासनाचे जे धोरण आहे, त्याचे काटेकोरपणे पालन केले आहे काय, ज्या प्रयोजनार्थ सवलतीच्या दरात शासकीय जमिनीचे वाटप केलेले आहे, त्या कारणासाठी ती जमीन वापरली आहे काय, जमिनीचे वाटप करण्याबद्दलच्या आदेशात अंतर्भूत केलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन केलेल्या प्रकरणात शर्तभंगाची कारवाई झाली आहे काय, सवलतीच्या दरात वाटप केलेल्या जमिनीच्या संदर्भात योग्य प्रकारे संनियंत्रण करण्यासाठी कोणती यंत्रणा कार्यरत आहे, जागेचा वापर भाडेपट्टा इत्यादी बाबत योग्य दर लावून त्याची वसुली करण्यात येत आहे काय असे ढोबळ मानाने आक्षेपांचे स्वरुप आहे. सभापती महोदय, २००५ मधील ५८ प्रकरणे आहेत. २००६ मधील ४० हजार ११प्रकरणे आहेत. २००७ मधील ४४ प्रकरणे आहेत. २००८ मधील १४१ प्रकरणे आहेत आणि २००९ मधील २९ प्रकरणे आहेत. प्रकरणांची संख्या खूप मोठी आहे. त्यामुळे जे आक्षेप घेण्यात आहेत, त्याबद्दल शासनाने सविस्तर अहवाल ए.जी.यांच्याकडे पाठविलेला आहे. त्या अहवालास अंतिम स्वरुप आल्यानंतर नेहमीच्या प्रथेप्रमाणे आपण तो विधिमंडळासमोर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२२०८२...

श्रीमती शोभा फडणवीस : प्रकरणे किती आहेत याच्याशी या सभागृहाचा काही संबंध नाही. अशी प्रकरणे दिवसेंदिवस वाढत चालली आहेत. याबाबतीत अधिकारी वारंवार चुका करीत आहेत. वारंवार चुका करणाऱ्या एखाद्या अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करुन त्यांनी नियमाप्रमाणे काम करावे अशा प्रकारचे आदेश शासनाच्या माध्यमातून देण्यात येतील काय ? अशी प्रकरणे नेहमी होत राहतील, त्याबाबतीत ए.जी.कडून तसेच आक्षेप घेतले जातील. शासकीय अधिकाऱ्यांनी वारंवार चुका करावयाच्या. ७५१ कोटी रुपयांचा फरक आलेला आहे. याबाबतीत फेरमूल्यांकन करुन फरकाची रक्कम संबंधित शासकीय अधिकाऱ्यांकडून वसूल केली जाणार आहे काय ? या बाबतीत वारंवार विचार करुन शासन त्याकडे दुर्लक्ष करीत असेल तर तुम्ही तहसीलदारांना आणि संबंधित अधिकाऱ्यांना पुन्हा भ्रष्टाचार करण्यास प्रवृत्त करीत आहात असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. म्हणून माझे स्पष्ट मत आहे की, अशा प्रकारच्या चुका वारंवार होऊ नयेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही करण्याचे ठरविले आहे ? यासंदर्भात कोणती नियमावली करण्याचे ठरविले आहे ? अशा प्रकरणामध्ये दोषी अधिकाऱ्यांविरध्द कारवाई करण्याचे नियम निश्चित केलेले आहेत. त्या नियमाप्रमाणे त्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : असे प्रकार होऊ नयेत म्हणून बऱ्यांच अंशी धोरणात्मक बदल आपल्याला करावे लागणार आहेत. धोरणात्मक बदल, कायद्यातील बदल आणि आपण म्हणता आहात त्याप्रमाणे नियंत्रण या तीन गोष्टींशी निगडीत हे प्रश्न आहेत. या संदर्भात धोरणात्मक बदल, कायद्याचे बदल करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. नियंत्रण करण्याच्या बाबतीत आपण सांगितल्या प्रमाणे एखाद्या प्रकरणात तो अधिकारी जबाबदार असेल तर त्या अधिकाऱ्याविरुध्द निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सदर कारवाई किती दिवसात करण्यात येईल ?

श्री. प्रकाश सोळंके : हा प्रारुप आक्षेप आहे. या आक्षेपांबद्दल राज्य शासनाकडून ए.जी.यांच्याकडे खुलासा पाठविलेला आहे. ए.जी. यांना खुलासा मान्य झाला तर ते खुलासा वगळतात. जर खुलासा समाधानकारक नसला तर ते अंतिम आक्षेप करतात. अंतिम आक्षेप आले तर त्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याची शासनाची भूमिका आहे. या प्रकरणासंदर्भात जे आक्षेप आलेले आहेत, त्यास शासनाकडून वेळेत खुलासे पाठविण्यात आले आहेत.

४...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२२०८२...

श्रीमती शोभा फडणवीस : ए.जी.यांच्याकडून अनेक वेळा अशा प्रकारचे आक्षेप आलेले आहेत. अशा पध्दतीचे अनेक आरोपही यापूर्वी झालेले आहेत. प्रारुप देखील तसेच झालेले आहेत. जिल्हाधिकारी आणि आयुक्तांच्या अहवालावर सुध्दा महालेखाकार समाधानी नव्हते. वर्षानुवर्षे असे प्रकार चालू आहेत आणि यापुढे देखील अशाच पध्दतीने चाललात तर महसुलामध्ये किती मोठया प्रमाणात आपण घट करीत आहात ही बाब आपल्या लक्षात येत नाही काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : साधारणत: कामकाजाची प्रोसीजर ठरलेली असते. ती प्रोसीजर सन्माननीय सदस्यांनी समजून घेतली पाहिजे. महालेखाकार हे राज्यातील निवडक जिल्हयातील निवडक प्रकरणांचे लेखा परीक्षण करीत असतात. लेखा परीक्षणामध्ये त्यांना जेथे जेथे त्रुटी आढळून येतात, ते आक्षेप नोंदवितात. आपल्यापुढे या प्रकरणासंबंधी आपल्यापुढे ए.जी.यांचे प्रारुप नोटिफिकेशन आलेले आहे. हा काही अंतिम अहवाल नाही. महालेखाकारांकडून हा प्रारुप अहवाल महसूल विभागाकडे पाठविला जातो. त्यांच्याकडून घेण्यात आलेल्या आक्षेपांवर महसूल विभागाकडून खुलासा पाठविण्यात येतो. त्यानंतर त्या आक्षेपांचा पुन्हा अभ्यास करुन त्यात ज्या काही त्रुटी असतात, त्यावर महालेखाकारांकडून निश्चित निर्णय घेतला जातो. महसूल विभागाकडून जे खुलासे पाठविले आहेत ते योग्य आहेत की अयोग्य आहेत यासंबंधी ते निर्णय घेतात. याबाबतीत ए.जी.यांनी प्रारुप अहवाल पाठविलेला आहे. त्याबाबतीत महसूल विभागाकडून महालेखाकारांकडे खुलासे पाठविण्यात आले आहेत. या बाबतीत ते आता अंतिम अहवाल देणार आहेत. अंतिम अहवाल आल्यानंतर तो विधिमंडळाच्या पटलावर ठेवला जातो. त्यानंतर ते आक्षेप विधिमंडळाच्या समिती समोर चर्चेला येत असतात असे साधारणत: प्रोसीजरचे स्वरुप आहे. वसुलीची कार्यवाही सुध्दा या प्रोसीजरमधून होत असते. यामध्ये भाडेपट्टा, नूतनीकरण अशा गोष्टी आहेत. शर्तभंग केला आहे, तसेच जमिनीचे प्रयोजन बदललेले आहे अशी काही प्रकरणे आहेत. यापुढे असे प्रकार होऊ नयेत म्हणून त्याबाबतीत कायम स्वरुपी उत्तर शोधले पाहिजे. यासंबंधी चांगली सिस्टीम असली पाहिजे. सिस्टीममधील जे काही दोष असतील ते दूर झाले पाहिजेत. एखाद्यास एखाद्या ठराविक प्रयोजनासाठी शासकीय जमीन दिली आणि त्याने त्या जमिनीचा वापर विशिष्ट काळात त्याच प्रयोजनासाठी करणे आवश्यक आहे. विशिष्ट कालावधीत त्या जमिनीचा वापर झाला नाही तर पुढची कार्यवाही होणे आवश्यक आहे. भाडेपट्टयाची वसुली होणे आवश्यक आहे. भाडेपट्टयाचे

५...

नुतनीकरण होणे आवश्यक आहे. आम्ही या सगळया बाबीसंदर्भातील कार्यवाही निश्चितपणे केलेली आहे. सन २००० मध्ये भाडयापट्टयाचे एक धोरण शासनाने स्वीकारले होते. परंतु याबाबतीत हायकोर्टाने स्टे आणल्यामुळे ते धोरण २००६ मध्ये रद्द करावे लागले. शासन भाडेपट्टयाचे नवीन धोरण लवकरच आणणार आहे. यामध्ये सगळयात मोठी अडचण अशी आहे की, कोणती शासकीय जमीन भाडेपट्टयाने दिली आहे, त्या जमिनीच्या भाडेपट्टयाच्या मुदती कधी संपतात, त्या जमिनी पूर्वी कशा पध्दतीने दिलेल्या आहेत, याच्यातील तरतुदी काय आहेत याचा डेटा बेस चांगल्या पध्दतीत आपल्याकडे उपलब्ध नाही. महाराष्ट्रातील सर्व शासकीय जमिनींचा डेटा बेस निर्माण करण्याच्या संदर्भातील निर्णय शासन घेत आहे. हा डेटा बेस संपूर्णपणे संगणक पध्दतीने उपलब्ध केला जाईल. यापुढे या गोष्टी अतिशय व्यवस्थितपणे होणार आहेत. या डेटा बेसचा उपयोग यातील जे काही दोष आहेत, ते दूर करण्यासाठी होणार आहे.

----------

६...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यात दुधाचे वारंवार भाव वाढ होत असल्यामुळे ग्राहक व दूध उत्पादक शेतकरी यांची फसवणूक होत असल्याबाबत

**(२) *  २२६०६       श्रीमती अलका देसाई , श्री.सुभाष चव्हाण , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.एम.एम.शेख , श्री.चरणसिंग सप्रा , प्रा.सुरेश नवले , डॉ.सुधीर तांबे , श्री.सतीश चव्हाण , श्री.माणिकराव ठाकरे , श्री.जयप्रकाश छाजेड :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुधाची वारंवार भाव वाढ होत असल्यामुळे ग्राहक व दूध उत्पादक शेतकरी यांची फसवणूक होत असल्यामुळे तसेच गरीब व सर्वसामान्य नागरिकांच्या लहान मुलांना दुधापासून वंचित रहावे लागत असल्याने त्यांच्यात तीव्र असंतोष पसरत असल्याचे माहे सप्टेंबर, २०११ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत असलेल्या दुधाच्या किंमती रोखण्याबाबत तसेच त्या स्थिर ठेवण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, ग्राहकांची व दूध उत्पादक शेतकरी यांची होणारी हानी रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गुलाबराव देवकर,श्री.मधुकरराव चव्हाण यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) राज्यातील दुधाच्या किंमती स्थिर ठेवण्यासाठी दूध उत्पादनात वाढ करणे, दूध संकलन करणाऱ्या प्राथमिक सहकारी संघाच्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. त्यासाठी विभागामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना हाती घेतलेल्या आहेत.

१) दूध देणाऱ्या जनावरांच्या संख्येत वाढ करण्यासाठी मोठया प्रमाणात कृत्रिम रेतनाचा कार्यक्रम जे.के.ट्रस्ट या स्वयंसेवी संस्थेचा सहभाग घेऊन तसेच शासनामार्फत राबविण्यात येत आहे. यासाठी ११८५ केंद्र स्थापन करण्यात आली असून २ लक्ष कृत्रिम रेतने करण्यात आलेले आहेत.

२) कृत्रिम रेतनासाठी आवश्यक असलेल्या उच्च प्रतीच्या गोठीत रेतमात्रा उत्पादनासाठी वळू संगोपन केंद्राचे तसेच गोठीत रेतन प्रयोगशाळेचे बळकटीकरण करण्यात आलेले आहे.

७..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

३) राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत प्राथमिक सहकारी दूध उत्पादक संघांच्या प्रक्षेत्रावर विदर्भ, मराठवाडा व कोकण या विभागात ४६ एकात्मिक दुग्धविकास उपवन प्रकल्प उभारण्यासाठी रु. २१.६० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे व त्या अंतर्गत प्रकल्प उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

४) सहकारी दूध संघांची साठवणूक क्षमता वाढविण्यासाठी, शेतकऱ्यांना प्रशिक्षण, दुधाची ने-आण करण्याकरिता साहीत्य तसेच दुग्धशाळा उभारण्यासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून पहिल्या टप्प्यात १७ दूध संघांचे रु. ५३.८३ कोटीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, गेल्या सहा महिन्यामध्ये सहा वेळा दुधाच्या भावात वाढ झाली आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22606....... श्रीमती अलका देसाई....

महाराष्ट्र हे कृषीप्रधान राज्य आहे असे म्हटले जाते. असे असताना या राज्यात दुधाचा दुष्काळ का पहावयास मिळतो? 45 ते 50 रुपये दराने ग्राहकांना दूध विकले जाते आणि यावर संशोधन केले जात आहे असे उत्तर देण्यात आले आहे. स्वयंसेवी संस्थांचा सहभाग घेण्यात आला आहे असेही उत्तरामध्ये नमूद केले आहे. शासनामार्फत कृत्रिम जनावरांची पैदास करण्याचे काम सुरु आहे. तहान लागल्यानंतर विहीर खोदण्याचा हा प्रकार आहे. धवल क्रांती त्यावेळच्या नेतृत्वांनी केली. कै.बाळासाहेब सावंत यांचे प्रामुख्याने नाव घ्यावे लागेल. महाराष्ट्रामध्ये गरीब आणि श्रीमंत लोकांना सातत्याने दूध पुरवठा करण्यासाठी त्यांनी योजना राबविली. त्या योजनेचे काय झाले? महानंदा आणि आरे या शासकीय दूध डेअरीमध्ये दुधाचा दुष्काळ का पडला? तेथील अधिकाऱ्यांची कार्यक्षमता कमी झाली आहे काय? या शासकीय डेअऱ्यांमध्ये संशोधन होण्याची गरज आहे, ते काम होत नाही तोपर्यंत सामान्य माणसाला दुधापासून वंचित रहावे लागणार आहे. शासन या बाबत कोणती पावले उचलणार आहे?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, गेल्या सहा महिन्यात पाच ते सहा वेळा दूध दरामध्ये वाढ केली असे माननीय सदस्यांनी म्हटले आहे. गेल्या वर्षभरात दूध दरामध्ये वाढ केली याची कारणे म्हणजे दुधाच्या उत्पादनाचा खर्च वाढल्यानंतर दूध उत्पादक शेतकऱ्यांना दुधाच्या दरात वाढ करुन द्यावी लागली. दरामध्ये वाढ करुन दिली तरच दूध उत्पादक शेतकरी राज्यामध्ये दुधाचा पुरवठा करु शकतात. त्यासाठी गेल्या वर्षभरात दोनदा दुधाच्या दरामध्ये वाढ केलेली आहे. गेल्या दोन वर्षात दुधाचा शॉर्टेज निर्माण झाला. त्या दृष्टीने राज्य सरकारचे प्रयत्न सुरु आहेत, योग्य ती पावले विभागाच्या माध्यमातून उचलली जात आहेत. त्यामध्ये पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास विभागांच्या माध्यमातून विविध प्रकारच्या योजना राबविण्याचे काम केलेले आहे. प्रामुख्याने कृत्रिम रेतन तयार करण्याचा धडक कार्यक्रम गेल्या वर्षापासून सुरु केला आहे. जवळपास 4856 पशु वैद्यकीय दवाखान्यांच्या माध्यमातून दरवर्षी 20 लाख कृत्रिम रेतन तयार करण्याचे काम केले. जे.के.ट्रस्टला एजन्सी देण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून कामे करीत आहोत. अनेक योजना राबवित असताना पशु संवर्धनासाठी कामधेनू दत्तक योजना राबवून चांगल्या दर्जाची जनावरे ग्रामीण भागात तयार करण्यास सुरुवात केली आहे. जेणेकरुन राज्यात चांगल्या जातीच्या गाईची पैदास वाढली पाहिजे आणि त्या माध्यमातून दूध उत्पादन वाढले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.गुलाबराव देवकर..... ता.प्र.क्र.22606....

पशुधनाला भेडसावणाऱ्या विविध रोगाचे निर्मूलन केले पाहिजे या दृष्टीने एक कार्यक्रम राबविला आहे. आपल्या राज्यात पूर्वीच्या काळात मोठया प्रमाणात जनावरांमध्ये रोगाचा प्रादुर्भाव होत होता. त्यासाठी गेल्या दोन-तीन वर्षापासून अनेक प्रकारच्या उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली आहे. अनेक गाई-म्हशींना रोगापासून मुक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. सकस चाऱ्याचे उत्पादन वाढविण्यासाठी काही पावले उचलण्याचे काम केले आहे. राज्यात 76 टक्के हिरव्या चाऱ्याची कमतरता आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदय लेखी माहिती वाचून दाखवित आहेत. विचारण्यात आलेला प्रश्न आणि मंत्री महोदयांचे उत्तर यामध्ये तफावत वेगळे आहे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, दूधाचे दर का वाढतात हे सांगण्याचा मी प्रयत्न करीत आहे. गेल्या दोन वर्षात दूध उत्पादकांच्या खर्चामध्ये वाढ झाली म्हणून गेल्या वर्षात दोनदा दरामध्ये वाढ केली. त्याला पर्याय नव्हता. दुधाचे उत्पादन वाढवावयाचे असेल तर शेतकऱ्यांना मदत करण्याची आवश्यकता आहे. दूध उत्पादक शेतक-यांना मदत करण्याची आवश्यकता आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, कृत्रिम रेतन तयार करणे हा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे. जे.के.प्रतिष्ठान या उपक्रमामध्ये सहभागी झाले आहे. त्यांच्या सहभागाने ही योजना शासन राबवित आहे. अशा प्रकारचा सहभाग इतर स्वयंसेवी संस्था देत असतील तर त्यांना योजनेमध्ये सहभागी करुन घेतले जाईल काय? त्याचे निकष काय आहेत?

श्री.गुलाबराव देवकर : या बाबतीत निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, जे.के.प्रतिष्ठानला कोणत्या आधारे सहभागी करुन घेण्यात आले? निविदा मागविण्यात आल्या होत्या काय? निकष काय आहेत?

श्री.गुलाबराव देवकर : या संदर्भात टेंडर मागविले होते. ज्या संस्था सहभागी होतील त्यांनी बँक गॅरंटी द्यायची होती. जे.के.प्रतिष्ठानने बँक गॅरंटी दिली असून त्यांच्या कामाचा अनुभव, कामाची व्याप्ती लक्षात घेऊन चांगल्या क्वॉलिटीचे काम झाले पाहिजे असा विचार करुन पारदर्शकपणे निर्णय घेण्यात आला आहे. त्यांनी राज्यामध्ये जे काही काम सुरु केले आहे ते योग्य पध्दतीने चालले आहे.

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22606.........

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, गेल्या पाच वर्षात किती वेळा दुधाचे दर वाढविण्यात आले? अंतर्गत प्रकल्प उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे असे म्हटले आहे. हा अंतिम टप्पा केव्हा पूर्ण होईल? त्याची निश्चित तारीख सांगण्यात येईल काय?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, दुधाच्या दरवाढीबाबत मी सभागृहाला सांगू इच्छितो की, पूर्वी गाईच्या दुधाचा दर प्रती लीटर रु.12.05 आणि म्हशीच्या दुधाचा दर प्रती लीटर रु.16.20 इतका होता. 1.1.2010 नंतर 1.4.2010 रोजी दरामध्ये वाढ केली होती. त्यानंतर 16.2.2011 रोजी व 1.9.2011 रोजी दुधाच्या दरामध्ये वाढ करण्यात आली. प्रकल्पाचे काम येत्या चार सहा महिन्यात ताबडतोबीने पूर्ण करणार आहोत. त्याबाबत सातत्याने पाठपुरावा सुरु आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, संगोपन केंद्राच्या वाढीसाठी शासनाने प्रयोगशाळा बळकटीकरण केले म्हणजे नक्की काय केले, याचा खुलासा मंत्री महोदय करतील काय? एकात्मिक दुग्धविकास उपवन प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला असून तो मराठवाडा आणि कोकण या भागामध्ये राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी 21.60 कोटी रुपयांचा निधी दिला आहे. त्या निधीतून कोकणामध्ये किती प्रकल्प सुरु केले?

नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 22607....

श्री. रामनाथ मोते....

या प्रकल्पासांठी एकंदर किती निधी देण्यात आलेला आहे व कोकणामध्ये एकंदर किती प्रकल्प सुरु करण्यात आले व त्यासाठी किती निधी देण्यात आलेला आहे ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, एकात्मिक दूध विकास उप वन प्रकल्प राबविण्याचा प्रयोग गेल्यावर्षी मराठवाडयात सुरु करण्यात आला होता. जवळपास 8 जिल्हयामध्ये हा प्राथमिक प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून या वर्षी मराठवाडा, विदर्भ व कोकण या तीन विभागातील प्रत्येक जिल्हयात दोन या प्रमाणे एकंदर 46 उप वन प्रकल्प राबविले जात आहेत. एका उप वन प्रकल्पाची किंमत 48 लक्ष रुपये राहणार आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, दुधाची भाव वाढ प्रचंड प्रमाणात होत आहे. मुंबईमध्ये आरे डेअरीच्या माध्यमातून दुधाची चांगली वितरण व्यवस्था होती व त्यामुळे दुधाच्या भाववाढीवर नियंत्रण होत असे तसेच ग्राहकांना भेसळ नसलेले दूध मिळत होते. मुंबईतील आरे डेअरी मधून रोज 8-10 लिटर दुधाचे वितरण होत होते. परंतु आज मुंबईतील ग्राहकांना 30 ते 40 रुपये लिटर या दराने दूध ध्यावे लागत आहे व त्यातील अर्धी किंमत सुध्दा शेतक-याला मिळत नाही तसेच ग्राहकावरही दूध दरवाढीचा बोजा पडतो आहे. त्यामुळे मुंबईतील आरे व्यवस्था सुधारण्यासाठी शासनाकडून काही प्रयत्न केले जाणार आहेत की, आरे डेअरी मोडीत काढावयाचे काम केले जाणार आहे ? आता दुधाच्या व्यवसायातील मध्यस्थांचाच फायदा बघितला जातो परंतु ग्राहकांचा व शेतक-याचा फायदा अजिबात बघितला जात नाही. त्यामुळे ग्राहक व शेतक-यांचा फायदा बघणारी व्यवस्था शासना मार्फत सुरु केली जाणार आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मुंबईमध्ये अनेक वर्षापासून आरे डेअरी मार्फत दुधाचा पुरवठा केला जात होता. परंतु गेल्या 5-7 वर्षापासून दुधाच्या व्यवसायामध्ये मोठया प्रमाणात स्पर्धा सुरु झालेली आहे. खाजगी व्यावसायिक, सहकारी संस्थाच्या माध्यमातून दुधाच्या व्यवसायामध्ये आता स्पर्धा निर्माण झालेली आहे. शासनाच्या माध्यमातून आपण दुधाचे भाव वाढविण्याचा प्रयत्न केला तर ताबडतोबीने सहकारी संस्था व खाजगी व्यावसायिक दुधाचे दर वाढवतात. त्यामुळे दूध व्यवसायातील स्पर्धेत टिकण्यासाठी राज्य सरकारची यंत्रणा निश्चितपणे कमी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MMP/ D/ प्रथम श्री. भोगले.... 11:20

ता.प्र.क्र. 22607....

श्री. गुलाबराव देवकर ....

पडत आहे ही वस्तुस्थिती आहे. त्याचा परिणाम म्हणून आरे डेअरीतून आता दुधाचे उत्पादन कमी प्रमाणात होत आहे. दुधाच्या उत्पादनात वाढ व्हावी यासाठी विभागामार्फत प्रयत्न केले जात आहेत. एनडीबीच्या माध्यमातून एक प्रस्ताव विभागाकडे सादर झालेला असून त्यांनी आपले एक युनिट चालवावयास देण्याची मागणी केली असून त्या युनिट मधून 8 ते 10 लक्ष लिटर दुधाची निर्मिती केली जाणार आहे. या सर्वांमुळे आरेच्या डेअरीचे दूध वाढेल व मुंबईतील नागरिकांना दुधाचा पुरवठा आपल्याला चांगल्या प्रकारे करता येईल. दुधाच्या व्यवसायात वाढ करण्यासाठी राज्य शासनाकडे दोन तीन प्रस्ताव आलेले असून त्यासंदर्भात विचार विनिमय केला जात आहे.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुण्यातील पानशेत धरणफुटीतील पूरग्रस्त लोकांना जागांची मालकी हक्क देण्याबाबत**

**(३) * २२५१४ श्रीमती दिप्ती चवधरी , प्रा.सुरेश नवले , श्रीमती अलका देसाई , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.सुभाष चव्हाण , डॉ.निलम गोऱ्हे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील पानशेत धरणफुटीतील पूरग्रस्तांचे कसबा, पर्वती, कोथरूड, बिबवेवाडी, सहकारनगर, महर्षीनगर, पर्वतीदर्शन, शिवदर्शन, गोखलेनगर भागात पुर्नवसन करण्यात आल्यानंतर त्यांना देण्यात आलेल्या जागांची मालकी या भागातील लोकांना देण्यात आली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०११ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रश्नाबाबत लोकप्रतिनिधी यांनी विधीमंडळात मागणी करूनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुण्यातील पानशेत धरणफुटीतील पूरग्रस्तांचे कसबा, पर्वती, कोथरूड, बिबवेवाडी, सहकारनगर, महर्षीनगर, पर्वतीदर्शन, शिवदर्शन, गोखलेनगर भागात पुर्नवसन करण्यात आल्यानंतर त्यांना देण्यात आलेल्या जागांची मालकी या भागातील लोकांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, पुण्यातील पानशेत धरणफुटीतील पूरग्रस्तांना देण्यात आलेली जागा मालकी हक्क न देण्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके,डॉ.पतंगराव कदम यांचे करिता** : (१) नाही.

(२) नाही.

(३) याबाबत तहसीलदार पुणे शहर यांनी फिल्ड रजिस्टरच्या उताऱ्यावर ज्यांनी पूर्णपणे रक्कम भरलेली आहे अशा पूरग्रस्तांची नावे प्रॉपर्टी कार्डावर दाखल करणेकामी नगर भूमापन अधिकारी, पुणे यांना कळविले असून त्यांची नावे प्रॉपर्टी कार्डावर दाखल झालेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, पुण्याचे पानशेत धरण फुटून ५० वर्षे उलटून गेलेली आहेत. ५० वर्षापूर्वी पानशेत धरणाच्या पुरामुळे ज्यांची घरे वाहून गेली त्यातील काही कुटुंबाना अजूनही न्याय मिळालेला नाही ही खेदाची बाब आहे. सन २००८ साली पूरग्रस्तांची मालकी हक्काची होण्याबाबत सभागृहात लक्ष वेधी सूचनेच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळेच्या तत्कालीन मंत्र्यांनी यासंदर्भात बैठक घेऊन पूरग्रस्तांच्या प्रश्नाची सोडवणूक केली जाईल असे आश्वासन सभागृहात दिले होते. त्यानुसार पुणे येथे संबंधित अधिका-यांची बैठक घेऊन पूरग्रस्तांची घरे त्यांच्या नावावर करण्याच्या संदर्भात सीटी सर्व्हे विभागाला आदेश देण्यात आले होते. यामध्ये काही लोकांची घरे त्यांच्या नावावर झाली होती परंतु अजूनही कसबा, पर्वती, कोथरुड व बिबेवाडी येथील पूरग्रस्तांची घरे त्यांच्या नावावर मालकी हक्काने झालेली नाहीत. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, हे अधिवेशन संपल्यानंतर



अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.२२,५१४...**

श्रीमती दिप्ती चवधरी ...
तातडीने संबंधित अधिका-यांची बैठक घेऊन राहिलेल्या पूरग्रस्तांची घरे त्यांना मालकी हक्काने त्यांच्या नावावर करुन दिली जाणार आहे काय, तसेच अनेक वर्षाचा प्रलंबित प्रश्न कायमचा संपवला जाणार आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, १२ जुलै, १९६१ मध्ये पानशेत धरण फुटून पुण्यामध्ये पूर आला होता. यामध्ये पूरग्रस्तांची ३९८८ बाधित कुटुंबे होती त्यांचे ८ वसाहतीमध्ये पुनर्वसन करण्याचे काम १९७६ मध्ये करण्यात आलेले होते. ३९८८ बाधित कुटुंबाना मालकी हक्काने गाळे देण्याचा प्रश्न होता परंतु यापैकी ३१४२ गाळे धारकांनी मालकी हक्काची रक्कम भरुन गाळे मालकी हक्काने करुन घेतली आहेत. आता केवळ ६७७ पूरग्रस्तांचाच प्रश्न राहिला असून यामध्ये मुदत वाढवून देण्याचा प्रश्न मुख्यत्वे आहे. या प्रश्नाच्या संदर्भात जिल्हाधिकारी पुणे यांनी सातत्याने बैठका घेतल्या असून त्यांनी आयुक्तांच्या मार्फत एक प्रस्ताव शासनाकडे पाठविला असून या प्रस्तावावरील कार्यवाही ३ महिन्यात पूर्ण करुन हा प्रश्न कायम स्वरुपी सोडविला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

-----

**ता.प्र.क्र. / २२,३५५**

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जळगांव जिल्हयातील अवैध वाळू उपसाबाबत**

**(५) * २२९८७ प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे , डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात गिरणा नदी पात्रातील माहे सप्टेंबर, २०११ पासून वाळू माफियांनी मोठया प्रमाणात अवैध वाळू वाहतूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, गिरणा नदी पात्रातील माहे सप्टेंबर, महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात १० ट्रॅक्टर चालकांना पोलीस उपअधिक्षक श्री. प्रकाश गायकवाड यांनी रंगेहाथ पकडले, हे ही खरे आहे काय,

(३) अद्यापही अवैध वाळू वाहतूक सर्रासपणे सुरु आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास संबंधितावर काय कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे

(५) अद्याप, कारवाई झाली नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत?

**श्री. प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांचे करिता :** (१) व (२) माहे सप्टेंबर, २०११ मध्ये वाळू रेतीचे अवैध उत्खनन / वाहतूक करताना १० ट्रॅकवर चालकांना पकडण्यात आले, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) संबंधितांकडून ८ ट्रॅक्टर ट्रॉली व १५ ब्रास रेतीसाठा ताब्यात घेवून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. १ आरोपी फरार असून सदर गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा. दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये तिस-या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे असे देण्यात आलेले आहे. आजही जळगाव जिल्हयात गिरणा, तापी नदी पात्रात वाळू माफियांनी मोठया प्रमाणात अवैध वाहतूक सर्रासपणे सुरु ठेवलेली आहे. नैसर्गिक साधन संपत्तीची अक्षरश: लूट करुन ओरबडण्याचा उद्योग सुरु केला आहे. गौण खनिज म्हणून महसूल वसुलीसाठी ठेके दिले जातात. अटी व शर्थी नुसार लांबी, रुंदी व उंचीनुसार वाळू किती काढावयाची हे ठरवून दिले जाते. नदी पात्रातून किती वेळ व किती मर्यादे पर्यंत उपसा केला पाहिजे हे सुध्दा ठरवले जाते. सूर्योदय व सूर्यास्तापूर्वी वाळू उपसा करण्यात यावा असे नियम असतांनाही चोवीस तास वाळू उपसा केला जात आहे. क्षमतेपेक्षा बेकायदा जास्त प्रमाणात भरलेले ट्रक, डंपर, ट्रॅक्टर रेतीची वाहतूक करीत असतात. या वाहतुकीमुळे रस्ते खराब होतात व दुरुस्तीसाठी शासनास पुन्हा खर्च करावा लागतो. ठेक्याच्या मर्यादेपेक्षा १५ ते २० पटीने वाळू उपसा जास्त होतो व त्यामुळे महसुली घाटा, पर्यावरणाचा ऱ्हास होतो आहे. महसूल आणि पोलीस खात्याकडूनच वाळू उपशाला संरक्षण दिले जात असल्यामुळे निर्माण झालेल्या वाळू माफियांच्या टोळया, टोळी युध्द,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : २२९८७ ..**

प्रा. दिलीपराव सोनवणे....

हल्ले, मारामाऱ्या खून होत आहेत. त्यामुळे वाळू उपशाच्या धोरणाचे काटेकार पालन होण्याठी माझा प्रश्न असा आहे की, वाळूची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी वाळूचे धोरण, कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यासाठी निश्चित धोरण आखून कार्यवाही केली जाणार आहे काय, वाळूला पर्याय म्हणून दगडाचा वापर करुन, नवीन टेक्नॉलॉजीचा वापर करुन कृत्रीम वाळू तयार करण्याचा विचार केला जाणार आहे काय ? कृत्रिम वाळू करण्यासाठी शासनाकडून प्रोत्साहन दिले जाणार आहे काय ? वाळू माफियांचा बंदोबस्त करुन अवैध वाळूच्या उपशाबाबत शासन कठोर कारवाई करणार आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, जळगाव जिल्हयातील अवैध वाळू उपशाच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. गिरणा नदी पात्राच्या लिलावाचे एकूण ८८ गट असून यापैकी ६८ लिलाव न झालेले गट आहेत. यामध्ये ग्रामपंचायतीने संमती दिली नव्हती. या ठिकाणी केवळ १५ गटांचेच लिलाव झाले असून त्या ठिकाणावरुनच वाळूचा उपसा केला जात आहे. एप्रिल २०११ पर्यंत ९९४ अवैध वाहतूक प्रकरणांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22987.....

श्री.प्रकाश सोळंके.....

80 लाख 3 हजार 223 रूपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच 23 गुन्हे दाखल झाले आहेत. माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या निदेशानुसारच आपण धोरण ठरविले आहे. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी सुरू आहे. अजूनही मुख्य प्रश्न येत आहे. आम्हाला ग्रामपंचायतीची अजूनही परवानगी मिळत नाही. त्यांचा असा हेतू असतो की, अवैध वाळूची वाहतूक व्हावी. ग्रामपंचायतीची परवानगी मिळाल्याशिवाय काटेकोरपणे वाळूचा लिलाव होणार नाही. त्यामुळे अशा प्रकरणांची संख्या वाढणार आहे. त्यामुळे यासंबंधी पुढे नेमके कोणते धोरण घ्यावे लागेल याचा सुद्धा विचार करावा लागणार आहे. दगडपासून कृत्रिम वाळू तयार करण्यासंबंधी शासनाच्या माध्यमातून प्रोत्साहन दिले पाहिजे अशा प्रकारचा दुसरा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे. सदर बाब ही शासनाच्या विचाराधीन आहे. यासंबंधी लवकरावत लवकर निर्णय घेतला जाईल.

........

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे सुकळी आणि मुंगी (ता.धारूर, जि.बीड) येथील गुणवत्ती प्रकल्पात संपादित केलेल्या प्रकल्पग्रस्तांना मावेजा देण्यात आला नसल्याबाबत**

**(6) * 22295 श्रीमती उषाताई दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.सतीश चव्हाण , श्री.विक्रम काळे** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे सुकळी आणि मुंगी (ता.धारूर, जि.बीड) येथील गुणवत्ती प्रकल्पात संपादित केलेल्या प्रकल्पग्रस्तांना 18 वर्षाचा कालावधी ओलांडूनही अद्याप मावेजा देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(3) तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मावेजाची रक्कम देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश सोळंके,श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (1), (2), (3) व (4) हे खरे नाही. गुणवत्ती प्रकल्पासाठीच्या मौजे सुकळी येथील 6 व मौजे मुंगी येथील 2 अशा भूसंपादनाच्या एकूण 8 प्रकरणांपैकी 7 प्रकरणे ही सन 2002 पूर्वीची असून या सर्व प्रकरणी भूसंपादनाचा संपूर्ण मावेजा संबंधितांना अदा करण्यात आलेला आहे. मौजे सुकळी येथील उर्वरीत एक प्रकरण हे सन 2009 मधील असून प्रकरणी अंतिम निवाडा जाहिर करण्यात आला आहे व प्रकरणी संबंधीतांना मावेजा वाटप करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर सुरु आहे.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, मौजे सुकळी आणि मुंगी येथील जमीन संपादित करून गुणवत्ती प्रकल्प करण्यात आला आहे. सदर जमिनीचा मावेजा अद्याप मिळाला नाही असा मी प्रश्न विचारला आहे. त्यास सुरूवातीला हे खरे नाही असे उत्तर देण्यात आले असून लेखी उत्तराच्या शेवटी एका प्रकरणास अद्याप मावेजा देण्यात आलेला आहे असे देखील नमूद केले आहे. जमीन संपादित केल्यानंतर मावेजा देण्यासंबंधीची कार्यवाही मध्ये सुरू करण्यात आली आहे. तेव्हा ही कार्यवाही कधी पूर्ण होणार आहे व संबंधितांना मावेजा कधी देणार आहे ? पूर्वीच्या 15 प्रकरणांमध्ये न्यायालयाने निवडा दिलेला आहे. या प्रकरणामध्ये एकरी 42 हजार रूपये वाढीव मावेजा न्यायालयाच्या निदेशाप्रमाणे देणे बाकी आहे, तो कधी देणार आहात ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, एका प्रकरणाचा सन 2009 साली निवाडा झाला आहे. मौजे तपोवन येथील जमिनीच्या संबंधातील हा निवडा आहे. कॅनॉलच्या कामासाठी ही जमीन संपादित करण्यात आली आहे. मूळ धरण जेथे बांधले गेले तेथील जमिनीचा मावेजा देण्याचे काम पूर्ण झालेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे कलम 18 चे काही दावे न्यायालयात प्रलंबित होते. त्याचे निर्णय झालेले आहेत. शासनाकडे 37 भूसंदर्भाच्या प्रकरणातील कलम 18 चे दावे निकालात काढण्यासाठी 3 कोटी 6 लक्ष 20 हजार 618 रूपयांचे प्रस्ताव आले आहेत. त्यामुळे शासनाच्या माध्यमातून लवकरात लवकर निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे. 37 प्रकरणे जिल्हाधिकारी स्तरावर न्यायालयीन निवाड्याकरिता प्रलंबित आहेत. सदर निवाडे तातडीने निकालात काढून त्यासंबंधीचे प्रस्ताव शासनाकडे तातडीने पाठवून द्यावेत अशा प्रकारच्या सूचना त्यांना केल्या आहेत.

ॲड्.उषा दराडे : सभापती महोदय, येथे सांगण्यात आले की, शासनाकडे काही प्रस्ताव आले असून 3 कोटी रूपये देणे बाकी आहे. सदर रक्कम मार्च महिन्याच्या आत दिली जाईल काय ? जिल्हाधिकारी पातळीवर निवाडा झाल्यानंतर कुठलाही निवाडा करावयाचा नसतो. फक्त मागणी करावी लागते. ती मागणी एक महिन्याच्या आत केली जाईल काय आणि या मार्चच्या आत त्याचेही पैसे दिले जातील काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, दिनांक 15.7.2011 रोजी 37 भूसंदर्भ प्रकरणांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडून 3 कोटी 6 लक्ष 20 हजार 618 रूपयांची मागणी करण्यात आली आहे. सदर निधीच्या मागणी संबंधात कार्यवाही सुरू आहे. एक महिन्याच्या आत सदर प्रकरणे शासनाकडे मागविली जातील.

...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्ससेनेट व पारंपारिक मच्छीमार यांच्यामधील वाद**

**(7) * 22785 श्री.परशुराम उपरकर , श्री.किसनचंद तनवाणी** : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्ससेनेट व पारंपारिक मच्छीमार यांच्यामध्ये वाद पेटून पारंपारिक छोट्या मच्छीमारांनी दिनांक 5 ऑक्टोबर, 2011 रोजी वा त्यासुमारास 5 वाव (नॉटिकल माईल्स) मध्ये मासेमारी करणारे 3 पर्ससेनेट धारकांना पकडून उपआयुक्त, बंदर विभागाच्या ताब्यात दिले, हे खरे आहे काय,

(2) सदर 3 पर्ससेनेट धारकांवरती बंदर विभाग व मत्स्यविभाग यांच्याकडून कोणती कारवाई अगर गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(3) असल्यास, गुन्हा अगर कारवाई झाली नसल्यास, त्यांची कारणे काय आहेत,

(4) असल्यास, पकडलेल्या तिन्ही मच्छीमारी नौका या एनसीडीसी योजनेअंतर्गत कर्ज घेतले, हे खरे आहे काय,

(5) असल्यास, एनसीडीसी योजनेअंतर्गत टॉलर फिशिंग करतांना केंद्र सरकारकडून वित्तीय सहाय घेतलेल्या नौकांवर कर्ज पूर्ण फेड करण्यापूर्वी पर्ससेनेट परवानगी देण्याकरिता केंद्र शासनाच्या नियमामध्ये बदल करण्याबाबत अभिलेख्यात नोंद आहे काय, त्या अभिलेख्याचा तपशील काय आहे,

(6) अशा प्रकारे पर्ससेनेटद्वारे मच्छीमारी करणाऱ्या मच्छीमाऱ्यांनी धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणी केली आहे काय,

(7) अद्याप, नोंदणी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.मधुकरराव चव्हाण यांच्याकरिता** : (1), (2) व (3) दिनांक 5 ऑक्टोबर, 2011 रोजी 3 पर्ससेनेटधारक व पारंपारिक मच्छीमार यांच्यामध्ये वाद झाला असून पर्ससीन नौकाधारकांकडे महाराष्ट्र सागरी नियमन अधिनियम 1981 अंतर्गत आवश्यक कागदपत्रे असल्याने त्यांच्यावर कारवाई करता आली नाही. मात्र याबाबतचा अहवाल पोलीस स्टेशन व तहसिलदार यांना सादर केला आहे.

(4) 3 पैकी 2 नौकाधारकांनी एनसीडीसी अंतर्गत कर्ज घेतले आहे.

(5), (6) व (7) याबाबत नियमात तरतूद नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22785....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दृष्टीने हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे. पर्सनेट व पारंपरिक मच्छीमार यांच्यामधील वाद हा सर्वश्रूत आहे. शासनाचे लेखी उत्तर पाहिल्यानंतर शासनाची हतबलता दिसून येते. मी आपले लक्ष लेखी उत्तराच्या क्र.4,5,6,7 कडे वेधत आहे. तिसऱ्या उत्तरामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, 3 पैकी 2 नौकाधारकांनी एनसीडीसी अंतर्गत कर्ज घेतले आहे. पाच, सहा, सात च्या प्रश्नासंबंधी असे उत्तर देण्यात आले आहे की, या बाबत नियमात तरतूद नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही. एनसीडीसी अंतर्गत ज्या नौकाधारकांनी कर्ज घेतले असेल त्यांच्यावर कारवाई होत नाही. येथे मुख्य प्रश्न असा आहे की, शासन नियमात तरतूद करणार आहे काय ? यासंबंधी अनेक मिटींग झालेल्या आहेत. माननीय पालकमंत्र्यांनी देखील हा वाद मिटविण्यासाठी बैठक बोलावली होती. तरी देखील काहीही झाले नाही. तेव्हा शासन नियमात तरतूद करणार काय, असा माझा प्रश्न आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणारे जे व्यावसायिक आहेत त्यांच्यावर, नियमांचे उल्लंघन करून पर्सनेट धारक मच्छीमार अतिक्रमण करीत आहेत. त्यामुळे या दोघांमध्ये सातत्याने संघर्ष होतो ही गोष्ट देखील तितकीच खरी आहे. 1981 साली कायदा करण्यात आला. त्यानंतर 1987 साली कायद्यात सुधारणा करण्यात आली व नंतर परिपत्रक काढण्यात आले. याला रत्नागिरीमधील एका माणसाने कोर्टात आव्हान दिले व त्यानुसार हायकोर्टाने निर्णय दिला. त्या निर्णयाचा आधार घेऊन पाच वावच्या आत पर्सनेटधारक फिशिंग करतात. त्यांना अटकाव करण्यास अधिकारी टाळाटाळ करतात. सन 2004 मध्ये आम्ही सुप्रीम कोर्टामध्ये गेलो आहोत. सुप्रीम कोर्टात शासनाचे म्हणणे लवकर मांडण्यासाठी आम्ही कमिटी स्थापन केली आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतर त्याबाबत अंतिम निर्णय होईल.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मच्छीमारांच्या दृष्टीने हा प्रश्न खरोखरच गंभीर आहे. गेली अनेक वर्षे यासंबंधी वाद सुरू आहे. सदर वाद आता सुप्रीम कोर्टात गेला आहे. याबाबतचा निर्णय लवकर लावण्यासाठी शासन टाळाटाळ का करीत आहे ? 4 ते 6 महिन्यात सुप्रीम कोर्टा समोर जाऊन मच्छीमारांच्या वतीने शासन म्हणणे मांडणार आहे, अशा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22785.....

श्री.राजन तेली.....

आशयाचे आश्वासन शासन देणार आहे काय ? गोवा आणि केरळ येथील पर्सनेट धारक सिंधुदुर्ग येथे मोठ्या प्रमाणावर मच्छीमारी करण्यासाठी येतात. तसेच लोकल पर्सनेट मच्छीमार धारक हा देखील वाद आहे. तथापि, आपल्या येथील ज्या गस्ती नौका आहेत त्या काहीच काम करीत नाही. तेव्हा गस्ती नौका अजून प्रभावी करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे. कारण मच्छीमारांना तात्पुरता दंड केला जातो व नंतर सोडून दिले जाते. सिंधदुर्ग जिल्ह्यातील 38 हजार कुटुंबे यावर अवलंबून आहेत. त्यामुळे हा वाद कायमस्वरूपी मिटविण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे. तसेच बाहेरच्या गोवा, केरळ राज्यातून येणारे पर्सनेटधारक मच्छीमार आहेत, त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी शासन कोणती यंत्रणा राबविणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, जून महिन्यापासून ते 15 ऑगस्टपर्यंत म्हणजे पावसाळ्यात मच्छीमारी आपण बंद ठेवतो. त्यावेळी परराज्यातील होड्या व बोटी मोठ्या प्रमाणावर येऊन मासेमारी करत होत्या. त्यावेळी आपल्या अधिकाऱ्यांचे गस्ती नौका नसल्यामुळे काही करता येत नाही असे सांगणे होते. यंदा आपण आपल्या विभागामार्फत दुरूस्ती केली आहे. यंदा आपण वर्षाचे 12 महिने गस्ती नौका घेण्याची परवानगी दिल्यामुळे होडी व बोटी ह्या बंदीच्या काळामध्ये येत नव्हत्या. परराज्यातील पर्सनेटधारक मच्छीमार येत असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. कारण प्रत्येक राज्याची सागरी हद्द ठरलेली आहे. ती ओलांडून ते येथे आले व महाराष्ट्र राज्याच्या मत्स्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या विरूद्ध कारवाई केली नाही व ही बाब पुराव्यानिशी सिद्ध झाली तर ........

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 22785...

श्री. भास्करराव जाधव...

तर मी आजच सभागृहाला आश्वासित करतो की, यामध्ये आमच्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी चाल ढकल केली तर कायद्यातील तरतुदीनुसार त्यांच्यावर कारवाई केली जाईल आतापर्यन्त त्यांच्याकडील मच्छी घेतली जात होती आणि चौपट दंड आकारुन त्यांना सोडले जात होते. आता तसे न करता ते आपल्या सागरी हद्दीमध्ये एक, दोन, तीन वेळा आल्यानंतर त्यांचा परवाना रद्द करुन त्यांची बोट कायम आपल्या राज्याच्या ताब्यात ठेवण्याची कठोर शिक्षेची तरतूद कायद्यात केली आहे. त्याची अंमलबजावणी आमच्या विभागाच्या अधिकाऱ्यांकडून केली जात नसेल तर निश्चितपणे संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल. या बाबतीत कुणाचाही मुलाहिजा राखला जाणार नाही. दुसरे असे की, सुप्रीम कोर्टामध्ये इतक्या दिवसापासून हे प्रकरण प्रलंबित आहे. त्याला अंतिम मुदत देऊन त्या प्रकरणाचा निपटारा करणार काय, किंवा सुप्रीम कोर्टामध्ये स्टेटमेंट सबमिट करणार काय ? असा प्रश्न विचारला आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, फेब्रुवारी महिन्यामध्ये या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सुप्रीम कोर्टामध्ये शासनाचे म्हणणे मांडले जाईल आणि निश्चितपणे पारंपारीक पध्दतीने मत्स्य व्यवसाय करणाऱ्या लोकांना दिलासा देण्यासाठी त्या संदर्भात पुढाकार घेतला जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आणि माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पारंपरीक मासेमारी करणाऱ्या लोकांच्या उदरनिर्वाहाचा, त्यांचे घर चालण्याच्या दृष्टीने महत्वाचा असलेला प्रश्न उपस्थित केला. या ठिकाणी मंत्री महोदय उत्तर देतांना म्हणाले की, हे प्रकरण हायकोर्टामधून सुप्रीम कोर्टामध्ये गेल्यानंतर त्या ठिकाणी हायकोर्टाच्या निर्णयाला आपण स्टे मागितला होता कां, सुप्रीम कोर्टाकडून तो स्टे मिळाला काय, असेल तर त्यादृष्टीने आपण पुढील कारवाई केली आहे काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. विनोद तावडे हे विरोधी पक्षनेते होणार असल्याचे समजल्यावरुन मी कालपासून त्यांचे अभिनंदन करण्यासाठी सारखा फोन करण्याचा प्रयत्न करीत आहे परंतु ते माझा फोन घेत नाहीत. मला त्यांना सांगितले पाहिजे की, आम्ही सुप्रीम कोर्टाकडे स्टे मागितला होता परंतु या क्षणापर्यन्त सुप्रीम कोर्टाकडून हायकोर्टाच्या निर्णयाला स्टे मिळालेला नाही.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांच्या अभिनंदनाला स्टे नाही.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सांगली जिल्ह्यात माहे जुलै-ऑगस्ट, २०११ मध्ये कृष्णा व वारणा नद्यांना आलेल्या पुरामुळे कुटुंबाचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान**

**(८) * २२०१२ श्री.रमेश शेंडगे , श्री.हेमंत टकले , श्रीमती उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात माहे जुलै-ऑगस्ट, २०११ मध्ये वा त्यादरम्यान कृष्णा व वारणा नद्यांना आलेल्या पुरामुळे १ लाख २१ हजार कुटुंबाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे सप्टेंबर, २०११ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसानग्रस्त कुटुंबांना आर्थिक मदत देणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच मदत केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, छापील प्रश्नामध्ये "पुरामुळे १ लाख २१ हजार कुटुंबाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले" असे म्हटले आहे. याठिकाणी मुद्रण दोष असू शकेल, त्या ऐवजी "१ हजार २१ कुटुबांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले" अशी दुरुस्ती केली पाहिजे. सदरच्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी "नाही" असे उत्तर दिले आहे. तेव्हा आपण या उत्तरामध्ये सुधारणा करणार आहात काय? नसेल तर सांगली जिल्ह्यात त्या दरम्यान काहीच झाले नाही असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय? जर झाले नसेल तर जिल्हाधिकारी कशाचा पंचनामा करीत आहेत? आमच्या सांगली शहरामध्ये मगरमच्छ कॉलनीमधील १९० कुटुंबांचे स्थलांतर झाले आहे, सूर्यवंशी, इनामदार पार्कींग येथील १२० कुटुंबांचे स्थलांतर करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे पालकमंत्री माननीय डॉ. पतंगराव कदम यांच्या मतदारसंघामध्ये पलूस तालुक्यातील भिलवडी वांगी येथे ९५ कुटुंबे स्थलांतरित झाली आहेत. आंदणवाडीतील ४१ कुटुंबे, ब्रम्हनाळ येथील २ कुटुंबे या सर्व कुटुंबांचे स्थलांतर कशासाठी केले आहे? पूर आल्यानंतर त्यांचे काहीही नुकसान झालेले नाही असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय? नसेल तर आपल्याला उत्तरामध्ये सुधारणा करावयाची आहे काय?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये सुधारणा करण्याची अजिबात गरज नाही. "माहे जुलै-ऑगस्ट २०११ मध्ये वा त्या दरम्यान कृष्णा व वारणा नद्यांना आलेल्या पुरामुळे १ लाख २१ हजार कुटुंबाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले" असे प्रश्नामध्ये म्हटले आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याला "नाही" असे उत्तर दिले आहे. परंतु सांगली जिल्ह्यामध्ये कृष्णा आणि कोयना या नद्यांना दिनांक ४ व ५

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके.... ता.प्र.क्र. २२०१२....

सप्टेंबर २०११ रोजी पूर आल्यामुळे सांगली शहरातील १४० कुटुंबे आणि पलूस तालुक्यातील १३ गावामधील २५२ कुटुंबाना, वाळवा तालुक्यातील ४ गावातील ४० कुटुंबे अशी एकूण १७ गावातील ४३२ कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलविले होते. त्यामध्ये साधारणत: पूलावरील धोका पातळी आणि इशारा पातळी या दोन गोष्टी लक्षात घेऊन त्यांना दोन दिवस सुरक्षितस्थळी हलविले होते व त्या ठिकाणी त्यांची निवासाची आणि जेवणाची व्यवस्था केली होती. दोन दिवसानंतर त्यांना त्यांच्या घरी पाठविण्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर त्यांना आपापल्या घरी पाठविले आहे.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, मला खरोखरच आश्चर्य वाटते की, राज्यातील जनतेच्या जीवनमरणाचा हा प्रश्न मांडण्यासाठी आम्ही या सभागृहामध्ये उपस्थित असतो. आमच्या प्रश्नांना शब्दांचे खेळ, अक्षरांचे खेळ करुन आपण "नाही" असे उत्तर देऊ लागल्यास आम्हाला खरोखरच आश्चर्य वाटेल. त्या ठिकाणी रात्री-अपरात्री पूराचे पाणी घरामध्ये शिरते, लोकांचे जीव जाण्याची वेळ येते, त्या तळमळीने आम्ही या ठिकाणी प्रश्न मांडीत असतो त्याला शासनाकडे "नाही" असे उत्तर मिळते. सभापती महोदय, कर्नाटकमधील अलमट्टी धरणाचा प्रॉब्लेम असल्यामुळे हा पूर येतो. पाण्याचा विसर्ग झाल्यामुळे आणि मोठया प्रमाणात पाऊस पडल्यानंतर कृष्णा आणि कोयना या दोन नद्यांना नेहमी पूर येत असतो. हा त्रास त्या शहराला कायमचा झालेला आहे. या लोकांचे कायम पुनर्वसन करुन त्यांना धोक्याच्या रेषेमधून बाहेर काढण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय?

श्री. प्रकाश सोळंके :सभापती महोदय,सप्टेंबरच्या पहिल्या आठवडयात पूर आला होता त्यामुळे बऱ्याच ठिकाणी धोक्याची परिस्थिती निर्माण झाली होती म्हणून ४३२ कुटुंबांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले होते व त्या ठिकाणी दोन दिवस त्यांची जेवणाची व निवासाची व्यवस्था करण्यात आली होती. पुराची पातळी कमी झाल्यानंतर त्यांना आपापल्या घरी परत पाठविण्यात आले. परंतु सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे पूर पातळीच्या जवळ कायम स्वरुपी लोक रहातात. खरे म्हणजे पूराच्या पातळीच्या आतमध्ये लोकांनी रहाता कामा नये. परंतु ते रहात असल्यामुळे फार गंभीर प्रश्न झाला आहे. हा केवळ सांगली किंवा कोल्हापूर जिल्ह्यापुरता मर्यादित प्रश्न नाही तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये हा गंभीर प्रश्न झाला आहे. त्याकरिता फार मोठया निधीची आवश्यकता लागणार आहे. त्यामुळे जसजसा निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे आम्ही कामे सुरु करणार आहोत.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यातील शासकीय आश्रमशाळा व शासकीय वसतिगृहांना सन २०१०-११ या वर्षात सॅनिटरी नॅपकिन पुरवठ्याबाबत

**(९) * २३२४१ डॉ.दिपक सावंत , श्री.परशुराम उपरकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय आश्रमशाळा व शासकीय वसतिगृहांना सन २०१०-११ या वर्षात सॅनिटरी नॅपकिन पुरवठ्याचे अंदाजे रु.१ कोटी ७१ लाख १९ हजार रक्कमेचे कंत्राट भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता सह. संघ मर्यादित, मुंबई या संस्थेला देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेला कंत्राटाच्या रक्कमेपैकी किती रक्कम मार्च, २०११ अखेरपर्यंत देण्यात आलेली आहे,

(३) सदर संस्थेकडून किती सॅनिटरी नॅपकिनचा पुरवठा करण्यात आला व त्यांचे वाटप आश्रमशाळा व वसतिगृहांना जिल्हानिहाय कशाप्रकारे करण्यात आले आहे ?

**श्री. सचिन अहिर,श्री.शिवाजीराव मोघे यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाहीत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाहीत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, प्रश्नाच्या छापील उत्तरामध्ये मंत्री महोदयांना काही सुधारणा करावयाची आहे काय?

श्री. सचिन अहिर : नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी दिनांक १७.३.२०११ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक १३७५० मध्ये "राज्यातील आश्रमशाळांमधील मुलींसाठी सॅनिटरी नॅपकीन खरेदी करण्यात आले काय?" अशा प्रकारचा प्रश्न विचारला होता. त्या प्रश्नाला आदिवासी विकास मंत्री माननीय श्री. बबनराव पाचपुते यांनी उत्तर दिले होते. आज या ठिकाणी सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्र्यांनी उत्तर दिले आहे. याकरिता माझा असा प्रश्न आहे की, हा प्रश्न सामाजिक न्याय विभागाकडे कसा डायव्हर्ट झाला?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सामाजिक न्याय विभागाला प्रश्न विचारल्यामुळे तो याठिकाणी उपस्थित झालेला आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी हा प्रश्न सामाजिक न्याय विभागाला विचारलेला नाही. हवे असल्यास आपण याची तपासणी करु शकता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ D/

ता.प्र.क्र. २३२४१....

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी राज्यातील शासकीय आश्रमशाळेसंबंधी प्रश्न विचारला असल्यामुळे तो सामाजिक न्याय विभागाकडे गेला आहे.

**उपसभापती** : हा प्रश्न सामाजिक न्याय विभागाचा असून संबंधित माननीय मंत्री सभागृहामध्ये उपस्थित राहू शकणार नाहीत असे त्यांनी मला लेखी कळविले आहे. त्यांच्याऐवजी माननीय राज्यमंत्री या प्रश्नाचे उत्तर देणार आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा आदिवासी विकास विभागाला प्रश्न आहे की, हा त्यांच्या विभागाचा प्रश्न असल्यामुळे तो सामाजिक न्याय विभागाकडे कसा डायव्हर्ट झाला? मी या संदर्भात माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविली असून आदिवासी विकास विभागाने ती माहिती मला सादर केली आहे. त्यामध्ये सन २०११ मधील विविध वस्तूंचा पुरवठा यामध्ये शासकीय आश्रमशाळेला पुरवठा केला आहे असे त्यामध्ये म्हटले आहे. तेव्हा मला या प्रश्नाच्या बाबतीत विशेष हक्कभंगाची सूचना द्यावी लागेल. पहिल्या प्रश्नाला उत्तर देतांना "हे खरे नाही" असे म्हटले आहे. आणि त्यानंतर "प्रश्न उद्‍भवत नाही" असे म्हटले आहे...

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, आदिवासी विभागाच्या आणि सामाजिक न्याय विभागाच्या अशा दोन प्रकारच्या शासकीय आश्रमशाळा राज्यामध्ये आहेत. माननीय सदस्यांनी प्रश्न विचारतांना "शासकीय आश्रमशाळा" असे म्हटले आहे. त्यामुळे हा प्रश्न सामाजिक न्याय विभागाकडे पाठविण्यात आला असून तो आमच्या विभागाकडे ट्रान्सफर झालेला नाही. आमच्या विभागाला जर त्यांना प्रश्न विचारावयाचा असेल तर त्यांनी प्रश्नामध्ये आदिवासी आश्रमशाळा असा उल्लेख करावा, त्यांच्या प्रश्नाला उत्तर देण्याची माझी तयारी आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माहितीच्या अधिकाराखाली मला मिळालेली माहिती आपणास वाचून दाखवितो. "शासकीय आश्रमशाळेची माहिती, यामध्ये शासकीय आश्रमशाळेला पुरवठा केलेला आहे हे मी आपणास वाचून दाखवितो. "माझे दिनांक १७.१२.२०१० रोजीचे पत्र होते( त्यामध्ये त्यांनी उत्तर देतांना असे म्हटले आहे की, "सॅनिटरी नॅपकीन शासकीय आश्रमशाळा पुरवठा आदेशाची रक्कम १ कोटी रुपये आहे."

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.23241 . . . .

डॉ.दीपक सावंत . . . .

शासकीय वसतीगृहे 71 लाख 19 हजार 228 असे एकूण 1 कोटी 71 लाख 19 हजार रुपये भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता संघ मर्यादित, शासन दर करारानुसार असे मला उत्तर दिलेले आहे. मग मी आज जो प्रश्न विचारलेला आहे, त्यामध्ये "प्रश्न उद्‌भवत नाही" असे उत्तर कसे देण्यात आले ? मला याबाबतीत हक्कभंगाचा प्रस्ताव आणावयाचा आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मुळामध्ये याबाबतीत तो अधिकार आपला आहे की, आपण कोणत्या विभागाकडे प्रश्न द्यावा. मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे जर शासकीय वसतीगृहाच्या संबंधात एखादा विषय असेल तर तो सामाजिक न्याय विभागाकडे पाठविला जातो. याठिकाणी जे प्रश्न उपस्थित केले आहेत, त्याबाबत उत्तरामध्ये "नाही" असे म्हटलेले असून याचा अर्थ असा की, सॅनिटरी नॅपकीनच्या बाबतीत पुरवठा हा कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने करीत नाही तर तेथील मुलींना डायरेक्ट प्रतिमहा 100 रुपये देतो. त्यामुळे याठिकाणी उत्तरामध्ये "हे खरे नाही" असे म्हटलेले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मला आता याबाबत उत्तर नको. समजा हा प्रश्न चुकीच्या विभागाकडे गेला असे म्हटले असले तरी याठिकाणी छापील उत्तरामध्ये "हे खरे नाही" असा उल्लेख कसा केला आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, तो अधिकार आपला आहे आणि आपण ते तपासून पाहू शकता.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी आपल्याकडे यासंबंधातील कागदपत्रे पाठवितो.

श्री.भास्कर जाधव (खाली बसून) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर घ्यावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय,प्रश्नाला न्याय मिळत नाही. गेल्या वेळेस सुध्दा सदरहू प्रश्न उपस्थित केल्यानंतर न्याय मिळाला नव्हता म्हणून परत प्रश्न विचारलेला आहे. अशा वेळी जर आपण आदिवासी आश्रमशाळेतील मुलींच्या बाबतीत असे करणार असाल तर ते चुकीचे आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जो प्रश्न विचारला आहे, तो प्रश्न तपासून कोणत्या विभागाकडे पाठवावयाचा याबाबत विधीमंडळाचा अधिकार आहे आणि ते त्यांनी ठरवावे. परंतु हा विषय कोणत्याही विभागाशी संबंधित असला तरी याठिकाणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाकडून जे उत्तर दिलेले आहे ते चुकीचे उत्तर आहे याबद्दल सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांच्याकडे पुरावा आहे. असे असताना खोटी उत्तरे देणे हे अतिशय वाईट आहे, चुकीचे आहे. त्यामुळे आपण संबंधित विभागाला निश्चितपणे समज द्यावयास पाहिजे आणि ते निश्चितपणे आपले काम आहे. राईट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून माहिती मिळत असेल आणि ती योग्य नसेल, आपले समाधान होत नसेल तर त्याला काय म्हणावयाचे?याला बेजबाबदारपणा म्हणावयाचा की माहिती लपवून ठेवण्यात येत आहे असे म्हणावयाचे ?

**उप सभापती** : मी यासंदर्भात योग्य ती कारवाई करण्यास सांगतो. सन्माननीय सदस्य पुढील प्रश्न विचारणार आहेत काय ?

डॉ.दीपक सावंत : मी प्रश्न विचारतो. कारण प्रश्नाला न्याय मिळाला पाहिजे ही महत्वाची गोष्ट आहे. तसेच माझी आपल्याला विनंती आहे की, सन्माननीय मंत्री श्री.बबनराव पाचपुते यांनी देखील यामध्ये कॉन्ट्रीब्युशन करावे.

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : सभापती महोदय, हा प्रश्न राखून ठेवावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, एकतर सभागृहामध्ये कामकाज होत नाही, याठिकाणी विचारलेल्या प्रश्नाला न्याय मिळत नाही. मी यासंदर्भात प्रश्न विचारीत आहे आणि त्यासाठी आपण थोडा वेळ वाढवून द्यावा अशी विनंती करतो. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे आश्रमशाळा व वसतीगृहातील मुलींसाठी साधारणपणे सॅनिटरी नॅपकीन 1 कोटी 71 लाख रुपयांचे खरेदी करण्यात आले. यासंदर्भात मागच्यावेळी प्रश्न उपस्थित केला असता, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये असे सांगितले होते की, "राष्ट्रीय उपभोक्ता संघाकडून ही खरेदी होत नाही. माझ्याकडे या संदर्भातील प्रोसीडींग सुध्दा आहे, ते आपण चेक करु शकता. माझा प्रश्न असा आहे की, ही खरेदी नेमकी कोणाकडून केली जाते ? दुसरा महत्वाचा प्रश्न असा आहे की, आपण प्रकल्प अधिकाऱ्यांना सॅनिटरी नॅपकीन खरेदी करण्याचे अधिकार दिलेले आहेत काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हा प्रश्न माझ्या विभागाशी संबंधित नसला तरी सॅनिटरी नॅपकीन हा विषय आश्रमशाळा आणि वसतीगृहे यांच्याशी संबंधित आहे.याच्या खरेदी बाबत पूर्वीची पध्दत वेगळी होती. आता आम्ही या संबंधातील खरेदी करण्याचा अधिकार प्रकल्प अधिकारी यांच्या लेव्हलला देण्याच्या बाबतीत विचार करीत आहोत आणि थोड्याच दिवसामध्ये त्या बाबतचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नोटीफीकेशन काढले जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा असा प्रश्न आहे की, अनेक आश्रमशाळांची पहाणी करीत असताना तेथील महिला पर्यवेक्षिका असतात, त्यांच्याकडून अशा प्रकारची माहिती मिळालेली आहे की, तेथील विद्यार्थीनींना सॅनिटरी नॅपकीन पुरविले जात नाहीत. दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की,ज्यावेळी प्रकल्प अधिकारी ते खरेदी करतात,त्यावेळी अव्वाच्यासव्वा भावाने खरेदी केले जातात ही बाब आमच्याही लक्षात आलेली आहे.त्यामुळे आपण या खरेदीसाठी नेमके किती पैसे वर्ग केले जातात आणि ते कोणाकडे वर्ग करण्यात येतात? तसेच प्रत्येक आश्रम शाळेतील मुलींच्या संख्येनुसार किती निधी दिला जातो ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हा विषय नाजूक आहे आणि या संदर्भात साधारणत: पाचवी, सहावी व सातवीच्या मुली ज्या हॉस्टेलमध्ये आणि ज्या आश्रमशाळेमध्ये आहेत, त्या मुलींना सॅनिटरी नॅपकीन पुरविण्यात येतात. त्यासाठी केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध होत असतो. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, याबाबतीत प्रकल्प अधिकाऱ्यांना अधिकार दिले पाहिजेत. आतापर्यंत याबाबतीत प्रकल्प अधिकाऱ्यांना अधिकार नव्हते. याबाबतीत सांगावयाचे तर आयुक्तांच्या लेव्हलला तीन कमिट्या आहेत आणि याच्या खरेदीचे दर सर्वत्र सारखे रहावेत यासाठी असे केले होते. परंतु जर प्राप्त परिस्थितीमध्ये पुरवठा कमी झाला तर अशा वेळी 7 दिवस किंवा 15 दिवसाच्या कालावधीमध्ये नॅपकीनची गरज भासली तर संबंधितांना स्थानिक बाजारपेठेतून ते खरेदी करण्याचा अधिकार दिलेला आहे. कारण त्याठिकाणी नॅपकीन असण्याची आावश्यकता आहे. यासंदर्भात अत्यंत स्पष्टपणे सूचना देण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी जर स्पेसिफीक एखाद्या आश्रमशाळेतील व्यवस्थेबाबत सांगितले तर त्याची चौकशी केली जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या विषयाच्या संबंधात माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले होते, त्यातील वाक्य वाचून दाखवितो.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना विनंती करतो की, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना प्रश्न विचारु द्यावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ठीक आहे.

श्रीमती शोभाताई फडणवीस : सभापती महोदय, मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की,

साधारणपणे एका मुलीसाठी किती खर्च केला जातो? तसेच याबाबतीत काही नियोजन केलेले आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हा प्रश्न माझ्यासमोर आताच उपस्थित झालेला आहे. मात्र मी सन्माननीय सदस्यांना यासंदर्भात जादा माहिती देईन.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी विनंती आहे. कारण मी याठिकाणी दुसऱ्या वेळेस प्रश्न उपस्थित केलेला आहे.परंतु याबाबत माहिती मिळत नाही.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, हा प्रश्न माझ्या विभागाचा नसल्याने आमच्याकडे आलेला नाही. त्यामुळे चर्चा झाली नाही. जर हा प्रश्न सामाजिक न्याय विभागाचा असेल तर आता माझ्याकडे जी माहिती आहे ती मी येथे सांगत आहे. यापेक्षा सन्माननीय सदस्यांना जास्त माहिती हवी असेल तर त्यांनी वेगळा प्रश्न विचारावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, मी सदरहू प्रश्न दुसऱ्यांदा विचारलेला आहे आणि त्यावर खूप पैसे खर्च होत असतात. पण विभागाच्या हलगर्जीपणा मुळे ......

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना सांगू इच्छितो की, हा प्रश्न संबंधित मंत्री महोदयांच्या विभागाशी संबंधित नाही हे त्यांनी सुरुवातीला आणि आताही स्पष्ट केले आहे. परंतु मध्यंतरामध्ये अशी मागणी झाली की, सदरहू प्रश्न राखून ठेवण्यात यावा. त्यावेळी आपण असे सांगितले की, आम्ही विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत, त्यामुळे हा प्रश्न राखून ठेऊ नये. म्हणून आपण या प्रश्नाच्या संदर्भातील उप प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. आता जर सन्माननीय आदिवासी विकास मंत्री श्री.बबनराव पाचपुते यांच्या विभागाशी संबंधित हा प्रश्न नसेल आणि ते त्यांना असलेल्या माहितीच्या अनुषंगाने उत्तरे देत असतील आणि ते जर आपल्याला पटत नसेल तर मग सन्माननीय सदस्यांनी पुन्हा नव्याने प्रश्न आणावा. परंतु आता सगळे झाल्यावर पुन्हा प्रश्न राखून ठेवावा ही सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे, ती मला योग्य वाटत नाही.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, राज्यातील शासकीय शाळा आणि वसतीगृहे यांच्या बाबतीत अनेक आणि गंभीर स्वरुपाच्या तक्रारी आहेत आणि ही बाब आपल्याला सर्वांना माहिती आहे आणि ते वर्तमानपत्रामधून देखील समोर आलेले आहे. परंतु हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे.



ता.प्र.क्र.23241 . . . .

श्री.सुभाष चव्हाण . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामुळे मला माननीय सामाजिक न्याय मंत्री महोदयांना स्पेसिफीक प्रश्न विचारावयाचा आहे की, येथील विद्यार्थ्यांना पौष्टीक आहार, इतर काही सुविधा देण्यासाठी काही तरतूद करण्यात आलेली आहे काय? असेल तर किती केलेली आहे? तसेच दुसरा मुद्दा सॅनिटरी नॅपकीनचा पुरवठा करण्याबाबतचा आहे. आजतागायत म्हणजे 2011-2012 या वर्षामध्ये किती रुपयांची सॅनेटरी नॅपकीन पुरविण्यात आली ? तसेच या वसतीगृहांमध्ये कोणत्या सुविधा ठेवलेल्या आहेत याचे माननीय सामाजिक न्याय मंत्री महोदयांनी विश्लेषण करावे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न विचारला आहे, त्याबाबत सांगावयाचे तर ही बाब खरी आहे की, आपण ज्यावेळी वसतीगृहांमध्ये सुख-सुविधांच्या अनुषंगाने पुरवठा करतो, त्यामध्ये आपल्याकडे आहाराच्या बाबतीत फार मोठ्या प्रमाणात तक्रारी आलेल्या आहेत. त्यामध्ये कधी-कधी 50 ग्रॅम तांदूळ किंवा 50 ग्रॅम भाजी वगैरे बाबत गोष्टी होत होत्या. पण आता सुधारणा करुन एक नवीन कन्सेप्ट ज्याला आपण "पोटभर जेवण"म्हणता येईल अशी एक संकल्पना राबविण्याचा विभागाचा निर्धार आहे आणि आम्ही याबाबतीत देखील लवकरात लवकर कार्यवाही सुरु करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार आहोत. एकूण 36 प्रकारच्या सोयीसुविधा आहेत आणि त्या देण्याच्या बाबतीत विभागाची तयारी आहे. मग त्यात सोलार इक्वीपमेंट असलेला हीटर असेल किंबहुना आपण 10 विद्यार्थ्यांच्या पाठिमागे एक संगणक देऊ शकतो काय? तसेच त्यांची व्हॅक्युइटी आणि कल्चरल ॲक्टीव्हीटीज् वाढविण्याच्या दृष्टीकोनातून काही करता येईल काय? तशा प्रकारचा प्रयत्न आपण करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी रकमेच्या बाबतीत दुसरा प्रश्न विचारला आहे की, आपण यासाठी किती निधी दिलेला आहे? या संबंधातील माहिती पटलावर ठेवली जाईल. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे आदिवासी विभागामध्ये त्यांची खरेदी-विक्री बाबत एक प्रक्रिया आहे. परंतु सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून 100 रुपये प्रतिमहा इतकी रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या हातामध्ये देण्याच्या बाबतीत आपला निर्णय आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे. माननीय आदिवासी विकास मंत्री श्री.बबनराव पाचपुते यांनी . . . .

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. याठिकाणी एकेका प्रश्नासाठी 20-20 मिनिटे दिली जात आहेत.



ता.प्र.क्र.23241 . . . .

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी विदर्भाच्याच प्रश्नाबाबत विचारत आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (खाली बसून) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य टाईम पास करतात . . . .

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, दिनांक 05 मे 2001 पासून आश्रमशाळेतील मुलींना सॅनिटरी नॅपकीन पुरविण्यात यावे असा आदेश काढला होता आणि त्यानुसार त्याचा पुरवठा केला जातो. परंतु या उत्तरामध्ये संदिग्धता आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते खरे आहे. त्यावेळी एकत्रितपणे खरेदी करण्यात येत नसल्यामुळे वेगवेगळया भागातून . . . .

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

डॉ.दीपक सावंत : मी सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांना सांगू इच्छितो की, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकतीचा मुद्दा उपस्थित करावयाचा नसतो.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, स्थानिक पातळीवर सॅनिटरी नॅपकीनची खरेदी केली जात होती. त्यामुळे सॅनिटरी नॅपकीनचा पुरवठा करताना थोड्या अडचणी निर्माण झाल्या होत्या.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 23241..

डॉ. दीपक सावंत..

गेल्या काही वर्षामध्ये यामध्ये सुसूत्रता आणण्यात आली. पुन्हा पी.ओ. लेव्हलवर खरेदी करण्यात येणार आहे असे या ठिकाणी सांगण्यात येत आहे. . .

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या प्रश्नाला मी जे पहिले उत्तर दिलेले आहे ते बरोबर आहे, त्या उत्तराला मी फर्म आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे तो बरोबर आहे. एकत्रित खरेदी करण्यात येत होती परंतु एखादी आश्रमशाळा बाजूला असेल आणि करण्यात आलेला पुरवठा संपत आला असेल किंवा संपला असेल तर सात दिवसासाठी खरेदी करण्याची परवानगी पी.ओ.ना दिलेली आहे. कारण हे नाहीत असे म्हणणे चुकीचे होणार आहे त्याबाबतीत गैरसोय व अडचण होऊ नये म्हणून तो मार्ग काढण्यात आलेला आहे अन्यथा सॅनिटरी नॅपकिनची पूर्ण खरेदी एका ठिकाणावरुन करण्यात येते.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ताडाळी (जि.चंद्रपूर) येथील प्रस्तावित धारिवाल वीज प्रकल्पामध्ये मुंबईच्या पुंज आर्यन कन्स्ट्रक्शन कंपनी आणि पहाडपूर कुलींग टॉवर कंपनीकडून रेतीच्या अवैध साठवणूकीबाबत**

**(10) * 22960 श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.एम.एम.शेख , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ताडाळी (जि.चंद्रपूर) येथील प्रस्तावित धारिवाल वीज प्रकल्पामध्ये मुंबईच्या पुंजआर्यन कन्स्ट्रक्शन कंपनी आणि पहाडपूर कुलींग टॉवर कंपनीकडून तब्बल 380 ब्रास रेतीचा अवैध साठवणूक केल्याप्रकरणी 12 लाख 16 हजाराचा दंड सात दिवसाच्या आत जमा न केल्यास कंपनीला सिल करण्याचे आदेश दिले असल्याचे माहे सप्टेंबर, 2011 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, महसूल विभागाकडून वरील दंडाची रक्कम वसूल केली आहे वा किती केली आहे,

(3) अद्याप, रक्कम वसूल केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (1) होय, हे खरे आहे.

(2) कंत्राटदार यांनी उपविभागीय अधिकारी, चंद्रपूर यांचेकडे अपील दाखल केले आहे.

(3) प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, आपण मला वेळ दिला त्याबद्दल मी आभारी आहे. यानंतर मी माझा उप प्रश्न विचारतो. आम्ही विदर्भातील आहोत. आम्ही काम झाले तरी आभार मानतो आणि नाही झाले तरी आभार मानतो. विदर्भात अधिवेशन घेतले तरी ठीक, प्रश्न चर्चेला आला तरी ठीक नाही आला तरी ठीक.

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यात अनेक नवीन उद्योग येत आहेत. तसेच जुने उद्योग सुध्दा आहेत. त्यांना बांधकामासाठी हजारो ब्रास रेती, मुरुम, माती व दगड लागतात व ते ठेकेदार व ट्रान्सपोर्ट कॉन्ट्रॅक्टरकडून कमी किंमतीत घेतात. या बाबतीत काही तक्रार असली तर ते ठेकेदार व सप्लायरचे नाव सांगतात. चंद्रपूर जिल्ह्यात धारिवाल वीज प्रकल्प हा मोठा प्रकल्प आलेला आहे. त्यांना ही माती, रेती व दगड लागतो. त्यांच्यावर जेव्हा या बाबतीत कारवाई झाली तेव्हा त्यांनी ठेकेदाराचे नाव सांगितले. तसेच बल्लारपूर इंडस्ट्रिजमध्ये 1500 करोडच्या नवीन प्रोजेक्टचे काम सुरु आहे. तेथील पोलीस स्टोशन अधिकारी ओंबासे हे त्यांच्या मुलाच्या नावाने स्वत: व्यवसाय

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 22960. .

श्री. जैनुद्दीन जव्हेरी. ..

करतात. अशा प्रकारे रेती, मुरुम व दगड विक्रीचे करोड रुपयाचे गैर मार्गाने काम करण्यात येत आहे. मी स्वत: पुराव्यासहीत अनेक तक्रारी करुन देखील शासनाने त्यावर कारवाई केलेली नाही. म्हणून मी या बाबतीत तक्रार केलेली आहे, ही गोष्ट खरी आहे काय? ज्या प्रमाणे नियमानुसार चोरी करणारा व चोरीचा माल घेणारा दोघेही दोषी असतात त्याप्रमाणे शासन संबंधित उद्योगावर कारवाई करणार काय?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, हा प्रश्न ताडाळी (जि.चंद्रपूर) येथील प्रस्तावित धारिवाल वीज प्रकल्पामध्ये मुंबईच्या पुंज आर्यन कन्स्ट्क्शन कंपनी आणि पहाडपूर कुलींग टॉवर कंपनीकडून रेतीची अवैध साठवणूक करण्याबाबतचा आहे. या दोघांकडे 380 ब्रास रेतीचा अवैध साठा आढळला आहे त्यामुळे त्यांना 12 लाख 16 हजार रुपयाचा दंड ठोठावण्यात आला आहे. त्याप्रमाणे कंत्राटदाराने दंडाची अर्धी रक्कम भरुन उप विभागीय अधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे अपील केले आहे. सदर अपीलाचा दिनांक 8/12/2011 रोजी निर्णय लागलेला असून तहसीलदाराने केलेली कारवाई योग्य असल्याचे त्यामध्ये म्हटलेले आहे. त्यांना पुढचे अपील करण्याची मुदत 60 दिवसांची आहे. 60 दिवसांमध्ये जर त्यांनी अपील केले नाही तर उरलेली रक्कम त्यांच्याकडून सक्तीने वसूल करण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या कंपनीला ज्या जागेचे लीज देण्यात आले होते त्या व्यतिरिक्त दुसऱ्या जागेतून त्यांनी रेती उचलल्यामुळे त्यांच्यावर हा दंड ठोठावण्यात आला होता, हे खरे आहे का? तसेच या कंपनीने या आधी सिमेंट व लोखंड चोरीचे घेतले होते अशा पध्दतीचे आरोप या कंपनीवर आहेत. म्हणून या कंपनीची चौकशी करुन कारवाई करण्यात येणार आहे का?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, अवैध 380 ब्रास रेतीचा साठा सापडला म्हणून त्याच्या विरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे. सिमेंट, लोखंड वगैरेच्या बाबतीत काही तक्रार असेल तर त्या बाबत स्वतंत्र चोकशी करता येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : माझा प्रश्न असा होता की, ज्या जागेचे लीज देण्यात आले होते तेथून रेती न घेता दुसऱ्या जागेवरुन रेती उचलली म्हणून त्याच्यावर कारवाई झालेली आहे हे खरे आहे काय?

..4..



SMT/ D/ D/ MMP/ KTG/ 12:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22960.....

श्री एस. क्यू. जमा : सर, मुझे भी एक प्रश्न पूछना है.

**उप सभापति** : एक माननीय सदस्य को प्रश्न पूछने की परमीशन दी तो फिर अनेक माननीय सदस्य प्रश्न पूछना शुरु कर देते हैं.

श्री एस. क्यू. जमा : सर, मेरा एक बहुत ही महत्वपूर्ण प्रश्न है. कृपया मुझे एक प्रश्न पूछने दीजिए.

श्री जैनुद्दीन जव्हेरी : सर, कृपया विदर्भ के माननीय सदस्यों को प्रश्न पूछने दीजिए.

**उप सभापति** : हम भी बाहर के नहीं हैं, हम भी तो महाराष्ट्र के ही हैं.

श्री एस. क्यू. जमा : सर, मेरा एक बहुत ही महत्वपूर्ण प्रश्न है. मेरा कहना है कि महाराष्ट्र के अंदर एक बहुत बड़ा रॅकेट चल रहा है. आपको भी मालूम है कि यहां पर बहुत बड़े माफिया हैं. इसलिए मेरा स्पेसिफिक प्रश्न है कि रिवेन्यु डिपार्टमेंट, पुलिस डिपार्टमेंट तथा अन्य डिपार्टमेंट्स को मिलाकर एक ऐसी एजेंसी सरकार को बनानी चाहिए जो दोषी लोगों पर कार्रवाई कर सके. यह लोग सेंड की करोड़ों रुपए की चोरी करते हैं और सिर्फ 22-4 लाख रुपए जुर्माना देकर छूट जाते हैं. इसलिए उनके ट्रक, ट्रेक्टर तथा दूसरी प्रापर्टी सील की जानी चाहिए. मुझे पूछना है कि सेंड की चोरी रोकने के लिए क्या सरकार एक विशेष कानून बनाएगी ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे.

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली,दुसरी,तिसरी,चौथी, पाचवी,सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी, अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी व पंधरावी यादी सभागृहासमोर ठेवणे.

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली,दुसरी,तिसरी,चौथी, पाचवी,सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी,अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी व पंधरावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली,दुसरी,तिसरी,चौथी, पाचवी,सहावी, सातवी, आठवी, नववी, दहावी,अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी व पंधरावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी )

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

प्रा. फौजिया खान ( अल्पसंख्यांक विकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मौलाना आजाद अल्पसंख्यांक आथिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई" यांचा सन 2005/006 सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

..7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. एस. क्यु. जमा ( समिती प्रमुख ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सदस्य अनुपस्थिती समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

सभापती महोदय, समितीची बैठक शुक्रवार, दिनांक 16 डिसेंबर, 2011 रोजी दुपारी 1.00 वाजता विधान भवन, नागपूर येथे झाली. या बैठकीमध्ये सर्वश्री राजेंद्र जैन, दिलीपराव देशमुख, श्रीमती उषाताई दराडे, वि.प.स. यांच्या रजेचे अर्ज विचारात घेण्यात आले.

श्री. राजेंद्र जैन वि.प.स. हे प्रकृती ठीक नसल्यामुळे पावसाळी सत्र कालावधीमध्ये दि. 25 जुलै ते 12 ऑगस्ट, 2011 पर्यंत एकूण 19 दिवस, श्री.दिलीपराव देशमुख, वि.प.स. हे प्रकृती ठीक नसल्यामुळे पावसाळी सत्र कालावधीमध्ये दि.25 जुलै ते 12 ऑगस्ट, 2011 पर्यंत एकूण 19 दिवस, श्रीमती उषाताई दराडे, वि.प.स. हया प्रकृती ठीक नसल्यामुळे पावसाळी सत्र कालावधीमध्ये दि. 25 जुलै ते 12 ऑगस्ट, 2011 पर्यंत एकूण 19 दिवस, विधानपरिषदेच्या बैठकीस अनुपस्थित असल्याने, त्यांनी केलेल्या अर्जावर समितीने विचार केला. तसेच विधानपरिषदेच्या बैठकींना अनुपस्थित राहण्यासंबंधी त्यांनी रजेच्या अर्जात दिलेली कारणे ग्राह्य धरुन त्यांना उपरोक्त कालावधीत विधानपरिषदेच्या बैठकींना अनुपस्थितीत राहण्याची अनुमती देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

समितीची शिफारस सभागृहाने संमत करावी असा प्रस्ताव मी मांडतो.

**उप सभापती** : सदस्य अनुपस्थिती समितीचा दुसरा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

समितीने सादर केलेल्या अहवालात सर्वश्री राजेंद्र जैन, दिलीपराव देशमुख, श्रीमती उषाताई दराडे, वि.प.स. यांना अहवालात उल्लेखिलेल्या कालावधीकरिता अनुपस्थित राहण्याची अनुमती देण्यात यावी, अशी शिफारस केली आहे. तरी अनुमती द्यावी काय? (थोडे थांबून) अनुमती देण्यात येत आहे. सदस्यांना तसे कळविण्यात येईल.

----

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : आज नियम 93 अन्वये ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, भगवान साळुंखे, विनोद तावडे, नागो पुंडलिक गाणार यांनी "3 ते 6 वर्षे वयोगटातील मुलांसाठी नर्सरी, प्ले ग्रुप, बालवाडी, शिशुवर्ग शिक्षणाच्या व शिकवणीच्या नावाखाली आर्थिक लूट केली जाणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी "महाराष्ट्रात ठाणे, नांदेड, नंदुरबार जिल्ह्यातील कुपोषणाचे व मृत्यूचे वाढत असलेले प्रमाण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते, भगवान साळुंखे यांनी "विदर्भातील आदिवासी आश्रमशाळा सलग एकाच पाळीत सुरु ठेवणे, शिक्षकांना वेतन 1 तारखेलाच मिळणे, नोव्हेंबर, 2005 पूर्वी नियुक्त शिक्षकांना जुनीच पेन्शन योजना लागू करणे, या मागण्यांबाबत शासनाचे झालेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "दक्षिण मुंबईतील जुन्या व जीर्ण झालेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी म्हाडाने परवानगी दिल्यानंतर अटी व शर्तीचा भंग करुन 33 प्रकरणांमध्ये विकासकांनी मोक्याच्या ठिकाणी असलेल्या सुमारे 133 कोटी रुपयांचे दीड लाख चौरस फूट इतके चटईक्षेत्र लाटणे, ही बाब निदर्शनास येऊन देखील गृहनिर्माण विभागाने कोणतीही कार्यवाही न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** ......

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता यांनी "अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांनी जनरेटर खरेदी प्रकरणात केलेल्या भ्रष्टाचाराबाबत कोणतीही कार्यवाही न करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नियम 93 अन्वये आलेल्या इतर सूचनांना दालनात अनुमती नाकारलेली आहे.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 1 पुढे ढकलण्याबाबत**

**उप सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत अनुक्रमांक 1 वर दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात यावी अशी विनंती सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी केलेली आहे. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे. यानंतर अनुक्रमांक 3 वरील लक्षवेधी सूचना प्रथम चर्चेला घेण्यात येईल.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

**पृ. शी.** : मुंबई महानगरपालिकेच्या तीन भ्रष्ट अधिकाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांची बेहिशोबी संपत्ती गोळा करणे

**मु. शी.** : मुंबई महानगरपालिकेच्या तीन भ्रष्ट अधिकाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांची बेहिशोबी संपत्ती गोळा करणे यासंबंधी सर्वश्री अनिल भोसले, हेमंत टकले, जयवंतराव जाधव, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अनिल भोसले ( पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई महानगरपालिकेच्या जकात खात्यामधील तीन भ्रष्ट अधिकारी सर्वश्री रवींद्र तेंडुलकर (मुख्य लिपिक), रमेश आरोटे (उप कर निर्धारक) आणि रुपकुमार दुसाने (उप दक्षता अधिकारी) यांनी लाचलुचपत आणि भ्रष्ट मार्गाचा अवलंब करुन कोट्यावधी बेहिशोबी संपत्ती गोळा करणे, या अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट कारभारामुळे महापालिकेचा करोडो रुपयांचा महसूल बुडून अधिकाऱ्यांची मात्र आर्थिक भरभराट होणे, गैरमार्गाने मिळविलेल्या पैशातून त्यांनी अलिबाग, जिल्हा रायगड येथे मालमत्ता खरेदी करणे, वरिष्ठांची दिशाभूल करुन हे तीनही अधिकारी एकाच ठिकाणी अनेक वर्षे कार्यरत असणे, लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभाग प्रमुख व शासनाकडे आजतागायत वारंवार तक्रारी करुनही त्याकडे झालेले व होत असलेले दुर्लक्ष, संबंधितांवर चौकशी करुन कठोर कारवाई करण्याची नितांत गरज, याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, या ठिकाणी जे निवेदन आलेले आहे त्यामध्ये श्री. रमेश आरोटे नावाचा जो कर्मचारी/अधिकारी आहे त्याचे वेतन थांबविण्यात आले होते का ? जकात खात्यातून जेव्हा त्याच्यावर आरोप सिध्द झाले त्यावेळी त्यांना प्रमोशन देण्यात आले होते का ? रायगडला त्यांनी काही जमीन घेतली आणि जमीन घेत असताना शेतकरी असल्याचे असत्य दाखले दिले, हे खरे आहे का ? चौकशी अधिकारी श्री. जलोटा आहेत त्यांनी या सर्व अहवालाचा अभ्यास केल्यानंतर ते निर्दोष आहेत असे सांगितले, पुरावे नाहीत असे सांगितले. श्री. जलोटा नावाच्या ज्या अधिकाऱ्याने त्यांना प्रमोशन दिले त्यांचा यामध्ये काही सहभाग आहे का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न विचारले. यामध्ये श्री. आरोटे नावाचे जे अधिकारी आहेत यांचे इन्क्रिमेंट वगैरे थांबविले होते का असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. त्यांच्या संदर्भामध्ये एक तक्रार झाली होती आणि ती तक्रार झाल्यानंतर त्याबाबत चौकशी सुध्दा करण्यात आलेली आहे. त्यानंतर त्यांना प्रमोशन मिळाले की नाही ही माहिती आता माझ्याजवळ नाही. परंतु ती माहिती आपल्याला अवगत केली जाईल. सन्माननीय सदस्यांचा दुसरा जो प्रश्न आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, या अधिकाऱ्यांनी रायगड जिल्ह्यामध्ये जमीन घेतली, ही गोष्ट खरी आहे आणि निवेदनामध्ये सुध्दा ते कबूल केलेले आहे. परंतु ते स्वत: शेतकरी आहेत की नाही किंवा त्यांनी शेतकरी असल्याची असत्य माहिती दिली का अशा प्रकारची माहिती आता माझ्याकडे नाही. ती माहिती सुध्दा पटलावर ठेवण्यात येईल. त्यांची चौकशी करणारे श्री. जलोटा नावाचे जे अधिकारी आहेत त्या अधिकाऱ्यांनीच त्यांना प्रमोशन दिले अशा प्रकारची माहिती सुध्दा आता माझ्याकडे उपलब्ध नाही. या तीनही प्रश्नांची पूर्णपणे माहिती आता माझ्याकडे नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेतील जकात विभागातील भ्रष्टाचारासंबंधी हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे, महानगरपालिकेच्या ज्या अंतर्गत चौकशा केल्या जातात त्याबाबत माझ्याकडे माहितीच्या अधिकाराखाली मिळालेला अहवाल मला प्राप्त झालेला आहे. तो अहवाल शासनाकडे नसेल तर शासनाने तो प्राप्त करुन घ्यावयास पाहिजे. ज्या पध्दतीने या सगळ्या प्रकरणामध्ये यांना संरक्षण दिले जात आहे ते पाहता त्याला कोणी तरी जबाबदार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

आहेत. प्रश्न असा आहे की, त्यांना शेतजमीन घ्यावयाची असेल तर त्याला काही प्रतिबंध नाही पण सन 2000 चा भाव, त्या शेताची किंमत तसेच ते शेतकरी आहेत की नाहीत हा एक प्रश्न आहेच पण त्यांच्याकडे एवढी संपत्ती कोठून येते हा महत्वाचा प्रश्न आहे. माहीत असलेल्या स्त्रोतापेक्षा अधिकच्या रकमेतून जेव्हा अशा प्रकारच्या जमिनी खरेदी केल्या जातात त्यावेळेला अशी ही सगळी साखळी तयार होते, खालच्या अधिकाऱ्यापासून वरच्या अधिकाऱ्यापर्यंत एकमेकांना सावरुन घेऊन त्यामध्ये कोणतेही तथ्य आढळून आले नाही, पुरावा सापडला नाही, त्यामध्ये नियमबाह्य काही नाही, अशा पध्दतीची उत्तरे दिली तर या भ्रष्टाचाराला कधीच आळा बसू शकणार नाही. या संपूर्ण प्रकरणाची शासनाच्या विभागाने पहिल्यापासून पूर्णपणे चौकशी करण्याची गरज आहे. म्हणून यामध्ये दोषींवर निश्चितपणे कडक कारवाई झाली पाहिजे. आपल्याकडे सबळ पुराव्याच्या आधारे जी माहिती आहे त्या संदर्भात योग्य ती कारवाई विभागाकडून व्हावी अशी माझी या निमित्ताने शासनाला सूचना आहे.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मला सभागृहामध्ये येण्यास थोडा उशीर झाला त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी दोन-तीन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. या तीन अधिकाऱ्यांनी शेतजमीन खरेदी केली आणि कोट्यवधी रुपयांची संपत्ती गोळा केली, महसूल बुडविला अशा प्रकारची तक्रार त्यांच्याविरुध्द आहे. दरवर्षी सादर करण्यात येणारा प्रॉपर्टीचा जो अहवाल असतो तो आपल्या विभागाकडे सादर करावयाचा असतो. तो अहवाल या तीनही अधिकाऱ्यांनी सादर केला आहे, असे निदर्शनास आले आहे. शेतकरी नसताना जमीन घेतली हा महसूल खात्याचा विषय आहे. तशी काही तक्रार आली असती तर त्याची माहिती निश्चितपणे पुरविण्यात आली असती. पण यामध्ये एक बाब नमूद करणे गरजेचे आहे की, या विभागामध्ये फार मोठ्या प्रमाणात जकात चोरी होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्या जकात चोरीमध्ये कोण कोण संबंधित आहेत, त्यामध्ये काही अधिकारी असण्याची शक्यता आहे आणि काही बाहेरचे लोक, जकात कॉन्ट्रॅक्टर किंवा ठेकेदार असण्याची शक्यता आहे म्हणून यासंबंधी एक एफआयआर देखील दाखल करण्यात आलेला आहे. एफआयआर दखल करुन जवळजवळ 20-20

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

कोटी रुपयांची महिन्याला चोरी होण्याचे निदर्शनास आलेले आहे. ती माहिती मिळालेली आहे. त्याबाबत एफआयआरच्या माध्यमातून चौकशी चालू आहे. परंतु या ठिकाणी जे तीन मुद्दे मांडलेले आहेत त्यामध्ये कोट्यवधी रुपयांची संपत्ती गोळा करण्यासंबंधीचा विषय, महापालिकेचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविण्यासंबंधीचा विषय आहे. महसूल बुडविण्याचा जो विषय आहे त्याबाबत एफआयआर दाखल झाल्याचे मी उत्तरात सांगितले आहे. या अधिकाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांची संपत्ती जमा केली असा जर काही ठोस पुरावा दिला तर निश्चित त्याची ए.सी.बी. मार्फत चौकशी करण्यात येईल. परंतु मला असे वाटते की, जमीन खरेदी केली त्याचा तपशील, याची माहिती त्यांनी आपल्या उच्च अधिकाऱ्यांना वेळोवेळी दिलेली आहे.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, यामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी आता सांगितले की, मुंबई महानगरपालिकेच्या जकातीच्या संदर्भामध्ये अतिशय गंभीर परिस्थिती आहे. मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीपासून आज विधिमंडळाच्या या सभागृहापर्यंत या भ्रष्टाचाराच्या संदर्भात चर्चा घडत आहे. मुळामध्ये हे जे संबंधित अधिकारी आहेत त्यासंदर्भात या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, शेतकरी नसताना शेतजमीन खरेदी करणे, कोट्यवधी रुपयांची संपत्ती गोळा करणे याबद्दल ठोस माहिती उपलब्ध झालेली नाही. याची चौकशी करण्याची जबाबदारी कोणाची आहे ? जर का याबद्दल शासन माहिती उपलब्ध नाही अशा पध्दतीने उत्तर देत असेल तर ते योग्य नाही. शासनाने याबद्दल अतिशय गंभीर राहून या सबंधित अधिकाऱ्यांना तातडीने बडतर्फ करुन चौकशी करणे गरजेचे आहे.

यानंतर श्री. खदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव....

या प्रकरणातील श्री.रवींद्र तेंडुलकर यांना सिमेंट चोरीच्या प्रकरणामध्ये महानगरपालिकेने मेमो दिला होता, त्यांची वेतनवाढ रोखून ठेवली होती. मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, या अधिकाऱ्याने शेत जमिनी घेतल्या होत्या. परंतु तो अधिकारी शेतकरी नसल्याचे सिध्द झाल्यामुळे त्याने तहसीलदार कार्यालयातून नस्ती गायब केली होती. त्याबाबतची सुध्दा चौकशी करणे आवश्यक आहे असे शासनाला वाटत नाही काय, महानगरपालिकेच्या वतीने चौकशी अधिकारी नेमले जातात, त्यांचे साटेलोटे असते. म्हणून स्थानिक स्तरावरुन चौकशी करुन काही निष्पन्न होणार नाही. मी सभागृहाच्या वतीने शासनाला विनंती करतो की, या सर्व अधिकाऱ्यांना ताबडतोब निलंबित करुन शासनाच्यावतीने त्रयस्त उच्चपदस्थ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी समिती नेमून त्यांच्यावर कारवाई केली जाईल काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी आताच सांगितले आहे की, मुंबई महानगरपालिकेमध्ये जकात चोरीचा गंभीर प्रश्न होता. या प्रश्नाबाबत चौकशी केल्यानंतर एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे आता पोलीस खात्याकडून संपूर्ण चौकशी होईल. चौकशीत जे दोषी आढळतील त्यांच्यावर निश्चित कारवाई केली जाईल. मग त्यात कोणाचे संगनमत होते, कोणते अधिकारी दोषी होते, त्यात कोणते उच्चपदस्थ अधिकारी होते, त्यात बाहेरचे लोक सहभागी होते काय हे बाहेर येईल. भविष्यात आपल्याला जकातीचा प्रश्न निकाली काढावा लागेल. इतर महानगरपालिकांमध्ये जीएसटी लागू करण्याचा प्रयत्न केलेला आहे. जीएसटीमुळे जकात चोरीचा प्रश्न संपेल. तात्पुरत्या स्वरुपात मुंबई महानगरपालिकेने एक नवीन सॉफ्टवेअर डेव्हलप करुन ते दि.1 ऑगस्ट, 2011 पासून लागू केलेले आहे. या प्रकरणी आता एफआयआर दाखल झाला असल्यामुळे त्याची संपूर्ण चौकशी होणार आहे. त्यात जे दोषी आढळतील त्यांच्याविरुध्द कडक कारवाई केली जाईल असे मी आपल्यामार्फत सभागृहाला सांगू इच्छितो.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी आता कबूल केले आहे की, 20 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार जकात खात्यात झालेला आहे. माझ्या मते ही रक्कम लहान आहे. कारण मुंबई महानगरपालिकेचे जकातीचे उत्पन्न खूप जास्त आहे. या प्रकरणात संबंधित

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अधिकाऱ्यांवर आरोप करण्यात आले आहेत. या सर्व प्रकरणाची लाचलुचपत विभागातील आय.जी.दर्जाच्या अधिकाऱ्यांमार्फत सखोल चौकशी करुन ती सर्व माहिती जनतेसमोर आणली जाईल काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, या प्रकरणी एफआयआर दाखल केलेला आहे. पोलीस त्यानुसार चौकशी करीत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी श्री.रवींद्र तेंडुलकर यांची सिमेंट चोरीच्या प्रकरणाबाबत चौकशी होऊन त्यांना शिक्षा झाली होती असे सांगितलेले आहे. याबाबत मला मिळालेली माहिती अशी आहे की, हायकोर्टाने त्यांची शिक्षा रद्द केली आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, सभागृहात महत्वाच्या विषयावर लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आलेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना मला असे सांगावयाचे आहे की, मुंबई महानगरपालिकेमध्ये श्रीमती व्ही.राधा नावाच्या अधिकारी होत्या. त्यांनी अत्यंत धाडसाने जकात चोरीची प्रकरणे उघडकीस आणली होती. मुंबई महानगरपालिकेला जवळपास 45,00 ते 6000 कोटी रुपयांची जकात मिळते. या प्रकरणात तीन अधिकाऱ्यांची नावे समोर आलेली आहेत. परंतु जकात कराचा संपूर्णपणे आढावा घेतला तर अनेक प्रकरणे व अनेकांची नावे बाहेर येतील. कारण जकात म्हणजे भ्रष्टाचाराचे कुरण असल्यामुळे जकात कर रद्द होऊ नये म्हणून त्यांनीच ही जकात चालू ठेवलेली आहे. महानगरपालिकेत सॅकने नवीन सॉफ्टवेअर डेव्हलप केले असून त्याची अंमलबजावणी सुरु केलेली आहे. या पध्दतीमुळे जकात चोरीमुळे होणारा भ्रष्टाचार थांबू शकेल. परंतु हे अधिकारी जाणूनबुजून नवीन पध्दती कार्यान्वित करु देत नाहीत. माननीय मुख्यमंत्र्यांनी ही नवीन पध्दती ताबडतोब कार्यान्वित करावे. जकातीमुळे व्यापाऱ्यांचा अनेक तास खोळंबा होतो, त्यांना त्रास होतो. मी मुंबई महानगरपालिकेची नगरसेविका आहे. अनेक नगरसेविकांनी जकात नाक्यावर धाड टाकून या लोकांना पकडून दिलेले आहे. परंतु महानगरपालिकेतील अधिकारी संबंधितांची पाठराखण करीत आहेत. श्रीमती व्ही.राधा या महानगरपालिकेत चांगले काम करीत होत्या. त्याचा एकदा आढावा घेऊन सॅक ही सिस्टिम पुन्हा कार्यान्वित करावी. त्याच्या माध्यमातून हा भ्रष्टाचार समूळ नष्ट नष्ट करण्यात येईल काय ?

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, जकात कर पध्दती आता कालबाह्य झालेली आहे. जवळजवळ सर्वच राज्यांनी जकात कर पध्दत संपविलेली आहे. जकात कर सुरु असलेले आपले शेवटचे राज्य आहे. आपल्या राज्यात काही महानगरपालिकांमध्ये जकात कर सुरु ठेवलेला आहे. जीएसटी पध्दत अंमलात सुरु करण्याबाबत काही राजकीय पक्षांनी वेगळी भूमिका घेतलेली आहे. जोपर्यंत मुंबई महानगरपालिकेत ही नवीन पध्दत अंमलात येत नाही तोपर्यंत महानगरपालिकेचे उत्पन्न सुरु राहण्यासाठी कर लावावा लागेल. सरकारने जकात कराऐवजी काही महानगरपालिकांमध्ये एलबीटी कर सुरु केला होता. बऱ्याच महानगरपालिकांना त्याचा चांगला उपयोग झालेला आहे. या पध्दतीने मुंबईच्या सीमेवर जे गैरप्रकार होतात ते थांबविता येतील. एक-दोन शहरांमध्ये एलबीटी कर लावण्यासाठी काही राजकीय पुढारी सामील झालेले आहेत. त्याला विरोध करण्याची त्यांनी भूमिका घेतली आहे. मला सभागृहाला नम्रपणे सांगावयाचे आहे की, आपण जकात कर लवकरात लवकर बंद केला पाहिजे. नवीन सॉफ्टवेअर डेव्हलप झालेले आहे. एफआयआर दाखल झालेला आहे. चौकशी सुरु राहील, परंतु हा सर्व प्रकार शासनाला बंद करावयाचा आहे. त्यासाठी काही महानगरपालिकांमध्ये एलबीटी सुरु केलेला आहे. परंतु जीएसटी पध्दत येईल त्यानंतर लोकांना जकात करापासून जो त्रास होतो तो कमी होईल.

डॉ.दीपक सांवत : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, आजपर्यंत जकात चोरीची प्रकरणे उघडकीस आल्यानंतर त्याच्यावर कारवाई न झालेली किती प्रकरणे प्रलंबित आहेत ? अधिकाऱ्यांनी आपली संपत्ती जाहीर करण्याचा कायदा करण्यात येईल काय किंवा माननीय मुख्यमंत्री तशा प्रकारचे लिखित स्वरुपाचे आदेश काढणार आहेत काय, यामध्ये महसूल विभागाचे व इतर विभागाचे अधिकारी सुध्दा आहेत. आयएएस व आयपीएस अधिकाऱ्यांवर यापूर्वी आरोप झालेले आहेत. त्यामधून काही अधिकाऱ्यांकडे 8 फ्लॅट तर काही अधिका-यांकडे 10-10 फ्लॅट आढळून आले होते. त्यामुळे त्यांनी आपली संपत्ती जाहीर करण्याबाबत शासन शिफारस करणार आहे काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सर्व्हिस रुल्सप्रमाणे अधिकाऱ्यांनी मग ते केंद्र सरकारचे असतील किंवा राज्य सरकारचे असतील. त्यांनी आपल्या संपत्तीचे वार्षिक गोपनीय निवेदन सादर करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये एखाद्या अधिकाऱ्याने संपत्ती चोरली असेल किंवा बेनामी

4....



श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

मालमत्ता जमा केली असेल व त्याबाबतची कोणी तरी माहिती पुरविली तर त्याची चौकशी केली जाते. या सर्व केसेसमध्ये सर्व्हिस रुल्सनुसार संपत्तीचा वार्षिक अहवाल सादर करणे अनिवार्य आहे. विशेषत: आयएएस व आयपीएस अधिकाऱ्यांचे संपत्तीचे अहवाल आहेत ते वेबसाईटवर ठेवलेले आहेत. राज्य सरकारचे अहवाल सुध्दा वेबसाईटवर ठेवण्याबाबत विचार करता येईल. अर्थात कोणी बेनामी मालमत्ता घेतली असेल तर तो विषय वेगळा आहे. आयएएस व आयपीएस अधिकाऱ्यांच्या बाबतीत त्यांनी अधिकृतपणे घेतलेली मालमत्ता वेबसाईटवर ठेवलेली आहे. राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांना सेवा नियमावलीनुसार संपत्तीचे वार्षिक गोपनीय अहवाल सादर करावेच लागतात.

------

5.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

**पृ. शी.** : राज्यात अल्प मुदतीचे वैद्यकीय अभ्यासक्रम सुरु करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

**मु. शी.** : राज्यात अल्प मुदतीचे वैद्यकीय अभ्यासक्रम सुरु करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय यासंबंधी डॉ.दीपक सावंत, सर्वश्री परशुराम उपरकर, दिवाकर रावते, रामदास कदम, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, किशनचंद तनवाणी,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील इयत्ता 10 वी परिक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यासाठी पुढील शैक्षणिक वर्षापासून अल्पमुदतीचे वैद्यकीय अभ्यासक्रम सुरु करण्याचा राज्य शासनाने घेतलेला निर्णय, सदर अभ्यासक्रमांना मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता घेण्यात आली आहे किंवा कसे याबाबत साशंकता निर्माण होणे, सदरहू अभ्यासक्रम सुरु करण्यामागील राज्य शासनाची भूमिका स्पष्ट जाहीर न होणे, निश्चित कोणत्या निकषांवर सदरहू अभ्यासक्रम शिकविणाऱ्या संस्थांना अनुमती देण्यात येणार आहे? वैद्यकीय शिक्षणाचा कालावधी किती वर्षाचा राहणार आहे ? अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना सेवेत सामावून घेणार आहे काय ? याबाबत निश्चित माहिती शासकीय अधिकऱ्यांकडून न मिळणे, याप्रकरणी राज्यातील इच्छूक विद्यार्थी व पालकांमध्ये निर्माण झालेला संभ्रम, याबाबत राज्य शासनाने निश्चित धोरण जाहिर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची भूमिका व करावयाची कारवाई."

डॉ.विजयकुमार गावित ( वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

नंतर श्री.गिते......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, दिनांक 14 ऑक्टोबर रोजी आरोग्य विज्ञान विद्यापीठाची अधिसभा झाली. त्या अधिसभेमध्ये इयत्ता 10 वी ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढे वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी परवानगी देण्यात येईल अशा प्रकारचा ठराव पारित करण्यात आला. सदर ठराव सिनेट सदस्य श्री. सोमवंशी यांनी मांडला. आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे माननीय कुलगुरु श्री. जानकर अशा प्रकारची वक्तव्ये केली ती वृत्तपत्रात छापून आलेली आहेत. इयत्ता 10 वी ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढे वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी परवानगी देण्यात येईल असे माननीय कुलगुरुंनी सांगितले आणि त्यास अधिसभेने मंजुरी देखील दिली. तो प्रस्ताव राज्य शासनाकडे व एम.सी.आय.कडे पाठवावा असे ठरले. शासनाने लेखी उत्तरात अल्प मुदतीचे कोर्सेस असे म्हटले आहे. लक्षवेधी सूचनेत अल्प मुदतीच्या कोर्ससचा उल्लेख केलेला नाही ही बाब मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो. एम.बी.बी.एस. किंवा तत्सम परीक्षेसाठी पाच वर्षाचा किंवा सात वर्षाचा अभ्यासक्रम सुरु करावा असा अधिसभेत निर्णय घेतला आहे, तो निर्णय प्रसिध्द देखील झालेला आहे. अधिसभेचा अहवाल माझ्याकडे उपलब्ध आहे.

माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री हे या विद्यापीठाचे प्रो व्हाईस चान्सलर आहेत. इयत्ता 10 वी ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढे वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी परवानगी देण्याबाबत आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून आपणास विचारणा करण्यात आली होती काय ? सदर निर्णय घेण्यापूर्वी सदर प्रस्तावाच्या बाबतीत आपली संमती घेतली होती काय ? आपली संमती घेण्याची विद्यापीठाला का आवश्यकता भासली नाही याबाबतीत विद्यापीठातील कुलगुरुंनी आधार दिलेला आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम 1998 कलम 225 चे उप कलम 2 (6) (ब) मध्ये स्पष्ट म्हटल्याप्रमाणे सभागृहाने वैद्यकीय शिक्षणातील सामाजिक गरजांशी सुसंगत अशा नवीन विद्याविषयक कार्यक्रम सुचविणे. त्यांनी याचा आधार घेऊन तो ठराव पास केलेला आहे. या गोष्टींची कल्पना माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री म्हणून आपणास होती काय ? आरोग्य विज्ञान विद्यापीठात माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री सिनेट सदस्य आहेत, मी देखील सिनेट सदस्य आहे. त्या अधिसभेच्या बैठकीत दुर्देवाने मी आणि तुम्ही दोघेही अनुपस्थित होतो. कुलगुरुंनी जाहीर केलेल्या निर्णयामुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. आजचे युग इंटरनेटचे आहे, नवीन तंत्रज्ञानाचे युग आहे, त्यामुळे या विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण आत्मसात

2...

डॉ.दीपक सावंत...

करता येईल अशी कारणे देऊन त्यांनी अकलेचे तारे देखील तोडले आहेत. हा ठराव पास करण्यात येणार आहे या गोष्टीची माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री म्हणून आपल्याला कल्पना होती काय ? राज्य शासनाचे एम.बी.बी.एस.च्या बाबतीत निश्चित असे धोरण काय आहे ? आपल्याला विश्वासात न घेता, आपल्याशी कन्सल्ट न करता माननीय कुलगुरु श्री. जामकर यांनी अशा प्रकारचा ठराव पारित केला. त्यामुळे त्यांचे विरुध्द कारवाई करण्यास आपण सक्षम आहात काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने दोन, तीन उप प्रश्न उपस्थित केले आहेत. दिनांक 14 ऑक्टोबर रोजी आरोग्य विज्ञान विद्यापीठाची अधिसभा झाली. त्या अधिसभेत इयत्ता 10 वी ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढे वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी परवानगी द्यावयाची काय याबाबतीत चर्चा झाली. ही चर्चा पूर्ण झाल्यानंतर कुलगुरुंनी सांगितले की, हा विषय बोर्ड ऑफ स्टडीज्पुढे ठेवला पाहिजे. प्रोसीजर अशी आहे की, एखाद्या वैद्यकीय कोर्समध्ये बदल करावयाचा असेल तर बोर्ड ऑफ स्टडीजकडे विषय पाठविला जातो. कारण हे सर्व विषय बोर्ड ऑफ स्टडीज्च्या अखत्यारितील आहेत. अशा शिक्षणासंबंधी अभ्यासक्रम कसा असला पाहिजे याबाबतीत बोर्ड ऑफ स्टडीज् सखोल अभ्यास करीत असते. त्यानंतर ते प्रस्ताव सिनेटकडे येतात. यासंदर्भात अधिसभेत चर्चा झाली. त्यानंतर कुलगुरुंनी सांगितले की, हा विषय बोर्ड ऑफ स्टडीज्कडे न्यावा लागेल आणि म्हणून हा विषय बोर्ड ऑफ स्टडीज् समोर न्यावा अशा प्रकारचा ठराव त्या अधिसभेत करण्यात आला. या विषयाच्या बाबतीत कुलगुरुंनी शासनाबरोबर चर्चा केलेली नाही. परंतु या विषयाची बातमी वृत्तपत्रात आल्यानंतर कुलगुरुंना त्याबाबतीत समज देण्यात आलेली आहे. पॉलिसी मॅटरचे विषय असतात, त्यासंबंधी शासनाबरोबर चर्चा केली पाहिजे. शासना बरोबरच चर्चा केल्यानंतरच असे विषय आणावेत अशा प्रकारच्या सूचना त्यांना देण्यात आलेल्या आहेत.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, मैं कहना चाहूंगा कि भारत सरकार का जो एचआरडी मंत्रालय है तथा मेडिकल कॉउंसिल ऑफ इंडिया है, उन्होंने ग्रामीण क्षेत्रों में दसवीं पास बच्चों के लिए शॉर्ट टर्म एमबीबीएस कोर्स के लिए स्पेशल सिलेबस तैयार करने की जो योजना बनायी है, क्या उस संबंध में महाराष्ट्र सरकार ने कुछ पहल की है ?

3...



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री. खंदारे 12:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावीत : ग्रामीण भागासाठी वेगळा कोर्स काढण्याची संकल्पना त्यावेळच्या बोर्ड ऑफ गव्हनर्स यांनी मांडली होती. परंतु हयूमन राईट कमिशनने त्याबाबतीत हरकत घेतली. ग्रामीण भागात वेगळया डॉक्टरांमार्फत शिक्षण घ्यावयाचे आणि शहरी भागामध्ये वेगळया डॉक्टरामार्फत शिक्षण घ्यावयाचे अशी डिस्पॅरिटी आपल्याला करता येणार नाही असे हयूमन राईट कमिशनने बैठक घेऊन सर्वांना सांगितले. त्यामुळे तो विषय तेथेच थांबला.

डॉ.दीपक सावंत : या ठिकाणी माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले की, कुलगुरुंना समज देण्यात आली. हा पॉलिसी मॅटरचा मोठा प्रश्न आहे. इयत्ता 10 वी ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढे वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी परवानगी देणार आहात अशा बातमीमुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठी हलचल निर्माण झाली. याबाबतीत वृत्तपत्रात आर्टिकल प्रसिध्द झाले. डॉ.रवी बापट आणि डॉ.संजय ओक या दोनच व्यक्तींनी या गोष्टीस हरकत घेतली. कुलगुरु सारख्या जबाबदार व्यक्तीने अशा प्रकारचे वर्तन केल्यानंतर आपण त्यांच्या विषयी तक्रार वा त्यांच्या विषयीची माहिती माननीय राज्यपाल महोदयांना दिली आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावीत : एम.बी..बी.एस.चे शिक्षण इयत्ता दहावी पासून करायचे की इयत्ता 12 वी पासून करावयाचे तसेच ते किती वर्षाचे करावयाचे या गोष्टींचा अंतिम निर्णय एम.सी.आय.च्या अखत्यारितील आहे. या क्षेत्रातील कोणतेही पॉलिसी मॅटर पुढे पाठवावयाचे असेल तर प्रथम ते राज्य शासनाकडे येते. राज्य शासनाकडून नंतर ते पुढे पाठविले जाते. राज्य शासनाचा याबाबतीत शार्ट टर्म कोर्स करण्याचा विचार नाही.

डॉ.दीपक सावंत : माननीय मंत्री महोदय, आपण आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे प्रो व्हाईस चान्सलर आहात. अधिसभेमध्ये अशा प्रकारचा ठराव आणण्यापूर्वी आपल्याशी कन्सल्ट करावयास नको होते काय ? आपल्याशी कन्सल्ट न करता राज्याच्या पॉलिसीच्या विरोधात जाऊन अशा प्रकारचा ठराव पारित केला गेला. अशा प्रकारचा कोर्स आणावा म्हणून सिनेटच्या बैठकीत उपस्थित असलेल्या सगळया सदस्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे. विद्यार्थ्यांच्या माथी तो कोर्स मारावा. महत्वाचा धोरणात्मक निर्णय घेतांना कुलगुरुंनी आपणाशी कन्सल्ट करावयास पाहिजे होते. असे प्रस्ताव एम.सी.आय.कडे जावयास पाहिजे असे आपण कसे काय म्हणू शकता, मग आपले काय स्टेटस आहे ? या विद्यापीठाला एवढे स्वातंत्र्य देण्यात आले आहे काय ? अशा स्वायत्त

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संस्थांवर बंधने असली पाहिजेत अशी आमची विनंती आहे. या प्रकरणी कुलगुरुंना समज देऊन चालणार नाही. त्यांचे विरुध्द कडक कारवाई करण्याचे अधिकार आहेत किंवा नाहीत याची मला माहिती नाही. त्यांचे विरुध्द कडक कारवाई माननीय राज्यपालांच्या माध्यमातून करण्यात येईल काय ?

डॉ.विजयकुमार गावीत : तो प्रस्ताव बोर्ड ऑफ स्टडीज्कडे पाठविण्याचे ठरविले आहे. त्यांच्याकडून तो प्रस्ताव पुढे पाठविला जाईल. यासाठी बरीच प्रोसीजर असते. ती पूर्ण झाल्यानंतरच अशा प्रकारचा अंतिम निर्णय शासन घेत असते. अधिसभेच्या बैठकीत अनेक विषय चर्चेला येत असतात. परंतु त्यातील एखाद्या विषयाच्या बाबतीत अंतिम निर्णय घेण्यापूर्वी प्रो व्हाईस चान्सलर तसेच सरकार म्हणून माहिती देणे बंधनकारक आहे. या विषयाची फक्त चर्चा झाली आहे. याबाबतीत कोणत्याही प्रकारचा अंतिम निर्णय झालेला नाही. याबाबतीत कुलगुरुंना समज दिली आहे. त्यांच्यासाठी ती कारवाई पुरेशी आहे. त्यांच्यावर पुढे काही कारवाई करण्याची गरज आहे असे मला वाटत नाही.

श्री. हेमंत टकले : आज सगळया देशामध्ये अभिमत विद्यापीठ निर्माण होत आहेत. अशा पध्दतीचे अभ्यासक्रम ठरविण्यासाठी सिनेटची बैठक घेण्यात येत असते. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, सिनेटच्या बैठकीत उपस्थित असलेल्या सगळया सदस्यांनी या कोर्सचे समर्थन केले. त्या सदस्यांनी समर्थन दिले, त्यामागे काही तरी निश्चित कारणमिमांसा असेल. ती बाजू देखील तपासून घेण्याची आवश्यकता आहे. एकूण वैद्यकीय शिक्षण घेतलेले मनुष्यबळ आपल्याकडे किती प्रमाणात उपलब्ध आहे, अजून किती मनुष्यबळाची आवश्यकता आहे, किती ठिकाणी अशा प्रकारचे कोर्सेस करता येतील ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-2.......... श्री.हेमंत टकले......

मला वाटते, सिनेटचा तो अधिकार आहे. त्या पध्दतीने सिनेटमध्ये चर्चा करावी आणि जर काही सूचना असतील तर त्या सूचना मांडाव्यात. त्याचे स्तर आहेत. त्यानंतर बोर्ड ऑफ स्टडीज आहे. त्यानंतर एम.सी.आय.कडे जावे लागणार आहे. या सर्व चाळणीमधून गेल्याशिवाय कोणताही निर्णय शासन घेत नाही. या सगळ्या बैठकीचा जो वृत्तांत आहे त्या वृत्तांताच्या आधारे कुलगुरु असा कोर्स सुरु करणार आहेत अशा प्रकारे प्रसिध्दी देणार असतील तर त्याला निश्चितपणे हरकत घेण्याची आवश्यकता आहे. कुलगुरुंना त्यांच्या कामाची मर्यादा आणि विद्यापीठ घेणार असलेला निर्णय या बाबतीत कोणती बंधने आहेत याच्या स्पष्टपणे सूचना देणार आहात काय?

डॉ.विजयकुमार गावीत : होय.

----

## लक्षवेधी सूचना क्रमांक-4 पुढे ढकलण्यासंबंधी

**उप सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेतील लक्षवेधी सूचना क्रमांक-4 पुढे ढकलण्यात येत आहे. संबंधित मंत्रीमहोदयांनी लक्षवेधी सूचनेचे उत्तर तयार नसल्यामुळे ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याबाबत लेखी स्वरुपात कळविले आहे.

आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : **औचित्याचे मुद्दे**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि रिपाई या मित्र पक्षाच्या संयुक्त जाहीरनाम्यातील 21 व्या कलमातील कलम क्रमांक 9 मध्ये आश्वासित केल्याप्रमाणे भारतीय घटनेचे शिल्पकार परमपूज्य भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी चैत्यभूमी परिसरातील 12.5 एकर जमीन उपलब्ध करुन स्मारकाचे काम कालबध्द व जलद गतीने होण्यासाठी चैत्यभूमी विकास प्राधिकरण स्थापन करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते.

मागील अधिवेशनात सभागृहातील चर्चेत मी म्हणालो होतो की, दिल्लीच आमच्याच पक्षाचे सरकार आहे. पंतप्रधान काँग्रेस पक्षाचे आहेत. केंद्र सरकारमध्ये श्री.शरद पवार, श्री.सुशीलकुमार शिंदे व श्री.विलासराव देशमुख हे राज्याचे पॉवरफूल माजी मुख्यमंत्री आहेत. या सर्वांना घेऊन मा.मुख्यमंत्र्यांनी मा.पंतप्रधान व काँग्रेस पक्षाच्या सर्वेसर्वा नेत्या माननीय श्रीमती सोनिया गांधी यांच्यामार्फत हा प्रश्न सोडवावा अशी सभागृहात विनंती केली होती. नुकतेच केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री यांनी लोकसभेत लेखी प्रश्नाला उत्तर दिले आहे की, स्मारक उभारण्यासाठी चार एकर जागा देण्यात येईल. उर्वरित जागा देणे आर्थिकदृष्ट्या परवडणार नाही. शासकीय अधिकाऱ्यांकडून आलेले हे लेखी उत्तर होते. या विधानामुळे राज्यातील आंबेडकरवादी जनतेच्या भावना भडकल्या आहेत. मी स्वत:, माननीय श्री.चंद्रकांत हंडोरे मिळून माननीय उप मुख्यमंत्री व मुख्यमंत्री यांना भेटलो. त्यांनी आश्वासित केले की, आमच्या राज्याचे तीन माजी मुख्यमंत्री केंद्रीय मंत्रीमंडळात सामील आहेत. त्यांना सोबत घेऊन माननीय पंतप्रधानांची भेट घेऊ आणि हा प्रश्न सोडवू. त्या आश्वासनाप्रमाणे हा प्रश्न त्वरित सोडवावा अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे ही बाब निदर्शनास आणून देत आहे. शासनाने या संदर्भात निवेदन करावे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

मराठी भाषेच्या विकासासाठी राज्य मराठी विकास संस्था स्थापन करण्यात आली आहे आणि त्या पूर्वीच म्हणजे राज्याच्या निर्मितीपासून साहित्य संस्कृती मंडळही कार्यरत आहे. नुकतेच या दोन्ही संस्थांचे एकत्रीकरण करण्याबाबत राज्य शासनाने तयारी सुरु केली आहे असे वर्तमानपत्रात जाहीर झाले आहे. खरे या दोन्ही संस्था भिन्न उद्दिष्टांसाठी स्थापन झालेल्या आहेत. या दोन्ही संस्थांचे सध्याचे स्वरुप काळजी निर्माण करणारे आहे. या एकूण प्रश्नाकडे पाहिले तर जे उद्दिष्ट मराठी विकास संस्थेचे होते ते उद्दिष्ट आणि साहित्य संस्कृती मंडळाचे उद्दिष्ट यामध्ये खूप अंतर आहे. राज्य मराठी विकास संस्थेचे उद्दिष्ट आणि जबाबदाऱ्या या अत्यंत वेगळ्या स्वरुपाच्या आहेत आणि साहित्य संस्कृती मंडळाच्या त्यापेक्षा भिन्न आहेत. या दोन्ही संस्थांवर मान्यवर सदस्य नेमलेले आहेत. राज्य मराठी विकास संस्थेचे अध्यक्ष माननीय मुख्यमंत्री आहेत, शालेय शिक्षणमंत्री उपाध्यक्ष आहेत आणि 12 शासकीय पदसिध्द अधिकारी आणि 19 अशासकीय सदस्य आहेत. त्याचप्रमाणे राज्य साहित्य संस्कृती मंडळामध्ये श्री.मधु मंगेश कर्णिक यांच्या अध्यक्षतेखाली साहित्य क्षेत्रातील 38 जण काम करीत आहेत. संपूर्ण राज्यात विकास संस्थेची अवस्था आहे ती पाहिली तर ज्या कारणासाठी संस्थेची स्थापना झाली ते उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने दिलेला कर्मचारीवर्ग अत्यंत अपुरा पडत आहे. जी वर्गवारी करण्यात आली आहे त्यानुसार पूर्णवेळ संचालक नाही. महाराष्ट्राची व्यावहारिक, प्रशासनिक आणि ज्ञान या तीन स्तरावर मराठी भाषेचा सर्वांगीण वापर वाढविण्यासाठी विविध मार्गांनी प्रयत्न करणे ही अतिशय मोठे उद्दिष्ट आहे. 26 उद्दिष्टे त्यांना ठरवून दिलेली आहेत. साहित्य संस्कृती मंडळ साहित्यिकांच्या मार्फत चालविले जाते. श्री.मधु मंगेश कर्णिक हे त्या मंडळाचे अध्यक्ष आहेत. श्रीमती वसुंधरा पेंडसे-नाईक या विकास केंद्राच्या संचालिका म्हणून काम करीत होत्या. त्यांच्या निवृतीनंतर संचालक पद भरलेले नाही. ज्या राज्याची राजभाषा मराठी आहे, ज्या मराठीसाठी आणि मराठी माणसांसाठी, मराठी संस्कृतीसाठी सतत आग्रह धरला जातो त्यासाठी मराठी भाषा विभाग स्थापन करण्यात आला. असे असताना या दोन्ही संस्था सक्षम करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी संस्थांचे विलीनीकरण करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असेल तर त्या प्रस्तावाचा शासनाने पुनर्विचार करावा अशी मी विनंती करीत आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, गोवंडी हा मुंबईतील एक भाग असून या भागात टाटानगर आणि देवनार गाव परिसरात मोठया प्रमाणात झोपडपट्टी व सर्वसामान्यांची वस्ती आहे. या वस्तीच्या शेजारीच हार्बर रेल्वे लाईन आहे. एका बाजूला देवनार गाव व दुसऱ्या बाजूला महापालिकेची वसाहत आहे आणि दोघांच्या मध्ये रेल्वे लाईनचा ट्रॅक आहे. कुमुद विद्यामंदिर या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना रेल्वे लाईन ओलांडून शाळेत यावे लागते. विद्यार्थी व पालक आपला जीव धोक्यात घालून रेल्वे लाईन ओलांडून या शाळेत येत असतात. या ठिकाणी फूट ओव्हर ब्रिज नसल्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मुलांना आणि पालकांना रेल्वे लाईन क्रॉस करण्याशिवाय दुसरा पर्याय शिल्लक नाही. आतापर्यंत रेल्वे लाईन ओलांडताना अनेकांचा दुर्दैवी अपघात होऊन मृत्यू झाला आहे. विद्यार्थी व पालकांच्या जीविताचे रक्षण करण्याच्या दृष्टीकोनातून रेल्वे मार्गावर फूट ओव्हर ब्रिज तयार करण्यासाठी राज्य शासनाने रेल्वे मंत्रालयाशी संपर्क साधून हा प्रश्न मार्गी लावावा आणि त्या भागातील विद्यार्थी व पालकांच्या जीविताचे रक्षण करावे अशा प्रकारची विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला करीत आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, वारंवार या सभागृहात हा विषय वेगवेगळ्या रुपाने मांडण्यात आला आणि त्या प्रश्नाबाबत माननीय सभापतींनी आपल्या दालनात बैठक सुध्दा बोलावली होती. म्हाडा कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन योजना लागू करण्याच्या संदर्भात 1982 पासून म्हाडा कर्मचारी सातत्याने उपोषण करुन पेन्शनची मागणी करीत आहेत. 1977 नंतर चार मंडळांचे एकत्रीकरण करुन म्हाडा मंडळ स्थापन करण्यात आले. म्हाडा हे मंडळ अस्तित्वात आल्यानंतर पूर्वीच्या चार पैकी दोन मंडळातील कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्यात आली आहे, मात्र उर्वरित दोन मंडळातील कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू केलेली नाही. या नंतर मंडळामध्ये आलेल्या सभापतींनी विशेष रस घेऊन माननीय मुख्यमंत्री, संबंधित मंत्री यांची भेट घेऊन पेन्शन योजना लागू करण्याची विनंती केली. माननीय मुख्यमंत्री यांनी आश्वासन दिले की, 1989 पर्यंतचे जे कर्मचारी आहेत त्यांना पेन्शन लागू करता येऊ शकते. त्याला सुध्दा बराच कालावधी लोटला आहे. म्हाडाने पेन्शन देण्याकरिता स्वत:चा निधी बाजूला ठेवला आहे. पेन्शन योजना लागू केल्यास सरकारवर कोणताही आर्थिक भार येणार नाही. मंडळाकडे त्यासाठी स्वत:चा निधी उपलब्ध आहे. त्या निधीतून पेन्शन योजना लागू करावी अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करतो. शासनाने पेन्शन योजना मान्य केली तर ती लगेच लागू करता येईल. त्यासाठी आपण स्वत: उप मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री यांना निर्देश द्यावेत अशी विनंती आहे.

----

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)**

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ MMP/ D/ KTG/ प्रथम श्री. भोगले... 12:50

**पृ.शी./मु.शी.:विशेष उल्लेख**

**पृ.शी.**: भटक्या व विमुक्त जाती, जमातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्याबाबत

**मु.शी.**: भटक्या व विमुक्त जाती, जमातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्याबाबत ॲड. उषा दराडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे)** : मा□□य सदस्या ॲड. उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड. उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

देशात भटक्या व विमुक्तांची संख्या फार मोठया प्रमाणात आहे. देशातील अनेक मागास समाजापैकी हा एक मागास समाज आहे. सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय अशा सर्वच दृष्टीने हा समाज हा मागासलेला आहे. शैक्षणिक, रोजंदारी व आरोग्य क्षेत्रातही हा समाज अतिशय मागासलेला असून सामाजिक समतेची स्वप्ने आपण पाहतो. फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांना आपण मानतो. घटनेने सर्वांना सम पातळीवर जगण्याचा अधिकार दिलेला असल्यामुळे भटक्या विमुक्त जाती व जमातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्याची तातडीने उपाययोजना करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने शासकीय ठराव आणून केंद्र शासनाला शिफारस करावी यासाठी विशेष उल्लेखाचा मुद्दा मी मांडलेला आहे.

सभापती महोदय, कालचा औचित्याचा मुद्दा आज येणार की, नाही हे माहिती नसल्यामुळे कालच्या औचित्याच्या मुद्याचा मी विशेष उल्लेख केलेला आहे. त्यामुळे मला दुसरा औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी द्यावी अशी विनंती आहे.

**तालिका सभापती** :ठीक आहे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:औचित्याचे मुद्दे ( पुढे सुरु..........

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजामाता, महात्मा ज्योतिबा फुले, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, झ ाशीची राणी, आनंदीबाई जोशी या सारख्या महापुरुषांची चरित्रे छापण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 10 कोटी रुपायांची विशेष तरतूद करावी व अल्प निधीत ही चरित्रे पुस्तकांच्या स्वरुपात जनतेला उपलब्ध करुन द्यावी यासाठी मी औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य चंद्रकांत पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

कराड येथे सन 2003-2004 मध्ये पार पडलेल्या अखिल भारतीय नाटय संमेलनामध्ये नागठाणे ग्रामपंचायतीच्या वतीने महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य, पालकमंत्री, सांगली जिल्हा यांना बालगंधर्व स्मारकासाठी प्रस्ताव अर्ज देणे, मंत्र्यांनी आश्वासन देऊन लगेचच निधी मंजूर करणे, बालगंधर्व स्मारक समिती, नागठाणेच्या वतीने तत्कालीन जिल्हाधिकारी यांचेकडे साडेचार कोटी रुपयांचा बालगंधर्व स्मारकाचा प्लॅन, एस्टिमेट शासनास सादर करणे, यासाठी गंजीखाना ही जागा गृहीत धरणे, आपल्या आदेशाने 79 गुंठे जागेत बालगंधर्व स्मारक उभारण्याचे प्रयत्न असणे, दि. 6.8.2009 व 15.8.2009 च्या ग्रामसभेत गंजीखाना येथे 2500 ते 3000 लोक बसतील असा हॉल (नाटयगृह) संगीत शाळा, वसतिगृह, उत्तरवाहिनी, नदीकिनारी बालगंधर्व पुतळा, बागबगीचा करण्यचा ठराव मंजूर करणे, मात्र काही लोकांच्या सांगण्यावरुन हा हॉल (नाटयगृह) संगीत शाळा वसतिगृह कृष्णा नदीकिनारी करण्याचा शासन निर्णय घेणे, मात्र बालगंधर्व स्मारक व नाटयगृह कृष्णा नदीकाठी झाल्यास अनेक तोटे असून त्या ठिकाणी दोन्ही बाजूस स्मशान भूमी असल्याने अनेक कारणाने स्मारकाशी संपर्क तुटण्याची भीती असणे, त्यामुळे शासनाने यावर पुन्हा विचार करुन स्मारक गंजीखाना येथे होणे आवश्यक आहे त्याकरिता मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

---

....4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

ज्या महाराष्ट्राच्या मातीत कुस्तीसारखा खेळ रुजला त्याच मातीत हा खेळ गाडून टाकण्याचा घाट घालण्यात येण्यासारखी चिंताजनक स्थिती महाराष्ट्र कुस्तीत निर्माण होणे, ज्या कुस्तीगिरांच्या जोरावर हा खेळ खेळला जातो त्या कुस्तीगिरांचे भवितव्य मात्र कवडीमोल ठरविले जाणे, गतवर्षीच्या डिसेंबरमध्ये रोहयात झालेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेतील विजेता समाधान घोडके हा एक वर्ष लोटूनही पारितोषिकाच्या रक्कमेपासून वंचित असणे, प्रत्यक्ष स्पर्धेत खेळणा-या खेळाडुंना अल्प रक्कमेची दिली जाणारी बक्षिसे, आखाड्यात प्रत्यक्ष धाम गाळणा-या मल्लांची राहण्याची व्यवस्था अपु-या सोयीसुविधा असलेल्या ठिकाणी करण्यात येणे, यामुळे खेळांडूमध्ये निराशेचे व संतापाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत शासनाने महाराष्ट्र केसरी स्पर्धेतील कुस्तीगिरांच्या बक्षिसासाठी तरतूद करुन राज्यातील कुस्तीगिरांना प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

-----

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी दुसरा औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी तो मांडावा.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्यातील महानगरपालिका व जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना सकस आहार देण्याच्या उद्देशातून सुरु झालेली पोषण आहाराची खिचडी केवळ तांदळाचा वेळेत पुरवठा होत नसल्यामुळे अडचणीत येणे, तांदळात काटकसर करुन खिचडी शिजविण्याची मुख्याध्यापकांवर आलेली वेळ, तांदळाअभावी विद्यार्थी उपाशी रहात असल्याचे दुर्दैवी चित्र निर्माण होणे, पोषण आहारातील धान्य व वस्तू निकृष्ट दर्जाच्या असून त्यांचे वजन कमी भरत असल्याबाबत शिक्षकांच्या असलेल्या तक्रारी, महाराष्ट्र मार्केटींग फेडरेशनकडून तांदुळ पुरवठा करण्यात होत असलेला विलंब तसेच या मालाच्या दर्जाबाबत कडक कारवाई करण्याची आवश्यकता, आदिवासी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शालेय पोषण आहारा अभावी होणारी उपासमार टाळण्यासाठी तांदुळ इ. मालाच्या वितरणामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी नियोजनबध्द उपायोजना करण्याची गरज याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही.

----

.6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख (पुढे सुरु....**

**पृ. शी.** : राज्यात सीमॅट व सीईटी परीक्षा एकाच दिवशी होणे

**मु. शी.** :राज्यात सीमॅट व सीईटी परीक्षा एकाच दिवशी होणे याबाबत डॉ.दीपक सावंत,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** :मा□□य सदस्य डॉ.दीपक सावंत यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

एमबीए आणि सीमॅट व सीईटीची परीक्षा एकाच दिवशी असल्यामुळे सदर विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे. व्यवस्थापन अभ्यासक्रमासाठी यंदा प्रथमच राष्ट्रीय स्तरावर सीमॅट परीक्षा सुरु झालेली आहे. ही परीक्षा 20 ते 28 फेब्रुवारी या कालावधीत घेतली जाणार आहे असे सांगण्यात आलेले आहे. परंतु त्याच बरोबर सीईटी परीक्षा देखील 26 फेब्रुवारीला घेतली जाणार आहे. या दोन्ही परीक्षा ऑन लाईन असल्यामुळे ज्या दिवशी जे विद्यार्थी सीमॅट आणि सीईटीला बसतील त्यांची ओढाताण होणार आहे. सीईटी परीक्षेची तारीख 1 नोव्हेंबर, 2011 रोजी जाहीर झाली होती होती व सीमॅटची तारीख 4 डिसेंबर,2011 रोजी जाहीर झालेली आहे. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, सीमॅट व सीईटीची परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांची परीक्षा 26 फेब्रुवारी, 2012 रोजी होईल त्यांना दोन्ही परीक्षा एकाच वेळी देता येणार नाहीत. त्यामुळे मी या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांना सांगू इच्छितो की, सीईटी आणि सीमॅटच्या परीक्षेच्या तारखा बदलाव्यात. पुढील वर्षापासून शासनाची सीईटी कॅन्सल होणार आहे. सीमॅट ही परीक्षा ॲपटॅक सारख्या प्रायव्हेट केंद्राकडून घेतली जाणार आहे. त्यामुळे याबाबतीत देखील पुनर्विचार व्हावा अशी मी राज्य शासनाला विशेष उल्लेखाच्या निमित्ताने विनंती करीत आहे.

---

..7..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :आयव्हीएफ सरोगसी तंत्रज्ञानाच्या संदर्भात कायदा करण्याबाबत

**मु. शी.**:आयव्हीएफ सरोगसी तंत्रज्ञानाच्या संदर्भात कायदा करणे याबाबत श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री. हेमंत टकले सावंत यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

गर्भाशयात दोष असणे, वारंवार गर्भपात होणे, इत्यादी कारणामुळे मूल होत नसलेल्या जोडप्यांसाठी दुस-या एखाद्या स्त्रीचे गर्भाशय भाडयाने घेवून आयव्हीएफ सरोगसी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मूल होत नसलेल्या जोडप्यांसाठी मूल जन्माला घालण्यात येणे, यासाठी अतिशय गरीब घरातील स्त्रिया आपले गर्भाशय भाडयाने देत असणे, कमी पैशात सरोगसी माता उपलब्ध होत असल्यामुळे परदेशी जोडपे राज्यात विशेषत: मुंबईला प्राधान्य देणे, आपल्या राज्यात सरोगसी संदर्भात कोणताही कायदा नाही त्यामुळे सरोगसी मातेला त्याचा कोणताही उपयोग होत नसून सरोगसी माते संदर्भात कायदा करण्याची व त्याची अंमलबजावणी करण्याची या क्षेत्रात काम करणा-या तज्ज्ञ मंडळी डॉक्टरांची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो विशेष उल्लेख मांडलेला आहे त्यासंदर्भात मी आजच अशासकीय विधेयक मांडलेले असल्यामुळे मी सन्माननीय सदस्यांचे अभिनंदन करतो. या विधेयकामध्ये वेगवेगळया राज्याचे तसेच केंद्राच्या प्रपोज बिलाचा अभ्यास करुन अशासकीय विधेयक मी मांडलेले असून या विधेयकाची अतिशय गरज आहे.

----

..8..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पू. शी.** :संवर्गनिहाय 52 टक्के आरक्षण पूर्ण केलेल्या शाळांना व संस्थांना आरक्षणाचे बंधन लागू न करणे

**मु. शी.** :संवर्गनिहाय 52 टक्के आरक्षण पूर्ण केलेल्या शाळांना व संस्थांना आरक्षणाचे बंधन लागू न करणे याबाबत रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती ( श्री. रमेश शेंडगे )** : मा□□य सदस्य श्री.रामनाथ मोते यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

महाराष्ट्र खाजगी शाळा सेवा शर्ती नियमावली 1981 च्या नियम 9 अन्वये सरळ सेवा भर्तीसाठी राज्यामध्ये 52 टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. शासनाच्या निर्णयानुसार प्रवर्गनिहाय आरक्षणाच्या टक्केवारी बरोबरच संवर्ग निहाय आरक्षणाची टक्केवारी विचारात घेतली जाते. एखाद्या संवर्गात 52 टक्के आरक्षण पूर्ण झाले असल्यास आरक्षणाचे बंधन टाकणे योग्य होणार नाही. सामान्य प्रशासन विभागाने संवर्गातील 52 टक्के आरक्षण पूर्ण झाल्यास आरक्षणाची सक्ती करण्यात येऊ नये असे आदेश काही संस्थांना दिलेले आहेत. हा प्रश्न एका संस्थेचा नसून तो सर्व शैक्षणिक संस्थाचा असल्याने सर्वांसाठी सर्वंकष आदेश निर्गमित होणे अपेक्षित आहे. या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनास विनंती आहे की, संवर्गनिहाय 52 टक्के आरक्षण पूर्ण केलेल्या शाळांना व संस्थांना आरक्षणाचे बंधन लागू करण्यात येऊ नये व तशा प्रकारचे आदेश शासनाने तातडीने काढावेत अशा प्रकारची विनंती विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी करीत आहे.

----

यानंतर श्री. सरफरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जनगणनेमध्ये ओबीसी समाजाची वेगळी नोंद करणे

**मु.शी.**: जनगणनेमध्ये ओबीसी समाजाची वेगळी नोंद करणे याबाबत ॲड.उषा दराडे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"भारत हा खंडप्राय देश आहे, अनेक प्रांत, अनेक भाषा व विविध जातींचे हे राज्य तरीही अखंड आहे, देशातील अल्पसंख्याक, अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जाती-भटक्या जमाती व ओबीसीच्या सर्व घटकांना न्याय देणे आवश्यक असणे, जनगणनेमध्ये ओबीसीचा वेगळा कॉलम असावा व त्याची वेगळी नोंद असावी ही देशातील जनतेची अनेक वर्षापासूनची मागणी असणे, तरीही जनगणनेमध्ये ओबीसीची वेगळी नोंद न होणे यासाठी महाराष्ट्र शासनाने लोकसंख्येवर आधारीत या जनगणनेमध्ये ओबीसीची वेगळी नोंद करावी अशाप्रकारची शिफारस केंद्र सरकारकडे करण्याची आवश्यकता आहे या करिता मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मानवी गिनीपीगना भरपाई देण्यासाठी कायद्यात तरतूद करणे

**मु.शी.**: मानवी गिनीपीगना भरपाई देण्यासाठी कायद्यात तरतूद करणे याबाबत श्री. मोहन जोशी, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, जगण्या-मरणाच्या संघर्षाची हातातोंडाची लढाई सामान्यांच्या जीवावर उठली आहे. भारतीय औषधनिर्मिती कंपन्यांकडून तयार होणारी नवी औषधे किंवा परदेशातून आयात केलेल्या नव्या औषधांच्या चाचणीत गेल्या तीन वर्षात देशभरात तब्बल 1600 लोकांना आपला जीव गमवावा लागला. यातील बहुतांशी सर्वसामान्य आहेत. धक्कादायक गोष्ट म्हणजे, यातील अवघ्या 22 लोकांच्याच कुटुंबीयांना भरपाई मिळाली आहे, आणि ही भरपाई देखील अगदी फुटकळ अन् किरकोळ आहे.

औषध निर्मिती कंपन्यांकडून वापर होणाऱ्या "मानवी गिनीपीग" चे आरोग्य, त्यांच्यावरील उपचार, प्रयोगादरम्यान होणारे मृत्यू या संदर्भात 500 पेक्षा जास्त माहिती अधिकाराखाली रमेश वर्मा यांनी केंद्रीय सार्वजनिक आरोग्य महासंचालकांकडे आजवर 500 तक्रार अर्ज केले होते. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे "मानवी गिनीपीग" ना भरपाई देण्यासंदर्भात राज्यातील कायद्यामध्ये तरतूद नसल्यामुळे मागील तीन वर्षात देशभरात तब्बल सोळाशे लोकांना आपला जीव गमवावा लागलेला असणे, भारतीय औषध निर्मिती कंपन्याकडून तयार होणारी नवी औषधे किंवा परदेशातून आयात केलेल्या औषधांच्या चाचणीत या सोळाशे लोकांना आपला जीव गमवावा लागून यातील फक्त 22 लोकांच्या कुटुंबीयांना किरकोळ भरपाई मिळाली असणे, या प्रकरणी शासनाने त्वरीत कार्यवाही करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे करीत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पुणे महानगरपालिकेने अपंग बिगारी सेवकांना सेवेत कायम न करणे

**मु.शी.**: पुणे महानगरपालिकेने अपंग बिगारी सेवकांना सेवेत कायम न करणे याबाबत श्री.मोहन जोशी, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"अपंग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, 112125 याच्या कलम 38 ग नुसार अपंग व्यक्तींना अनिवार्यपणे सेवेत संधी देण्याबाबत तरतूद असून पुणे महानगरपालिकेमध्ये अपंग बिगारी सेवकांची नेमणूक करण्यात आलेली असणे, परंतु या सेवकांना नेमणूक काळापासून आजतागायत कायम सेवक म्हणून सेवेत समाविष्ट करण्यात आलेले नाही ही बाब माहे नोव्हेंबर 2011 च्या अखेरीस उघडकीस येणे. लोकप्रतिनिधींनी वारंवार पुणे महानगरपालिकेकडे निवेदन देऊनही अद्यापही महानगरपालिकेने अपंग बिगारी सेवकांना सेवेत कायम न केल्यामुळे या अपंग बिगारी सेवकांच्या कुटुंबीयांच्या व मुलांच्या पालनपोषणाची निर्माण झ ाालेली समस्या व त्यामुळे पुणे परिसरातील जनतेत पुणे महानगरपालिकेच्या प्रशासनाविषयी पसरलेला असंतोष या प्रकरणी शासनाने त्वरीत कार्यवाही करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्य शासनाकडून आधारश्रमातील मुलांना देण्यात येणाऱ्या अनुदानामध्ये कपात करणे

**मु.शी.**: राज्य शासनाकडून आधारश्रमातील मुलांना देण्यात येणाऱ्या अनुदानामध्ये कपात करणे याबाबत श्री.संदिप बाजोरिया, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.संदिप बाजोरिया यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संदीप बाजोरिया (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्य शासनाच्या आधारश्रमातील मुलांना प्रत्येकी दीड हजार रुपये प्रमाणे देण्यात येणाऱ्या अनुदानामध्ये कपात करुन 12 ऑक्टोबर 2011 पासून हे अनुदान 500 रुपयांनी कमी करणे चाईल्ड केअर कॉपर्स नावाने प्रत्येक दत्तक मुलामागे 50हजार रुपयांचा निधी उभारण्याची शासनाची सूचना म्हणजे अनाथ मुलांचे संगोपन करणाऱ्या आधारश्रमांना खाजगीकरणाचा रस्ता दाखविण्यात येणे, सन 2004 मधील महागाई आणि सन 2011 मधील महागाई पहाता हे अनुदान वाढविण्याची आवश्यकता. दुसरीकडे किमान सोयी-सुविधांसाठी आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य शासनाकडून मिळणाऱ्या तुटपुंज्या व अपुऱ्या निधीमुळे काळजी व संरक्षणाची जबाबदारी असलेल्या राज्यातील बालगृहातून सुमारे 90 हजार बालकांची होत असलेली हेळसांड महाराष्ट्र बाल न्याय अधिनियम 2000 या अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी वय 6 ते 18 वयोगटातील बालकांचे बालगृहामध्ये संगोपन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतन व बालगृहाच्या इमारतींना भाडे मिळत नसल्यामुळे बालकांच्या पुनर्वसन कार्याला बसत असलेला खीळ, लहान मुलांचे संगोपन करणारे आधारश्रम व 6 ते 18 वयोगटातील बालकांचे काळजी संगोपन करणारी बालगृहे यांच्या मागण्यांबाबत शासनाने तत्काळ लक्ष घालून या चांगल्या योजनांना प्रोत्साहन द्यावे अशी विशेष उल्लेखाव्दारे मी मागणी करीत आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील जनतेला आरोग्याच्या सुविधा प्राप्त होण्यासाठी आरोग्य अधिकार कायदा करण्याची आवश्यकता

**मु.शी.**: राज्यातील जनतेला आरोग्याच्या सुविधा प्राप्त होण्यासाठी आरोग्य अधिकार कायदा करण्याची आवश्यकता याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"मानवी हक्कातील वैश्विक घोषणेतील कलम 25 (1) नुसार जीवन जगताना आजारपणाच्या वेळी अधिक सुरक्षा मिळविण्याचा प्रत्येकाला अधिकार असणे, 1996 मधील आर्थिक, सामाजिक, आणि सांस्कृतिक हक्कांच्या आंतरराष्ट्रीय करारनाम्यानुसार आजारपणामध्ये सर्वांना वैद्यकीय सेवा व दक्षता मिळेल अशी परिस्थिती निर्माण करणे, ही सरकारची जबाबदारी असल्याने देशातील नागरीकांना योग्य त्या आरोग्याच्या सुविधा मिळण्यासाठी आरोग्य अधिकार कायदा करण्याचे केंद्र शासनाकडून राज्य शासनाला निर्देश देण्यात येणे, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक निर्देशाप्रमाणे राज्यातील जनतेला आरोग्याचा अधिकार प्राप्त व्हावा म्हणून लोकलेखा समितीने अभ्यासपूर्ण अहवाल शासनास सादर करुनही या समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीस राज्य शासनाच्या आरोग्य विभागाकडून टाळाटाळ करण्यात येणे, राज्यात वैद्यकीय सेवेचे व्यावसायिकीकरण झाल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध न होणे, पैशाअभावी कोणत्याही रुग्णाला वैद्यकीय सेवा नाकारण्यात येऊ नये तसेच, आर्थिकदृष्टया कमकुवत रुग्णांना आवश्यक ते उपचार मिळण्यासाठी देशातील जनतेला घटनेने दिलेल्या अधिकारानुसार राज्यात आरोग्य अधिकार कायदा करण्यासाठी राज्य शासनामार्फत कार्यवाही करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे. धन्यवाद.

-----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: चर्मकार समाजाच्या कल्याणासाठी "चर्मकार आयोगाची" स्थापना करणे

**मु.शी.**: चर्मकार समाजाच्या कल्याणासाठी "चर्मकार आयोगाची" स्थापना करणे याबाबत श्री. सुभाष चव्हाण,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"देशातील पंजाब, उत्तर प्रदेश, राजस्थान आदी राज्यांमध्ये जवळपास 30 टक्के मागास व आर्थिकदृष्टया अतिशय गरीब असलेल्या चर्मकार समाजाचे कल्याणासाठी व त्यांच्या प्रगतीसाठी "चर्मकार आयोगाची" स्थापना करण्याचे केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे. भारतातील एकूण लोकसंख्येच्या 20 ते 30 टक्के चर्मकार समाजांची लोकसंख्या असून या समाजातील आर्थिक व सामाजिक दृष्टया प्रगती व्हावी, त्यांचा विकास व्हावा यासाठी सामाजिक समता वर्षानिमित्त "चर्मकार आयोगाची" स्थापना करण्यासाठी केंद्र शासनाकडे राज्य शासनाने शिफारस करावी व त्यासंबंधीचा पाठपुरावा करुन या समाजाला योग्य तो "सामाजिक न्याय" द्यावा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे".

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्य शासनाने वक्फ बोर्डाचे गठन करुन अल्पसंख्यांक समाजाला न्याय देणे

**मु.शी.**: राज्य शासनाने वक्फ बोर्डाचे गठन करुन अल्पसंख्यांक समाजाला न्याय देणे याबाबत श्री. जैनुद्दीन जव्हेरी,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"महाराष्ट्र राज्यात (अल्पसंख्याक) वक्फ बोर्डाचे मागील तीन वर्षापासून गठन झालेले नाही. सदस्यांची मुदत संपली असताना सुध्दा जुन्या काही सदस्यांनी वक्फ बोर्डाचे काम सुरु ठेवले आहे. ऑक्टोबर, 2011 मध्ये माननीय हायकोर्टाव्दारे वक्फ बोर्ड गठन व वक्फ बोर्डाच्या कामाबद्दल नाराजी व्यक्त करुन वक्फ बोर्ड रद्द केले होते, त्यावर शासनाने माननीय सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती मिळविलेली आहे. आमदारांमधून मागील दोन-तीन वर्षापासून वक्फ बोर्डामध्ये सदस्य म्हणून निवड झालेली नव्हती. जुलै, 2011 मध्ये आमदारांमधून माझी निवड निवडणुकीव्दारे करण्यात आली असूनही माझा वक्फ बोर्डाचे सदस्य म्हणून शासनाने जी.आर.काढलेला नाही. परंतु काही ठराविक सदस्य शासनाच्या मर्जीनुसार वक्फ बोर्डाचे काम करुन अनेक अनियमितता करीत आहेत. याबद्दल वारंवार मी सचिव, अल्पसंख्याक व वक्फ बोर्ड यांना कळविले आहे. तरी वक्फ बोर्ड गठनसाठी कोणतीही कारवाई होत नाही. शासनाने या बाबत त्वरीत दखल घेऊन वक्फ बोर्ड गठन करावे व अल्पसंख्याक समाजाला न्याय द्यावा, या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सोनाई कन्स्ट्रक्शनचे मोठे ट्रक बल्लारपूर पोलीस स्टेशन जवळ उभे केल्यामुळे वाहतुकीची कोंडी होणे.

**मु. शी.** : सोनाई कन्स्ट्रक्शनचे मोठे ट्रक बल्लारपूर पोलीस स्टेशनजवळ उभे केल्यामुळे वाहतुकीची कोंडी होणे याबाबत श्री.जैनुद्दीन जव्हेरी वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे)** : माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

श्री.यशवंत ओंबासे, पोलीस निरीक्षक, बल्लारपूर, जि.चंद्रपूर यांच्या मुलाच्या नावाने बल्लारपूर (जि.चंद्रपूर) तालुक्यातील सोनाई कन्स्ट्रक्शन कंपनी कार्यरत आहे. त्यांनी आपल्या अधिकाराचा वापर करुन अनेक गैरमार्गाने काम केलेले आहे. सोनाई कन्स्ट्रक्शन कंपनीचे मोठमोठे ट्रक नं.एमएमच-34 एबी-1847, 1848, 1849 व 2688 असून (हायवे) पोलीस स्टेशनच्या आवारात उभे करण्यात येतात व त्याच ठिकाणी त्यांची सर्व्हीसिंगही करण्यात येते. सदर ट्रकव्दारे मुरुम व मातीची ओव्हरलोड वाहतूक करण्यात येत असल्यामुळे वाहतुकीची मोठया प्रमाणात कोंडी होऊन अनेकदा अपघात होऊन त्यात निरपराध नागरिकांचा नाहक बळी जात असतो. यामुळे माननीय स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीक यांनी संबंधितांकडे वारंवार तक्रार करण्यात येऊनही याबाबत कोणतीची कार्यवाही होत नाही. सदर कंपनी बल्लारपूर पोलीस अधिकारी यांच्या मुलाच्या नावावर असल्यामुळे ते आपल्या पदाचा वापर करीत आहेत. यामुळे वारंवार तक्रार करुनही त्यावर कारवाई होत नाही. यामुळे तेथील नागरिकांमध्ये निर्माण होत असलेला असंतोष व संतापाची भावना, अशा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

-----

. . . .एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : पूर्व प्राथमिक शिक्षणाचे सर्वंकष धोरण ठरविण्यासाठी समिती गठीत करणे

**मु.शी.** : पूर्व प्राथमिक शिक्षणाचे सर्वंकष धोरण ठरविण्यासाठी समिती गठीत करणे याबाबत श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□□य सदस्य श्री. रामनाथ मोते, वि.प.स.यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

केंद्र शासनाचा बालकांच्या मोफत व सक्तीचे शिक्षण अधिनियम 2009 राज्य शासनाने स्वीकृत केला असून त्याची अंमलबजावणी राज्यात सुरु झाली आहे.

या विधेयकाच्या अनुषंगाने राज्यातील इ. 1 ली ते इ. 8 वी पर्यन्तच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी व टिकविण्यासाठी वेगवेगळया उपाय योजना सुरु केल्या आहेत. सदरचा अधिनियम 6 ते 14 वर्षे वयोगटाच्या विद्यार्थ्यांसाठी लागू आहे.

याच विधेयकामध्ये 3 ते 6 वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी संबंधित राज्य शासनावर टाकली आहे. त्यामुळे प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षणाबरोबरच पूर्व प्राथमिक शिक्षणाची जबाबदारीही राज्य शासनाची आहे. त्या अनुषंगाने पूर्व प्राथमिक शाळेचा अभ्यासक्रम तयार करणे शिक्षकांची पात्रता व प्रशिक्षणाचा निर्णय घेणे, शिक्षकांचे वेतन, कामाचे तास व पूर्व प्राथमिक शाळांचे व्यवस्थापन या बाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे.

या विशेष उल्लेखाच्या मुद्याव्दारे शासनास विनंती आहे की, पूर्व प्राथमिक शिक्षणाचे सर्व समावेशक व सर्वंकष धोरण ठरविण्यासाठी समिती गठीत करुन समितीच्या अहवालानुसार कार्यवाही व उपाय योजना व्हावी ही विनंती आहे."

------



APR/ MMP/ D/ 13:10

**पृ.शी.** : महाराष्ट्र राज्यातील महामार्गावर वाढत असलेले अपघाताचे प्रमाण.

**मु.शी.** : महाराष्ट्र राज्यातील महामार्गावर वाढत असलेले असलेले अपघाताचे प्रमाण याबाबत श्री.चंद्रकांत पाटील वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील, वि.प.स.यांनी विशेष उल्लेखा संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, महामार्गावर होणारे अपघात यामध्ये संपूर्ण भारतामध्ये, जगामध्ये महाराष्ट्र राज्य हे चौथ्या क्रमांकावर आहे. महामार्गावर सर्वात जास्त अपघात होणाऱ्या देशातील पहिल्या 10 शहरांमध्ये महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, नवी मुंबई आणि नाशिक अशी तब्बल सहा शहरे आहेत. राज्यातील महामार्गावर अपघाताच्या आकडेवारीनुसार 2000 साली राज्यात 71 हजार 550 अपघात झाले आणि त्यामध्ये 9840 लोकांना प्राण गमवावा लागला आहे. तसेच 2010 मध्ये 71,289 अपघात झाले आणि त्यामध्ये 12,340 लोकांना जीव गमवावा लागला. यापेक्षाही जास्त संख्या 2011 मध्ये आहे, त्यावेळी अनेक अपघात झाले आहेत.राष्ट्रीय महामार्ग दिवसेंदिवस धोक्याचे बनत असणे, या गंभीर प्रश्नाबाबत शासनाने आरटीओ, वाहतुक पोलीस किंवा राज्य महामार्ग पोलीस यांच्यावर अंकुश ठेऊन तातडीने उपाययोजना व निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. तसेच मला असे वाटते की, आपण ज्याप्रकारचे महामार्ग करीत आहोत आणि त्याठिकाणी ज्या वेगाने गाड्या जात आहेत त्याबाबत कोणत्याही प्रकारचे नियम नसल्यामुळे अपघातांची संख्या वाढत चालली आहे. त्यामुळे या विशेष उल्लेखाव्दारे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो की, महामार्गावर मोठया प्रमाणात होणारे अपघात कमी व्हावेत आणि ते टाळावेत यासाठी काही ना काही उपाययोजना होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आज सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचा अशासकीय ठरावही आहे. या सगळया महामार्गावर अपघात झाल्यानंतर तेथे कोणत्याही प्रकारची वैद्यकीय सुविधा उपलब्ध होत नाही. त्याकडेही मी या विशेष उल्लेखाव्दारे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. धन्यवाद.



**पृ.शी.** : राज्यामध्ये प्रौढ साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आवश्यक असलेल्या साक्षर भारत योजनेची
अंमलबजावणी न होणे

**मु.शी.** : राज्यामध्ये प्रौढ साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी
आवश्यक असलेल्या साक्षर भारत योजनेची
अंमलबजावणी न होणे या बाबत श्री.मनिष जैन
वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.मनिष जैन यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मनिष जैन (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"प्रौढ साक्षरेतेचे प्रमाण वाढविण्यासाठी केंद्र सरकारने साक्षर भारत ही योजना वर्षभरापूर्वी सुरु केलेली असूनही निरंतर शिक्षण विभाग वर्षभरापासून नियोजनाच्या फेऱ्यात अडकून पडल्यामुळे या कार्यक्रमाची राज्यात अद्यापही अंमलबजावणी झालेली नसणे, सन 2001 च्या जनगणनेनुसार ज्या राज्यांमध्ये महिला साक्षरतेचे प्रमाण 50 टक्क्याहून कमी आहे अशा राज्यांमध्ये साक्षर भारत योजना राबविण्याचा केंद्र शासनाने निर्णय घेतलेला असून या मोहिमेसाठी केंद्राने दिलेला 9 कोटी 36 लाख रुपयांचा निधी निरंतर शिक्षण विभागाच्या लाल फितीतील कारभारामुळे विनावापर पडून असणे, विदर्भातील तीन तर मराठवाड्यातील सात जिल्ह्यांच्या या योजनेत समावेश असून तब्बल 16 लाख निरक्षरांना या योजनेतून साक्षर केले जाण्याचे उद्दिष्ट असणे, या योजनेची अंमलबजावणी केली जात नसल्याने निरक्षरांना शिकविण्यासाठी लागणाऱ्या लाखावर बेरोजगारांवर तर प्रौढ निरक्षरांनाही साक्षर होण्यासाठी प्रतिक्षा करण्याची आलेली वेळ, शासनाने प्रेरकांची नियुक्ती करण्यासाठी आदेश देऊन ह्या योजनेची तत्काळ अंमलबजावणी करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

----

. . . .एन-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) N-5

APR/ MMP/ D/ 13:10

**सभागृहाच्या कामकाजाबाबत**

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 48 - मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक, 2011 मांडण्यास मला सभागृहाची अनुमती मिळावी . . . .

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेवर अशासकीय कामकाज दाखविण्यात आले आहे. असे कसे चालेल ? हे बरोबर नाही.

**तालिका सभापती** : आता विधेयकावरील चर्चा सुरु होईल. माननीय मंत्री महोदयांना विधेयक मांडू द्यावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, त्यापूर्वी आमचे म्हणणे ऐकावे.

**तालिका सभापती** : आता या विधेयकावरील चर्चा सुरु होईल. आपण पुढे गेलो आहोत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**तालिका सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवर शासकीय विधेयके दाखविण्यात आलेली आहे. त्यांचे म्हणणे मांडून झाल्यानंतर आपण बोलावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आमचे म्हणणे एवढेच आहे की, कामकाज सल्लागार समितीमध्ये कामकाजाचा कार्यक्रम ठरविला जातो. त्यानंतर आपण गरजेप्रमाणे सदरहू कामकाज पुढे-मागे करतो हेही मला मान्य आहे. कापूस, सोयाबीन इ.महत्वाच्या विषयांवरील चर्चेमध्ये काही दिवस गेल्यामुळे थोडे कामकाज पुढेमागे झाले तरी देखील तुम्ही ते रेटून पूर्ण केले तो भाग वेगळा.तसे झालेले आहे.मात्र आपली बैठकीच्या संदर्भातील जी दिनदर्शिका आहे,त्यानुसार शनिवार हा अशासकीय कामकाजाचा दिवस असतो. खरे म्हणजे अशासकीय कामकाज शुक्रवारी असते. परंतु आपण कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये जाणीवपूर्वक शुक्रवारी शासकीय कामकाज घेण्याचे ठरविले आणि शनिवारी अशासकीय कामकाज करावयाचे असे ठरविले. तसेच अनेक लोक प्रतिनिधींचे महिना-महिनाभर अगोदर कार्यक्रम ठरलेले असतात.त्यामुळे ते सदनामध्ये उपस्थित राहू शकत नाहीत.म्हणून आपण एक अशी सोय केली की,ज्यांनी आपले कार्यक्रम अगोदर ठरविलेले नाहीत,त्यांनी सदनामध्ये उपस्थित रहावे आणि ज्यांना अगोदर ठरविलेले कार्यक्रम टाळता येणे शक्य नसल्याने ते सदनामध्ये उपस्थित राहू शकत नाहीत,उदाहरण द्यावयाचे तर आदरणीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब,आदरणीय सन्माननीय सदस्य सर्वश्री.दिवाकर रावतेसाहेब



श्री.विनोद तावडे . . . .

रामदास कदमसाहेब हे अगोदर ठरलेल्या कार्यक्रमासाठी गेलेले आहेत. त्यामुळे अशी जी महत्वाची बिले असतात त्यासंबंधात काल किंवा परवा उल्लेख केला असता तरी त्याबाबत चर्चा केली असती. परंतु आजच्या कामकाज पत्रिकेवर दोन विधेयके दाखविण्यात आली आहेत. आपला आग्रह असेल तर पहिल्या क्रमांकावरील "सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 48 - मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक, 2011 असून त्याबाबत फार चर्चा करावयाची नाही, ते विधेयक चर्चेसाठी घेण्यास आमची एकवेळ हरकत नाही.परंतु दुसऱ्या क्रमांकावर दाखविण्यात आलेले सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक - 52 - मुंबई मुद्रांक (सुधारणा) विधेयक 2011 यावर सर्वांना चर्चा करावयाची आहे आणि ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चा करावयाची आहे ते सदनामध्ये असावयास पाहिजेत. त्यामुळे मला असे वाटते की, पहिल्या क्रमांकाचे विधेयक चर्चेसाठी घ्यावे आणि दुसऱ्या क्रमांकाचे विधेयक राखून ठेवण्यात यावे.

**तालिका सभापती** : माझे असे म्हणणे आहे की, पहिल्या क्रमांकाच्या विधेयकावरील चर्चा झाल्यानंतर जेवणासाठी सुट्टी घेऊ आणि त्यावेळी आपल्याला याबाबत चर्चा करुन काय करावयाचे ते ठरविता येईल.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**तालिका सभापती** : पहिल्या क्रमांकावरील विधेयक पूर्ण होऊ द्या.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आज दोन्ही विधेयके चर्चेसाठी घेऊ नयेत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेली विधेयके चर्चेसाठी कधी घ्यावयाची याबाबतीत सदनामध्ये चर्चेव्दारे किंवा सदनाच्या बाहेर दालनामध्ये चर्चा करुन ठरविले जाते.सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडेसाहेब यांनी सांगितले की,कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये ठरलेले होते की,अशासकीय कामकाजाच्या दिवशी शासकीय विधेयके चर्चेसाठी घ्यावयाची नाहीत. तरी देखील आपण कधी-कधी अपवाद म्हणून ते काम करतो, काही वेळेला गोंधळामध्ये देखील विधेयके मंजूर केली जातात. संसदेच्या नियमाप्रमाणे संसदेमध्ये गोंधळामध्ये कोणत्याही प्रकारचे विधेयक मंजूर होत नाही. याठिकाणी काही वेळेला ते रेटून नेतात. पण जर एखाद्या विषयावर आम्हाला बोलावयाचे असेल....सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब यांनी माननीय उप सभापती महोदयांना सांगितले होते की, उद्या विधेयकांवर चर्चा

करण्यात येऊ नयेत, ती पुढच्या वेळी घेण्यात यावीत. आम्ही सोमवारी बिले मंजूर करु. आम्ही आपल्याला सहकार्य करतो. मग आजच विधेयकावर चर्चा करण्याचा अट्टाहास कशासाठी केला जात आहे? मघाशी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडेसाहेबांनी सांगितले की, पहिले विधेयक चर्चेसाठी घेण्यात यावे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मुद्रांक शुल्क विधेयकाच्या संबंधात भाषण करावयाचे आहे आणि त्याप्रमाणे त्यांना बोलू द्यावे. अशा प्रकारे आम्ही एवढे कन्सीडर केल्यानंतर आपणही कन्सीडर करावे अशी माझी विनंती आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दोन शासकीय विधेयके दाखविण्यात आली आहेत. त्यापैकी एका विधेयकात जिल्हा परिषद ग्रामपंचायतीचे फक्त एक्स्टेन्शन आहे. त्यांना सन 2012 पर्यंत मुदत देण्यात आली होती ती मुदत संपल्यानंतर ज्यांच्या घरी शौचालय नाहीत त्यांचे मोठया प्रमाणात डिसक्वालिफिकेशन होईल म्हणून त्यासंबंधीचे एक विधेयक दाखविण्यात आलेले आहे. त्यानंतर मुद्रांक शुल्काच्या संदर्भातील दुसरे विधेयक आहे. या विधेयकावर सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे असे या ठिकाणी वारंवार सांगण्यात येत आहे. पण या विधेयकामध्ये नेमके काय आहे? हे विधेयक सन्माननीय सदस्यांनी पाहिलेले आहे काय? मुद्रांक शुल्काच्या बाबतीत ई-प्रदानाच्या माध्यमातून पेमेंट सिस्टिम करण्यात यावी एवढेच या विधयकामध्ये आहे. मग ते फ्रँकिंग असेल किंवा त्या संदर्भातील पेमेंट असेल ते ई-प्रदानाच्या माध्यमातून करण्यात यावे एवढेच या विधेयकामध्ये आहे. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांना मला या ठिकाणी विनंती करावयाची आहे की, या विधेयकामध्ये फार मोठा ड्रास्टिक बदल असता, मुद्रांक शुल्क कायद्यामध्ये काही बदल करावयाचा असता किंवा मुद्रांक शुल्काच्या बाबतीत काही नवीन धोरण स्वीकारावयाचे असते तर मी ते समजू शकलो असतो. पण या विधेयकामध्ये मुदांक शुल्क भरण्याबाबत अधिक व्यापक सुविधा उपलब्ध करुन द्यावयाची आहे आणि ती पारदर्शी आहे. फक्त ई-प्रदानाद्वारे मुद्रांक शुल्क भरता येईल एवढाच लिमिटेड स्कोप या विधेयकाचा आहे. समजा विधेयक फार मोठे असते, त्याचे दूरगामी परिणाम होणार असते तर मी ते मान्य केले असते. शेवटी विधिमंडळ हे कायदे मंडळ आहे. आजचा या आठवडयाचा सहावा दिवस आहे. या सहा दिवसात शिक्षण विभागाचे फक्त एक विधेयक मंजूर झालेले आहे. सभागृहाला माझी नम्र विनंती आहे की, या अधिवेशनामध्ये 20 विधेयके पारित करावयाची आहेत. विधानसभेच्या आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये 5 विधेयके दाखविण्यात आलेली आहेत त्यापैकी एक विधेयक मंजूर होऊन दुसऱ्या विधेयकावर चर्चा सुरु आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना या विधेयकावर बोलावयाचे आहे म्हणून सन्माननीय सदस्य आग्रह धरीत आहेत ही गोष्ट मला मान्य आहे. पण या विधेयकाचा स्कोप अतिशय लिमिटेड आहे. कर भरणाऱ्यांना पारदर्शी पणाने ही ई-प्रदानाची सोय उपलब्ध व्हावी इतके सोपे आणि सुटसुटीत असे हे विधेयक आहे. माझी विनंती आहे की, आजच्या कामकाज

..2...

श्री. हर्षवर्धन पाटील....

पत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेली दोन विधेयके आज पारित करण्यात यावीत. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे दिनांक 23 डिसेंबर, 2011 रोजी विरोधी पक्ष नेत्यांचा चार्ज घेणार आहेत, अगोदरच आपला इतका आग्रह असेल तर आम्हाला या पुढे प्रश्न पडणार आहे. सभागृहाचे कामकाज चालवावयाचे म्हटले तर आपल्याला सुसंवाद ठेवावा लागतो. ठीक आहे. सभापती महोदय, माझी विनंती आहे की, दोन विधेयके आहेत. ती अतिशय लहान आहेत. आज खूप मोठी विधेयके घ्यावयाची होती पण या आठवडयातील कामकाजाचा आजचा शेवटचा दिवस असल्यामुळे मोठी विधेयके दाखविणे योग्य होणार नाही म्हणून मी या संदर्भात माननीय उप सभापतींबरोबर चर्चा करुन दोन लहान विधेयके आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दाखविली आहेत. विधेयक मोठे असते तर मी देखील आग्रह धरला नसता.

डॉ. दीपक सावंत : आम्ही संसदीय कार्य मंत्र्यांचा मान ठेवून एक विधेयक पारित करण्यास तयार आहोत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी जे सांगितले आहे ते खरे आहे. मुद्रांक शुल्क विधेयक लहान आहे. जर हे विधेयक लहान असेल तर ते लगेच पारित होणार आहे. त्यामुळे सोमावरी फार कोणी न बोलता फक्त दोन-तीन वक्ते त्यावर बोलतील आणि त्यानंतर विधेयक पारित करण्यात येईल. हे विधेयक पारित करण्यासाठी जास्त वेळ लागणार नसेल तर ते आजच पारित करण्याचा अट्टहास का धरण्यात येत आहे? सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले आहे की, या विधेयकावर त्यांना बोलावयाचे आहे पण आज अशासकीय कामकाज असल्यामुळे त्यांना या विधेयकावर बोलता येणार नाही म्हणून ते आज सभागृहात अनुपस्थित आहेत. म्हणून या दोन विधेयकापैकी एक विधेयक आज पारित करण्यात यावे आणि दुसरे विधेयक राखून ठेवण्यात यावे अशी माझी सूचना आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे आणि सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी असे सांगितले की, "कामकाज सल्लागार समितीमध्ये अशासकीय कामकाज ठरविण्यात आलेले आहे" पण त्या पेक्षा जास्त सर्वाधिकार असणारे हे सभागृह आहे. या सभागृहाला पूर्ण अधिकार आहेत हा एक मुद्दा आणि दुसरा मुद्दा असा की, विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्य या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी कापसा बाबत बोलत

..3..



SMT/ D/ MMP/ 13:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे..

होते, दुसऱ्या दिवशीही कापसाबाबत बोलत होते ते जे-जे बोलत होते ते-ते ऐकण्याचे काम सत्ताधारी पक्षाने केलेले आहे. चर्चा घेण्यात यावी अशी सूचना करण्यात आली त्यापमाणे चर्चा घेण्यात आली. अगदी काल सुध्दा कर्नाटक राज्याच्या निषेधाचा ठराव पारित झाल्यानंतर कामकाज करण्यात येऊ नये अशी सूचना विरोधी पक्षाने केल्यानंतर या ठिकाणी सुरु करण्यात आलेले कामकाज मागे घेण्यात आले. एवढा आदर विरोधी पक्षाचा करण्यात येत असताना देखील कामकाजपत्रिकेमध्ये विधेयके दाखविण्यात आल्यानंतर प्रत्येक वेळी असे सांगण्यात येते की, ही विधेयके उद्या घेण्यात यावीत, दुसऱ्या दिवशी घेण्यात यावीत. आज केवळ एक सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत म्हणून मुद्रांक शुल्क या विधेयकावर चर्चा करावयाची नाही, असे सांगणे अतिशय चुकीचे आहे. या सभागृहाच्या कामकाजाचे पुष्कळ दिवस वाया गेलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांना विरोधी प्रक्ष नेत्यांच्या कारकीर्दीला अजून सुरुवात करावयाची आहे. मुद्रांक शुल्काचे विधेयक फार मोठया धोरणात्मक बदलाचे नाही, असे माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी सांगितलेले आहे. म्हणून ही विधेयके संमत करण्याच्या दृष्टीने सभापती महोदय, आपण निर्देश द्यावेत आणि विरोधी पक्षाने त्याला सहकार्य करावे, अशी विनंती करतो.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ MMP/ 13:20

**पृ. शी.** : मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायती समिती (दुसरी सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. XLVIII OF 2011.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958 AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961)

श्री. रणजित कांबळे ( पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 48. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,1958 आणि महाराष्ट्र जिल्हा पारिषदा व पंचायत समिती अधिनियम,1961 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** ( श्री. रमेश शेंडगे) : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. रणजित कांबळे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 48.मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,1958 आणि महाराष्ट्र जिल्हा पारिषदा व पंचायत समिती अधिनियम,1961 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 ( दोन्ही सम्मिलित ), विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 48 संमत करण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 48 संमत झाले आहे.

---

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ MMP/

**पृ. शी.** : मुंबई मुद्रांक (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. LII OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY STAMP ACT, 1958.)

श्री. प्रकाश सोळंके ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 52. मुंबई मुद्रांक अधिनियम, 1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, थोडया वेळापूर्वी या सभागृहात मी व सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय गट नेते श्री. दिवाकर रावते यांच्या भावना आणि त्यांची विनंती मांडलेली आहे. तेव्हा आपण त्यावर आपले रुलिंग द्यावे. आजचा दिवस अशासकीय कामकाजाचा असल्यामुळे हे विधेयक घेण्यात येऊ नये, आम्ही ते सोमवारी कमी वेळात पारित करु असे सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय गट नेते यांनी सांगितल्यानंतर सुध्दा त्यांची विनंती फेटाळून लावण्यात येत असेल तर आम्हाला तसे सांगण्यात यावे आणि त्यानंतर हे विधेयक घेण्यात यावे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

म्हणजे संसदीय कार्य मंत्र्यांना पुढे जी 20 बिले मंजूर करावयाची आहेत त्याबाबत विचार करता येईल. आम्ही जी एक साधी विनंती केली ती सुध्दा आपण मान्य करीत नाही. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जाताना आम्हाला स्पेसिफिक सांगितलेले आहे. माझी माननीय संसदीय कार्य मंत्र्यांना अजूनही विनंती आहे माननीय विरोधी पक्ष नेते आणि गट नेत्यांचे जे म्हणणे आहे त्याप्रमाणे आपण कामकाज करावे.

**तालिका सभापती** ( श्री. रमेश शेंडगे ) : माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी आपल्याला या संदर्भात विशद करुन सांगितलेले आहे.

श्री. विनोद तावडे : विधेयक पारित होईल की नाही ? बिल मांडावयाचे आहे याबद्दल काल ते काही बोलले नाहीत. म्हणून आमची विनंती आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या सदनाचा जास्त वेळ वाया जाऊ नये असे माझे मत आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे असतील सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत असतील, त्यांना सध्याचे जे विरोधी पक्ष नेते आहेत त्यांनी सांगितले की, या बिलाच्या संदर्भात आपण आपली भूमिका मांडावी. त्यांनी भूमिका मांडली. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी कदाचित सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत साहेबांना सांगितले असेल म्हणून त्यांनीही आपली भूमिका मांडली. माझे असे म्हणणे आहे की, यामध्ये जरी त्यांनी ती भूमिका मांडली असली तरी कदाचित सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांना किंवा माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांना हे बिल माहीत नसावे, असे माझे मत आहे. कदाचित त्यांना असे वाटले असेल की, मुद्रांक शुल्काचे विधेयक म्हणजे काही तरी नवीन कायदा आहे किंवा फार मोठी सुधारणा वगैरे असेल आणि कदाचित त्यामुळे ते तसे म्हणाले असावेत असे मला वाटते. पण हे अतिशय छोटे बिल आहे. जरुर आम्ही को-ऑर्डीनेशन करीत असतो. शेवटी सभागृहामध्ये विरोधी पक्षाला सुध्दा तेवढेच महत्व आहे. त्यांना सुध्दा आपल्याला बरोबर घेऊन जावे लागते.

काल विधानसभेत नागपूर महानगरपालिकेचे एक माठे बिल होते त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस यांनी आम्हाला विनंती केली. आम्ही ते बिल चर्चेला घेतले नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ....

कारण त्यांनी अशी विनती केली की, आम्हाला या बिलावर खूप बोलावयाचे आहे. ते बिल वाचल्यानंतर माझी सुध्दा खात्री पटली की, नागपूरचा जो कायदा आहे, 1960 ला जो नागपूर करार झाला त्या करारामध्ये त्या बिलाचा उल्लेख होता आणि त्या बिलामध्ये आपण सुधारणा करीत असल्यामुळे ते बिल खूप व्यापक आहे याची मला सुध्दा खात्री पटली. म्हणून मी स्वत: त्या सभागृहात सांगितले की, हे बिल आज घेऊ नका हे बिल आपण उद्या घेऊ. या ठिकाणी मुद्रांक शुल्कासंबंधीचे जे बिल आहे त्यामध्ये मुद्रांक शुल्काचे पेमेंट ई-गव्हर्नन्सच्या माध्यमतून भरण्यास परवानगी देत आहोत. यामध्ये फ्रॅन्कींग वगैरे बाबी आहेत. हे बिल अत्यंत सुस्पष्ट आणि सोपे आहे. यासाठी आपण प्रतिष्ठेचा प्रश्न करु नये असे मला वाटते. जर फार मोठे बिल असते तर ते मी मान्य केले असते. यापुढे येणारी जी बिले आहेत त्यातील दोन-तीन बिले खरोखरच मोठी आहेत आणि त्यावर व्यापक चर्चा होणे आवश्यकच आहे. हे छोटे बिल आहे आणि आपण सर्व सन्माननीय सदस्य थांबलेलो असताना हे बिल घ्यावे, अशी माझी विनंती आहे. यामध्ये तुमचा-माझा विषय आहे अशातील भाग नाही. आपण या आठवड्यामध्ये काय कामकाज केले ? सोमवारपासून शनिवारपर्यंत आपले काय कामकाज झाले ? फक्त कापूस एके कापूस या बाबत चर्चा झाली.

डॉ. दीपक सावंत : ती चर्चा महत्वाची होती.

श्री. हर्षवर्धन पाटील : ती चर्चा महत्वाची होती हे मान्य करतो. म्हणूनच आम्ही 2 हजार कोटी रुपये दिले. आम्ही काही दिले नाही असे नाही. सभापती महोदय, माझी विनंती आहे. काल बेळगाव महानगरपालिकेचा प्रश्न उपस्थित झाला. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे म्हणाले की आपण बरखास्तीपर्यंत गेले पाहिजे. तरी सुध्दा काल आपण तो ठराव केला आणि घटनात्मक कारवाई करावी अशा प्रकारचा निर्णय आपण घेतला. काल सर्व सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ठराव झाल्यानंतर कोणतेही कामकाज करावयाचे नाही. काल आम्ही आपले ऐकले. विधानसभेमध्ये सुध्दा माननीय मुख्यमंत्र्यांनी मला सांगितले की, आज आपण हा ठराव केलेला आहे आणि मला असे वाटते की आपण सभागृहाचे कामकाज तहकूब केले पाहिजे. त्याप्रमाणे कामकाज तहकूब केले. विधान परिषदेचेही कामकाज आपण काल तहकूब केले. आज सुध्दा शनिवार हा

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील .....

सुट्टीचा दिवस असताना आपण विशेष बैठक ठेवलेली आहे. खरे म्हणजे मूळ कामकाज पत्रिकेमध्ये आज कामकाज नव्हते. आज कामकाज घेण्याचा निर्णय आपण कामकाज सल्लागार समितीमध्ये घेतला. हे छोटे बिल आहे. आम्ही माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना विनंती करुन सांगू. जर फार मोठे बिल असते तर मीच प्रस्ताव आणला असता की आपण बिल सोमवारी घेऊ. माझी अशी विनंती आहे की, एवढे बिल आपण पूर्ण करावे. माननीय मंत्री महोदयांनी बिल मांडलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांना सांगू इच्छितो की, आमच्या आपल्याला शुभेच्छा आहेत. आपल्याला आता विरोधी पक्ष नेत्यांच्या जागेवर नेऊन बसवावयाचे आहे. आपले सहकार्य आम्हाला नेहमी लागणार आहे. या अधिवेशनात जरी नाही तरी पुढच्या अधिवेशनात आपले सहकार्य जरुर लागणार आहे. आपण 23 तारखेला कार्यभार स्वीकारणार आहात आणि तो या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. आमची आपल्याला विनंती आहे. आपण आज म्हणालात तरी आम्ही आज सुध्दा आपल्याला त्या जागेवर नेऊन बसविण्यास तयार आहोत.

श्री. विनोद तावडे : आपल्या मेहरबानीवर नाही.

श्री. हर्षवर्धन पाटील : आपण सभागृहाच्या मेहरबानीवर त्या ठिकाणी बसणार आहात. आपण जे काम करतो ते सभागृहाच्या मेहरबानीवर करतो. त्यामध्ये माझ्या मेहरबानीचा प्रश्न नाही.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांना सांगू इच्छितो की, माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी आपल्याला परिस्थिती विशद करुन सांगितलेली आहे. त्यामुळे आपण या बिलावरची चर्चा सुरु करु.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. स. वि. क्र. 52 - मुंबई मुद्रांक अधिनियम, 1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, नोंदणी आणि मुद्रांक विभाग हा राज्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा विभाग आहे. या विभागाच्या माध्यमातून दस्तांची नोंदणी करणे, दस्त जतन करणे, मुद्रांक शुल्क रुपाने महसूल संकलित करणे, राज्यातील स्थावर मिळकतीचे वार्षिक मूल्य दरतक्ते तयार करणे आणि विवाह नोंदणी अशी सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीने महत्वाची असलेली कामे हाताळली जातात. आपण राज्याचा विचार केला तर सेल्स टॅक्स किंवा व्हॅट नंतर राज्य शासनाच्या तिजोरीमध्ये जास्तीत जास्त उत्पन्नाची भर घालणारा दुसऱ्या क्रमांकचा उत्पन्नाचा स्त्रोत आहे. मागच्या वर्षी जवळजवळ 14 हजार कोटी रुपये रुपयांचे उत्पन्न या विभागाने राज्य शासनाच्या तिजोरीत जमा करण्याचे काम केलेले आहे. दुसरे महत्वाचे म्हणजे महाराष्ट्रातील जवळजवळ 1 लाख लोकांचा कामाच्या निमित्ताने संपर्क येणारा हा विभाग आहे. म्हणून या विभागाच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसाला जास्तीत जास्त सुविधा देणे हे निश्चितपणे अपेक्षित आहे. या जास्तीच्या सुविधा देण्याच्या संदर्भातील हे छोटे विधेयक असले तरी अतिशय महत्वाचे विधेयक आहे हे मी या निमित्ताने आपल्याला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 10 मधील तरतुदीनुसार मुद्रांक शुल्क कसे अदा करता येईल याबाबतची तरतूद आहे. त्यानुसार आतापर्यंत मुद्रांक शुल्काचे पेमेंट "by means of franking machine, by way of cash, by demand draft or by pay order" अशा चार माध्यमातून करण्याला कायद्याने मुभा आहे. आता आपण यामध्ये सुधारणा आणून "by e-payment" अशा प्रकारची सुधारणा कायद्यामध्ये करीत आहोत. त्याच्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक पेमेंटव्दारे हे पेमेंट करण्याची सुविधा सर्वसामान्य नागरिकांना उपलब्ध होईल. त्याच्या अनुषंगाने या ठिकाणी स्टॅम्पच्या व्याख्येमध्ये सुध्दा आपल्याला बदल करावा लागणार आहे. आतापर्यंत सेक्शन दोन मध्ये पुढील प्रमाणे नमूद केले आहे.

"(k) "impressed stamp" includes,-

(i) labels affixed and impressed by the proper officer,

(ii) stamps embossed or engraved on stamp paper;

...5/-

RDB/ MMP/ D/

श्री. प्रकाश सोळंके ...

(iii) impression by franking machine;

(iv) impression by any such machine as the state Government may, by notification in the *Official Gazette*, specify;"

यामध्ये आता आपण "receipt of e-payment" हे समाविष्ट करीत आहोत आणि त्याला आता स्टॅम्प समजावे अशी सुधारणा या विधेयकाच्या माध्यमातून करीत आहोत.

सभापती महोदय, कलम 69 मध्ये रुल्स बनविण्याबाबत सरकारला अधिकार दिलेले आहेत. त्यामध्ये सी (1) यामध्ये "the manner of payment of stamp duty and refund thereof by e-payment." अशा प्रकारचे कलम आणत आहोत. या सुधारणा आणण्याचे एकमेव कारण असे आहे की, नागरिकांना ई-पेमेंटच्या माध्यमातून, घरबसल्या आपल्या मोबाईचा वापर करुन किंवा आपल्या बँक अकाऊंटचा वापर करुन जी काही स्टॅम्प डयुटी असेल, रजिस्ट्रेशन फी असेल या दोन्ही फी आपल्या कार्यालयातून किंवा घरी बसून भरता येतील, ही सुविधा देण्यासाठी हे विधेयक आहे. म्हणून मला सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करावयाची आहे की, नागरिकांच्या दृष्टीने महत्वाच्या सुविधा देण्यासाठी हे विधेयक असल्यामुळे सर्वांनी या विधेयकाला पाठिंबा द्यावा.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 52, मुंबई मुद्रांक अधिनियम, 1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यात आले आहे. या विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकातील उद्देश व कारणामध्ये शासनाचा हेतू काय आहे ते स्पष्ट होत आहे. हे विधेयक का मांडण्यात आले आहे त्याचे स्पष्टीकरणही मंत्री महोदयांनी दिलेले आहे. महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती पाहिली किंवा महाराष्ट्राचा अभ्यास केला तर प्रत्येक तालुक्यामध्ये किंवा जिल्ह्यामध्ये अशा प्रकारची सोय उपलब्ध करुन देणे शासनाला शक्य आहे काय असा माझा पहिला प्रश्न आहे. या सभागृहात वारंवार लोडशेडिंग बाबत चर्चा करण्यात आलेली आहे. राज्यातील ग्रामीण भागात जवळजवळ 14 ते 15 तास लोडशेडिंग लागू असते. अशा वेळी संगणकीय यंत्रणा चालू राहील काय, या सर्व ठिकाणी जनरेटरची किंवा युपीएसची सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार आहे काय याचा खुलासा करण्यात यावा. त्यासाठी काही ठिकाणी केंद्रे उघडली जाणार आहेत काय ? मंत्री महोदयांनी असेही म्हटले की, घर बसल्या ई-पेमेंटची सुविधा उपलब्ध होणार आहे. या विधेयकातील सुधारणा छोटीशी आहे, परंतु त्यात खूप बारकावे आहेत. महाराष्ट्रात ऑन लाईन पध्दतीने किती ठिकाणाहून रिझल्ट उपलब्ध होत आहेत ? विद्यार्थ्यांना अकरावीत प्रवेश घेत असताना ऑन लाईनचा कसा अनुभव आला तो सगळयांना माहीत आहे. त्यावेळी संगणक हँग होत होते. त्यामुळे सगळया गोष्टी ऑन लाईन करुन होणार नाही. आपण असेही म्हटले आहे की, ई-पेमेंट केल्यावर त्याचे इम्प्रेशन संगणकावर उमटणार आहे. आपण ज्यावेळी फ्रँकिंग करतो त्यावेळी डॉक्यूमेंटवर इम्प्रेशन येते. हे इम्प्रेशन ऑन लाईन सिस्टिममध्ये कशा प्रकारे आणणार आहात, मी पैसे भरल्यानंतर त्याची पावती मिळाल्यावर किंवा माझ्या रजिस्ट्रेशनवर त्याचे फ्रँकिंग झाले आहे हे मला कसे कळणार आहे ? म्हणून शासनाने पॅरलल सिस्टिम सुरु ठेवणे आवश्यक आहे.

मंत्री महोदयांनी मोबाईलवरुन पेमेंट करता येईल असेही सांगितले आहे. पण आज सायबर क्राईमच्या केसेस किती उघडकीस येत आहेत त्याची सर्वांना माहिती आहे. तुमचे पेमेण्ट कार्ड असेल, व्हिसा कार्ड असेल, डायनस क्लब कार्ड असेल त्याचा दुरुपयोग होत आहे. हे सर्व





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

हॅक केले जाते. तुमचा नंबर हॅक केला जातो. त्याच्यासाठी सिक्युरिटीची व्यवस्था केली आहे काय ? ज्यावेळी ऑन लाईन पेमेण्टची सोय होईल असे म्हणतो त्यावेळी या सर्व गोष्टींचा सर्वांगीण विचार करणे आवश्यक आहे. ज्यावेळी शासनासमोर सायबर क्राईम समोर येतील त्यावेळी माझ्या सूचनेचा विचार करावा. हे सर्व उघडकीस येण्यापूर्वी याचा सर्वंकष विचार केला आहे की नाही हे सभागृहाने जाणून घेणे आवश्यक आहे.

आपण मुद्रांक शुल्क किंवा रजिस्ट्रेशन फी भरतो, त्याची रक्कम लाखामध्ये असते. आपल्या बँक अकाऊण्टमधून रक्कम ट्रान्सफर करीत असतो. त्यामुळे आपला बँक अकाऊण्ट देखील बाहेर प्रोजेक्ट होतो. तुमचा अकाऊण्ट नंबर तेथे जातो. एखाद्या माणसाला पैशाची चोरी करावयाची असेल तर काहीही करता येते. त्यामुळे शासनाने याचा पुनर्विचार करावा. लोडशेडिंग, सायबर क्राईम व इम्प्रेशनच्या मुद्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. मंत्री महोदयांना यासाठी पुन्हा सुधारणा करावी लागू नये एवढीच अपेक्षा असल्यामुळे या मुद्यांबाबत मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

----

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री एस क्यू. जमा (विधानसभाद्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत जी ने जो शंका यहां पर व्यक्त की हैं, वे सभी जनरल है. साइबर क्राइम भी जनरल है. इम्प्रेशन के बारे में उन्होंने जो बात कही, वह भी जनरल है. मैं बताना चाहूंगा कि महाराष्ट्र शासन ने ई-स्कॉलरशिप की प्रथा अभी चालू की है, जिसको पूरे देश के अंदर नंबर वन की प्रतिष्ठा मिली है. इसी तरह से यह सिस्टम ऑप्शनल है. क्योंकि कॅश देने की जो सिस्टम है वह बंद नहीं हो रही है, वह तो चालू ही रहेगी. इसके अलावा आप ई-मेल के द्वारा भी यह काम कर सकते हैं. जब लोड शेडिंग नहीं रहेगीं तब तो यह काम ई-मेल से किया ही जा सकता है. हमारा बजट डिस्ट्रीब्युशन सिस्टम भी अब ई-मेल से हो रहा है. इसलिए जो पाइंट्स यहां बताए गए हैं, उनको ध्यान में रखते हुए ही रुल्स बनाए जाएंगे. इसलिए यह एक्ट पास होना चाहिए, ऐसा हमारा अनुरोध है.

-------

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि सन्माननीय सदस्य श्री.जमा यांनी या विधेयकावर आपापली मते व्यक्त केलेली आहेत. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी लोडशेडिंगमुळे ही सिस्टिम कार्यरत कशी राहणार आहे असा मुद्दा मांडला आहे. याबाबत मी त्यांना सांगेन की, रजिस्ट्रेशनची कार्यालये तालुका स्तरावर असतात. ग्रामीण भागामध्ये नसतात. तालुक्याच्या ठिकाणी सकाळी 3 तास व संध्याकाळी 3 तास असे 6 तास लोडशेडिंग असते. या वेळेशिवाय लोडशेडिंग नसते. लोडशेडिंगमुळे लाईट बंद झाली तरी प्रत्येक ठिकाणी युपीएस किंवा डिझेल जनरेटर सेटचा बॅकअप ठेवलेला आहे. त्यामुळे ही अडचण निर्माण होईल असे मला वाटत नाही. सायबर क्राईमच्या माध्यमातून बरेच फसवणुकीचे प्रकार होत असतात असे त्यांनी सांगितले आहे. स्टॅम्प ड्युटीच्या पेमेण्टची रिसीट आहे तिला स्टॅम्पचा दर्जा दिलेला आहे. ती संगणकावरच जनरेट होऊन येणार आहे. त्याचे व्हेरिफिकेशन संगणकावर होणार आहे. महाराष्ट्र शासनाने नुकतीच शासकीय रक्कम जमा करण्यासाठी गव्हर्नमेंट रिसिट अकाऊंटिंग सिस्टिम म्हणजे व्हर्च्युअल ट्रेझरीची सुविधा यापूर्वीच लोकांना उपलब्ध करुन दिलेली आहे. आता शासकीय कोषागारात पेमेण्ट करावयाचे असेल तर या सुविधेमार्फत करु शकतो. ही सुविधा जनतेला उपलब्ध झाली आहे, त्याच धर्तीवर मुद्रांक शुल्क व रजिस्ट्रेशन फी इंटरनेटद्वारे करता येईल. विभागाने हे पुढचे पाऊल टाकलेले आहे असे मला वाटते. यामुळे सर्वसामान्य जनतेला जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध होणार आहे. यापूर्वी बँकेत जाऊन डिमाण्ड ड्राफ्ट, पे ऑर्डर काढण्यासाठी 2-4 तास जात होते. त्याऐवजी इलेक्ट्रॉनिक पेमेण्टच्या माध्यमातून नोंदणी फी व मुद्रांक शुल्क भरण्याची सुविधा या सुधारणेच्या अंतर्गत करुन देत आहोत. मला आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करावयाची आहे की, हे विधेयक सभागृहाने संमत करावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती ( श्री.रमेश शेंडगे )** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5, विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

5....

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 52 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 52 संमत झाले आहे.

-----

नंतर श्री.गिते......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**अशासकीय कामकाज**</u>

**पृ.शी.**: सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन)विधेयक

L.C. BILL NO. XIII OF 2011.

(A BILL TO ENACT THE MAHARASHTRA ASSISTED REPRODUCTIVE TECHNOLOGY (REGULATION) ACT, 2011.)

श्री.विनोद तावडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 13 महाराष्ट्र सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) अधिनियम,2011 ची तरतूद करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी विशेष उल्लेख उपस्थित केला. तसेच चित्रपट कलाकार श्री.अमीर खान याला पुत्ररत्नाचा लाभ झाला त्या सरोगसी मदरची मोठया प्रमाणात चर्चा झाली. अपत्यहीन जोडप्यांसाठी विज्ञानाने क्रांतीकारक पाऊल टाकत टेस्ट टयूब बेबीचा शोध काही काळापूर्वी लावला आणि टेस्ट टयूब बेबी ज्याला इनव्हायटर फर्टिलायझेशन असे म्हणतात. एखाद्या महिलेला नऊ महिने गर्भ वाढविण्याची क्षमता नसेल तर टेस्ट टयूब बेबीचा शास्त्रीय शोध अपूर्ण वाटावयास लागला. त्यापुढे जाऊन त्या दांम्पत्याचे ते बीज एखाद्या दुसऱ्या महिलेच्या गर्भाशयात वाढविण्याचा शास्त्रीय शोध लागला. विज्ञानाचा उपयोग खऱ्या अर्थाने शाप ठरायचा नसेल तर महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याने वेळीच कायदा करण्याची गरज आहे. जेव्हा विज्ञान चार पाऊले पुढे जाते, तसे नवीन शास्त्रीय शोध लागतात. किडनी ट्रान्सप्लॅन्टेशन जे होते, ते ऑपरेशन सर्रास व्हावयास लागले, त्यामुळे आपण शेवटी किडनी बोर्ड केले. त्या ठिकाणी अर्ज केल्यानंतर त्यास बोर्डाची मान्यता आल्यानंतर ऑपरेशन होते. असे नियमन आपण करावयास लागलो आहोत. सरोगसी मदरच्या बाबतीत तसे नियमन करण्याची गरज आहे.

सरोगसी मदर हा शब्द लॅटीन भाषेतील जुना शब्द आहे. सरोगस याचा अर्थ सब्स्टीटयूट म्हणजे पर्याय असा आहे. त्यातून सरोगसी मदर हा शब्द रुढ आणि लागू झाला आहे. सरोगसी मदर पध्दतीला भारतामध्ये मान्यता आहे काय हा एक प्रश्न आहे. याबाबतीत सुप्रीम कोर्टात एक

2..

श्री.विनोद तावडे..

केस गेली होती. सुप्रीम कोर्टाने 2002 यासंदर्भात एक निर्णय दिला. तेव्हापासून सरोगसी हा प्रकार भारतामध्ये अधिकृतपणे मानला गेला आहे. बेबी मांझी एमडा या महिलेने आपल्या पोटात दुसऱ्याचे बीज वाढविल्यानंतर ते मूल परत देण्यास नकार दिला. त्यावेळी सुप्रीम कोर्टात केस गेली. सुप्रीम कोर्टात या विषयी सुनावणी घेण्यात आली. भारतामध्ये या प्रकारास 2002 मध्ये मान्यता मिळाली. मान्यता मिळाल्यानंतर मात्र या प्रकाराकडे आर्थिक स्त्रोत पासून ते महिलेच्या अवयवाचा वापर अशा दोन टोकापर्यंत वेगवगळी मते मांडली आणि आता त्याचा उपयोग घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे मला असे वाटते की, केंद्र सरकारने यासंदर्भात कायदा करण्याचा विचार केला आहे. तो कायदा अजून सभागृहासमोर मांडण्यात आलेला नाही. हा कायदा केंद्राच्या अग्रक्रमात कधी येईल, कसा येईल या विषयी मी काही मत व्यक्त करु शकत नाही. परंतु सरोगसीचा दुरुपयोग होऊ नये हा एक अतिशय गंभीर प्रश्न आहे.

सभापती महोदय, सरोगसीचा कारखाना म्हणजे भारत देश आहे. यासंदर्भात काही देशामध्ये अतिशय कडक कायदे आहेत. अतिशय चांगली कायदे केलेले आहेत. त्या कायद्यामुळे महिलेचा सन्मान देखील राहतो आणि विज्ञानाने जो शोध लावलेला आहे, त्याची उपयोगिता आवश्यतेपर्यंत करता येईल. जी महिला सरोगसी मदर होऊ इच्छिते. याबाबतीत तिचे कौन्सिलींग झाले आहे किंवा नाही या गोष्टी पाहणे गरजेचे आहे. ॲडव्हेंचर म्हणून महिला ती पध्दत स्वीकारीत नाही ना, आर्थिक गरजेपोटी ती पध्दत स्वीकारत नाही ना याही गोष्टी पाहिल्या गेल्या पाहिजेत. सिरोगसी मदर बनण्याची त्या महिलेची क्षमता आहे किंवा नाही अशा प्रकारचे प्रमाणपत्र कोण देणार हाही एक महत्वाचा प्रश्न आहे. सरोगसी मदर ही विवाहित असली पाहिजे अशी तरतूद केंद्राच्या प्रपोज कायद्यात आहे. काही देशातील कायद्यात तशी तरतूद नाही. विवाहित महिला सिरोगसी होण्यास उत्सुक असेल तर त्यासाठी तिच्या पतीची मान्यता आवश्यक आहे की अनावश्यक आहे. या विषयात सज्ञान महिला असेल तिचा वयोगट काय आहे याची देखील माहिती असणे आवश्यक आहे. असे बरेच बारकावे आहेत. ते बारकावे विधेयक तयार करताना विचारात घेणे आवश्यक आहे. बाळाचा जन्म झाल्यानंतर ते बाळ जेनेटीक पालकांच्या नावाने जाईल. पण बायलॉजिकली हिस्सा असल्यामुळे त्यात बऱ्याच इमोशन्स जोडलेल्या असणार. या इमोशन्स खूप जोडलेल्या असतील तर दत्तक देणे-घेणे विषयासंदर्भात आपले बरेच कायदे आहेत.

3..



ABG/ MMP/ D/ 13:50

जेनेटिक पालक आहे, जन्म देणारी सरोगसी मदर आहे. यामध्ये भावनांचा प्रश्न निर्माण होणार आहे. अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होऊ शकतात.

महोदय, भावनेच्या प्रश्नाला कायद्याचे आधारेच उत्तर दिले जाऊ शकते. हा अतिशय नाजूक विषय आहे, त्या विषयासंबंधी कायदा तयार विशेष काळजी घेतली पाहिजे. या विषयात काही सामाजिक संस्था काम करीत आहेत. वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर्स, मेन्टली हेल्थ डॉक्टर्स यांची सगळयांची मदत घेऊन हा कायदा तयार केला पाहिजे. मी बारा, तेरा देशातील काही गोष्टींचा अभ्यास करुन हे अशासकीय विधेयक तयार केले आहे. या विधेयकाबाबत आपण चर्चा केली तर अनेक चांगल्या सूचना सदस्यांकडून देखील येऊ शकतात. महाराष्ट्र हा सर्व क्षेत्रात अग्रेसर राहिलेला आहे. छत्रपती शाहू महाराज, ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा हा महाराष्ट्र आहे. आपण या विषयाच्या बाबतीत अतिशय विचारपूर्वक संवेदनशील कायदा वेळेत बनवू शकलो तर मला वाटते की, विज्ञानाने केलेल्या प्रगतीला कायद्याच्या अनुषंगाने संरक्षण देण्याची प्रक्रिया सुरु करणार आहोत. म्हणून मला हे अशासकीय विधेयक मांडण्यासाठी सभागृहाने मंजुरी द्यावी. या विधेयकाच्या बाबतीत अनेक मुद्दे मला मांडावयाचे आहेत. ज्यावेळी सदर विधेयक खंडश: विचरात घेण्यात येईल, त्यावेळी मी प्रत्येक कलम, उप कलमांवर माझे विचार सविस्तरपणे मांडणार आहे. एक, दीड तासाच्या अशासकीय कामकाजाच्या वेळेत असा महत्वाचा विषय न उरकता, त्या विधेयकावरील चर्चेस अधिक वेळ दिला तर अनेक सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडता येतील. आपल्या वरिष्ठ सभागृहाने अशा नाजूक विषयाचा अभ्यास केला तर खरोखरच महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला हा कायदा मार्गदर्शक ठरु शकतो. हा कायदा या राज्यात लागू केला तर ती एक मोठी मानस सेवा होऊ शकते म्हणून असा कायदा करावा असा माझा आग्रह आहे. महाराष्ट्र सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) विधेयक सभागृहासमोर मांडण्याची अनुमती द्यावी, अशी मी नम्र विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** (श्री.रमेश शेंडगे ) : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 13 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**अशासकीय ठरावासंबंधी**</u>

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचा ठराव क्रमांक 13 त्यांनी केलेल्या विनंतीनुसार पुढे ढकलण्यात येत आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राजीव गांधी घरकूल योजना 100 टक्के अनुदानावर राबविणे

**मु.शी.**: राजीव गांधी घरकूल योजना 100 टक्के अनुदानावर राबविणे या विषयावरील प्रा.सुरेश नवले यांचा ठराव.

प्रा.सुरेश नवले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो :-

'' राज्यातील ग्रामीण भागातील राहणीमानाचा दर्जा उंचविण्यासाठी राजीव गांधी घरकूल योजना राबविण्यात येत असून या योजनेला बँकाँमार्फत चांगला प्रतिसाद मिळत नसल्याने शासनाच्या या समाजोपयोगी योजनेला खीळ बसण्याची शक्यता विचारात घेऊन ही योजना लाभार्थ्यांकडून एकही पैसा न घेता १००% राज्य शासनामार्फत राबविण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

सभापती महोदय, पृथ्वीवर राहणा-या प्रत्येक व्यक्तीचे एक स्वप्न असते. एक मालकीचे घर असावे, एक हक्काचे स्वत:चे घर असावे, विसाव्याचे केंद्र असावे, विश्रांतीचे स्थान घराच्या रुपाने असावे असे स्वप्न प्रत्येक व्यक्ती बघत असते. घर म्हणजे ममत्वाचा झरा आहे. गोडीचे स्थान, सुखदु:खाचा संवाद घडविणारे केंद्र, आनंद आणि दु:खाश्रूचे माहेरघर म्हणजे घर. श्रीमंतांची घराबाबतची अपेक्षा वेगळी असू शकते. एक बंगला बने न्यारा. पण सर्वसामान्य माणसाला प्रत्यक्षात एक घर हवे असते. श्रीमंत आणि सामान्य माणूस यांची घराविषयीची भावना एकच असते. मग तो बंगला असेल किंवा सामान्य घर असेल.

सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये स्व.राजीव गांधी यांच्या नावाने शासनामार्फत घरकूल योजना मोठ्या प्रमाणात राबविली जात आहे. महाराष्ट्रामध्ये लाखो कुटुंबे अशी आहेत, जी भटकंती करतात. आज इथे तर उद्या तिथे. लाखोंच्या संख्येने महाराष्ट्रात वासुदेव, गोंधळी, कैकाडी, पारधी एका गावामधून दुसऱ्या गावात, दुसऱ्या गावातून तिसऱ्या गावात अशा पध्दतीने आपले भटकंतीचे जीवन जगतात. त्यांचे जीवन म्हणजे अतिशय कारुण्यपूर्ण असल्याचे आपल्याला महाराष्ट्रामध्ये पहावयास मिळते. उघड्यावर संसार आहेत. दोन दगडांची चूल आहे. शेंबडे पोर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले..........

बाजूला आहे. चव्हाट्यावर संसार मांडला आहे. एका कोपऱ्यामध्ये आमची माऊली आडोशाच्या आधारे आंघोळी आटोपते. अतिशय दारुण चित्र महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील कानाकोपऱ्यामध्ये पहावयास मिळते. हे चित्र बदलण्याची क्षमता या राजीव गांधी घरकूल योजनेमध्ये आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.भगवानराव साळुंखे)**

सभापती महोदय, या राजीव गांधी घरकूल योजनेचे राज्य शासनाने तांत्रिकदृष्ट्या नामांतर करावे अशी माझी विनंती आहे. राजीव गांधी घरदार योजना असे नामकरण करण्यात यावे. महाराष्ट्रामध्ये जे बेघर आहेत त्यांच्यासाठी 100 टक्के अनुदानावर ही योजना राबवावी. ज्यांना घर नाही, जे उपेक्षित आहेत, गरीब आहेत, दारिद्र्य रेषेखाली आणि रेषेच्या वर आहेत अशा सगळ्या घटकांना या योजनेखाली आणता आले तर पुरोगामी महाराष्ट्राच्या दृष्टीने हा अतिशय क्रांतीकारी निर्णय होऊ शकेल. एकीकडे महाराष्ट्रामध्ये स्वत:च्या घरावर हेलिकॉप्टर उतरविणारे लोक आहेत आणि दुसरीकडे आज इथे तर उद्या तिथे अशी पालाची घरे असणारे लोक आहेत. दहा ठिकाणी त्या पालाला ठिगळ लावलेली असतात. हे चित्र बदलण्याची क्षमता निश्चितपणे राजीव गांधी घरकूल योजनेमध्ये आहे. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, लाभार्थ्यांकडून एकही पैसा घेऊ नये किंवा पैशाची अपेक्षा करु नये. 100 टक्के अनुदान राज्य शासनाच्या वतीने दिले जावे. शासनाच्या वतीने लाखो कुटुंबांना जे दान दिले जाणार आहे त्यामुळे निश्चितपणे एका छताखाली ही कुटुंबे येऊ शकतील. त्यांना हे छत नक्की आधार देणारे ठरणार आहे.

सभापती महोदय, श्रीमंत मुले महाविद्यालयात शिकत असताना तेरे घर के सामने एक घर बनाऊंगा असे म्हणतात. परंतु गरीब कुटुंबातील तरुण मुलांनी हे स्वप्न पाहण्याची अपेक्षा आहे. महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या गरीब कुटुंबातील मुलांचे देखील एक स्वप्न असते. तेरे घर के सामने मै एक घर बनाऊंगा. परंतु ज्यांना रहायला घरच नाही ते तिच्या घरासमोर कुठले घर बांधणार? त्यामुळे शासनाने उदार अंत:करणाने राजीव गांधी घरकूल योजना 100 टक्के अनुदानावर राबविली तर ही योजना महाराष्ट्रामध्ये चांगल्या प्रकारे यशस्वी होऊ शकते. माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री हे अतिशय कार्यक्षम आहेत, कार्यशील आणि कार्यप्रवण आहेत. महाराष्ट्रातील गरीब जनता त्यांच्याकडे अपेक्षेने पहात आहे. हे अतिशय गरीब लोक आहेत. त्यामुळे गरिबों की सुनो वो तुम्हारी सुनेगा. आप एक पैसा दोगे तो वो दस लाख आप को देगा.

..3..

प्रा.सुरेश नवले..........

या योजनेमध्ये परिवर्तन घडविण्याची गरज आहे. इंदिरा आवास योजनेमध्ये अपात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. राजीव गांधींच्या नावाने 2005 मध्ये योजना सुरु करण्यात आली. दारिद्र्य रेषेखालील घटकांसाठी पहिल्या क्रमांकाची योजना सुरु करण्यात आली. दारिद्र्य रेषेवरील घटकांसाठी दुसऱ्या क्रमांकाची योजना सुरु करण्यात आली. अल्प गटातील जे लाभार्थी आहेत त्यांच्यासाठी सुधारित तिसऱ्या क्रमांकाची योजना तयार करण्यात आली.

सभापती महोदय, राजीव गांधी निवारा योजना क्रमांक-1 मध्ये 28500 रुपये अनुदान दिले जाते. 51510 घरांचे लक्ष्य होते. त्यापैकी 46806 घरांचे काम पूर्ण केले असून 2336 घरांची कामे प्रगतीपथावर आहेत. राजीव गांधी निवारा योजना क्रमांक-2 मध्ये अल्प भू-धारक आणि दारिद्र्य रेषेवरील बेघरांसाठी योजना राबविली जात आहे. लाभार्थ्यांना बँकांमार्फत 45 हजार रुपयांचे कर्ज दिले जाते. या बँकांकडून किती पिळवणूक केली जाते? अतिशय तुच्छतेने या लाभार्थ्यांकडे पाहिले जाते. या कर्जावरील अनुदानाच्या रक्कमेचे व्याज राज्य शासन देत असते. या योजनेमध्ये 51510 घरांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. एकूण 56798 प्रस्ताव प्राप्त झाले होते. बँकांकडे त्यापैकी 31184 प्रस्ताव सादर करण्यात आले. त्यातील फक्त 3858 प्रस्तावांना बँकांनी मंजुरी दिली. ही अतिशय गंभीर बाब आहे. फक्त 581 घरांचे काम पूर्ण झाले असून 794 घरांची कामे प्रगतीपथावर आहेत. 56798 पैकी फक्त 3858 प्रस्ताव बँकांनी मंजूर केले.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ....

निवारा योजनेच्या संदर्भात बँका किती उदासीन आहे हे दिसून येते. खरे म्हणजे यासंदर्भातील अधिका-यांचे प्रशिक्षण घेण्याची गरज आहे. राज्य शासनाने या प्रकरणाकडे अतिशय गंभीरपणे बघून मराठवाडा, विदर्भ, खान्देशच्या अविकसित भागातील लोक प्रतिनिधी तसेच अधिका-यांबरोबर एक सर्वंकष बैठक घेऊन निर्णय जाहीर करावा अशी आग्रहाची विनंती मी या माध्यमातून शासनास करीत आहे.

सभापती महोदय, सुधारित राजीव गांधी निवारा योजना-2 अल्प उत्पन्न गटासाठी आहे. या योजनेतील कर्जावरील व्याज राज्य शासन देते. या योजनेमध्ये 90 हजार रुपये कर्ज मंजूर करण्यात येते. या योजनेच्या संदर्भात 80,383 प्रस्ताव प्राप्त झाले, बँकाकडे 62,013 प्रस्ताव सादर करण्यात आले परंतु बँकानी केवळ 12,435 प्रस्तावांना मंजुरी दिली. या योजनेत 1,779 घरे बांधून पूर्ण झालेली असून 3470 घरांचे काम प्रगतीपथावर आहे. या योजनेचे हे जे चित्र आहे ते समाधानकारक नाही. या योजनेकडे शासनाने अतिशय गंभीरतेने पहावे अशी माझी राज्य शासनास विनंती आहे. राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेच्या संदर्भात डिसेंबर 2010 पर्यंत बांधण्यात आलेल्या घरांच्या संदर्भात माझ्याकडे एक तक्ता आहे. राजीव गांधी निवारा योजना-1 मध्ये कोकणात 7,762 घरे बांधण्यात आली. पुणे 10,717, नाशिक 11,163, औरंगाबाद 7,546, अमरावती 3776, नागपूर 5937 घरे बांधण्यात आली.

सभापती महोदय, राजीव गांधी निवारा-2 मध्ये कोकण 92, पुणे 155, नाशिक 193, औरंगाबाद 6, अमरावती 79 व नागपूर येथे 56 घरे बांधण्यात आली.

सभापती महोदय, सुधारित राजीव गांधी ग्रामीण योजना-2 मध्ये कोकण 110, पुणे 182, नाशिक शून्य, औरंगाबाद 141, अमरावती 820, नागपूर 526 घरे बांधण्यात आलेली आहेत. सर्व योजना मिळून 49,166 घरे मंजूर करण्यात आलेली आहेत. त्यामुळे या योजनेकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रामध्ये भटक्यांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. या योजनेत केवळ आकडेवारी देण्याचा खेळ चालला आहे. आमच्या ग्रामीण भागात बहुरुपी येत असतो. बहुरुप्यांची सुध्दा सांकेतिक लिपी असते. ते सांकेतिक लिपीच्या माध्यमातून "शेट्टीच्या नावाने देव

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ....

पावला, चंद्रभागेच्या कडी देव दिसला" अशा प्रकारे लोकांसमोर जाऊन, त्यांचे गुणगान करुन स्वत:चा उदरनिर्वाह चालवित असतात. कुठे गेली काशी दाताड वाशी, कुठे गेली पारु काठीला नारु अशा प्रकारची महाराष्ट्राची जी लोक कला आहे ती आता लोप पावत चालली आहे. आज या लोक कलाकारांची मुले बेघर आहेत. या मुलांना शिक्षण सुध्दा घेता येत नाही. आज लोकमतमध्ये एका स्त्रीचे चित्र छापण्यात आलेले आहे ते अतिशय कारुण्यपूर्ण आहे. हे चित्र माणुसकीला काळिमा फासणारे आहे. वर्तमान पत्रातील फोटीतील वृध्देला घर असते तर तिच्यावर रस्त्यावर पडण्याची वेळ आली नसती. त्यामुळे राज्य शासनाला माझी विनंती आहे की, या विषयाच्या संदर्भात गांभीर्यपूर्वक विचार करुन महाराष्ट्रातील घरदान योजना राबवली गेली पाहिजे. जे बेघर आहेत, ज्यांना निवारा नाही त्यांना ही योजना आश्रय देणारी ठरणार आहे. त्यामुळे यासंदर्भातील निर्णय जाहीर करावा अशी आग्रहाची विनंती करतो व माझे विचार येथेच थांबतो.

ठराव प्रस्तुत झाला.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुरेश नवले यांनी घरकूल योजनेच्या संदर्भात ठराव मांडला असून त्यांनी काही अपेक्षाही व्यक्त केलेल्या असल्यामुळे, गृहनिर्माण राज्यमंत्री म्हणून मी त्यांचे अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्यांनी घरकूल योजनेकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे. निवारा हा अत्यंत जटील प्रश्न आहे. आपल्या जीवनामध्ये अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा आहेत. अन्न-धान्य पिकविण्यामध्ये आपण यशस्वी झालेलो आहोत. आता वस्त्र हा काही मोठा प्रश्न राहिलेला नाही परंतु निवा-याचा प्रश्न आजही जटील आहे. वाढणारी लोकसंख्या व त्यातून वाढणारे शहरीकरण व त्यातून वाढणारे नागरीकरण या सर्व समस्यांना सामोरे जावयाचे असेल तर निवा-याकडे प्राथमिक प्रश्न म्हणून आपल्याला पहावे लागणार आहे. पाणी, रस्ते, वीज या जिवनावश्यक गरजा आहेत परंतु निवारा महत्वाचा घटक आहे. देशपातळीवर, राज्य पातळीवर निवारा योजनेच्या संदर्भात व्यापक धोरण केंद्र शासनाने आखले असून त्या धोरणाच्या मदतीने राज्यशासनाने काही वर्षापूर्वीच त्याची अंमलबजावणी सुरु केलेली आहे. आपले राज्य हे एकमेव असे राज्य आहे की, आपल्या राज्याने महानगर पालिका, नगरपालिका व ग्रामीण भागात घरकूल योजना राबवलेली आहे.

सभापती महोदय, इंदिरा गांधी आवास योजना, पंतप्रधान घरकूल योजना, राजीव गांधी घरकुल योजना टप्पा-1, राजीव गांधी घरकुल योजना टप्पा-2 तसेच राजीव आवास योजनेच्या अंतर्गत अनेक योजनांच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपण आपल्या योजनांमध्ये किती यशस्वी होतो याचा आढावा आपण घेतला पाहिजे. येणा-या पाच वर्षात एकंदरीत वाढणारे शहरीकरण, लोकसंख्येचा विचार करुन प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे. येणाऱ्या पाच वर्षामध्ये वेगवेगळया योजनांच्या माध्यमातून 5 लक्ष घरकूले बांधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, घरकूल योजनांच्या संदर्भात ग्रामीण भागाचा विचार केला तर आपण जवळपास 3 लक्ष घरे बांधण्याचे काम केलेले आहे. आरडीडीच्या माध्यमातून इंदिरा आवास योजना , नगरपालिका मध्ये आयएसएचडीपी, महानगरपालिकेत बीएसयुपी अशा योजनेमध्ये 3 लक्ष घरकुले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर....

बांधण्याचे काम केलेले आहे. एवढेच नाही तर मागासवर्गीयांसाठी रमाई योजनेअंतर्गत वर्षाला 2 लक्ष घरे बांधण्याचा निर्धार केलेला आहे. गेल्या वर्षी या योजनेअंतर्गत 90 हजार घरे बांधण्यात आलेली आहे. घरकूल योजनेवर काम करीत असतांना त्यामध्ये काही त्रुटी आहेत व त्या त्रुटी आपल्याला भरुन काढाव्याच लागणार आहेत. सर्वसामान्यांना मदत करण्याची भूमिका राज्य सरकारची नेहमीच असते. खरे म्हणजे ज्या घटकांपर्यंत लाभ पोहचत नाही अशा घटकांपर्यंत खऱ्या अर्थाने लाभ पोहचला गेला पाहजे. दारिद्रय रेषेखालील लोकांची भावना लक्षात ठेवून घरकुलांच्या योजना सुरु केलेल्या आहेत.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर....

आज दारिद्र्य रेषेखालील असणाऱ्या लोकांची संख्या 20 लाखा पेक्षा जास्त आहे. आज 50 ते 60 टक्के लोक घरकुल योजनेच्या माध्यमातून पुढे येऊ पहात आहेत. त्यांना मदत करण्याच्या भूमिकेतूनच राज्य शासनाने ही योजना हाती घेतली आहे. दारिद्र्य रेषेखालील लोकांना जास्तीतजास्त न्याय कसा देता येईल हा दृष्टिकोन शासनाने ठेवलेला आहे. त्यामुळेच आपण वेगवेगळ्या योजना आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. जे मध्यमवर्गीय आहेत, एपीएल आहेत त्यांना देखील मदत करीत आहोत. एपीएलची आज आर्थिक परिस्थिती सक्षम असली तरी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आपण योजना आखली आहे.

आज निवारा हा जटील प्रश्न होऊन बसला आहे म्हणून महाराष्ट्र शासनाने स्वत:ची योजना जाहीर केली आहे. इंदिरा आवास योजने अंतर्गत मॅचिंग ग्रँट देण्यात येते, त्याप्रमाणेच एपीएलसाठी संपूर्ण व्याजाची रक्कम भरण्याची जबाबदारी राज्य शासनाने घेतली आहे. सरकारची भूमिका अशी आहे की, बँकांनी त्यांना कर्ज द्यावे. कर्जासाठी जे निकष लागतात ते त्यांनी पहावे. लाभार्थी म्हणून कर्ज फेडण्याची जबाबदारी आहे की नाही हे देखील आपण पहावे. व्याजाची संपूर्ण जबाबदारी आम्ही सरकार म्हणून घेऊ. त्यानुसार ही योजना आपणहून राबविण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. नॅशनल बँकींग ॲक्टनुसार आपण काही टर्म्स अँड कंडीशन्स टाकल्या आहेत. बँकांचे जे ओव्हर ऑल बजेट असेल त्यातून किमान अशा योजनांना लाभ मिळाला पाहिजे अशा प्रकारचे सूतोवाच या योजनेची अंमलबजावणी करताना आपण केले आहे. राज्याचा एक मंत्री म्हणून मी मान्य करतो की, राज्यातील बँकांनी या योजनेला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिलेला नाही. सन्माननीय सदस्यांनी येथे दिलेले आकडे व माझ्याकडे असलेले आकडे हे थोड्या फार प्रमाणात वर खाली होऊ शकतात. परंतु, त्यांनी जी भूमिका मांडली ती काही नाकारता येणार नाही. आकड्यांसबंधी बोलावयाचे झाले तर ऑक्टोबर 2011 पर्यंत एकूण 91 हजार अर्ज संपूर्ण राज्यातून प्राप्त झाले. त्यापैकी 66,444 अर्ज बँकांकडे कर्ज मंजुरीसाठी गेले. यापैकी 16600 प्रस्ताव बँकेने कर्जासाठी मंजूर केले व प्रत्यक्षात 10007 लाभार्थींना कर्जाचे वाटप करण्यात आले. ज्या लोकांना कर्ज वाटप केले आहे त्यापैकी 5394 लाभार्थींनी घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले आहे, 4201 घरकुलांचे बांधकाम हे प्रगतीपथावर आहे. आता पर्यंत आपण दीड ते दोन कोटी रूपये लाभार्थींना व्याजापोटी देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर....

आता आपण जिल्हा स्तरावरील थोडासा विचार करू या. मराठवाडा विभाग, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव येथे या योजनेला लोकांचा प्रतिसाद मिळाला असला तरी या योजनेला बँकानी सपोर्ट न केल्यामुळे एकंदरच उदासीन परिस्थिती आहे, हे मी नाकरू शकणार नाही. मराठवाड्यातून 21318 प्रस्ताव पाठविण्याचे काम केले आहे. यापैकी 13 हजार लोकांना मंजुरी मिळाली. 10039 वरून फक्त 890 लोकांना कर्ज मंजूर करण्याचे काम झाले आहे. कर्ज मंजूर करून फक्त 100 जणांना पत्र देण्याचे काम बँकेने केले आहे. काही विभागांमध्ये आपण पुढे जाण्यामध्ये यशस्वी झालो आहोत. परंतु, बँकेच्या आडमुठी धोरणामुळे या योजनेला गती मिळण्याचे काम मिळत नाही. आम्ही बँकांसंबंधी आढावा घेतल्यानंतर असे लक्षात आले की, या योजनेसाठी बँका पुढे येत नाहीत. कर्ज द्यायला प्रोत्साहन देत नाही. त्यामुळे असे वाटते की, ही योजना कार्यान्वित ठेवायची की नाही ? आमचे अधिकारी ज्यावेळी बँकेच्या अधिकाऱ्यांना भेटायला गेले तेव्हा सदर योजना मागे घ्यावी अशी देखील त्यांनी सूचना केली होती. पण माननीय मुख्यमंत्र्यांनी व मी अशी भूमिका घेतली की, काही झाले तरी ही योजना राबवायची. बँकेच्या अधिकाऱ्यांकडे योजना राबविण्यासाठी आग्रह धरू. या योजनेची मुदत सन 2009 मध्ये संपत होती. ती आपण सन 2010 मध्ये, 2011 मध्ये वाढविण्याचे काम केले. मी आपल्याला आश्वासित करू इच्छितो की, ही योजना पुढच्या कालावधीमध्ये कार्यान्वित ठेवण्याचे काम निश्चितपणाने करेन. कारण एपीएलचा जो वर्ग आहे, त्याला देखील प्रोत्साहनाच्या माध्यमातून निवारा देण्याचे काम आपण करीत आहोत. ही योजना आपल्याला सुधारित करावी लागणार आहे. या योजनेला 100 टक्के अनुदान द्यावे असा सन्माननीय सदस्यांचा आग्रह आहे. आपण 21 व्या शतकात आहोत. महाराष्ट्र राज्य हे प्रगतिशील आहे त्यामुळे तसा विचार करण्यास काय हरकत आहे?

सर्वात प्रथम आपल्याला बीपीएल धारकांना प्राथम्य द्यायचे आहे. बीपीएल धारकांची निवारा योजना पूर्ण झाल्यानंतर 100 टक्के अनुदान देऊन योजना राबविता येईल काय तोही विचार करायला माझी व्यक्तिश: कोणतीही हरकत नाही. आज प्राप्त परिस्थितीत त्यात काही सुधारणा करता येईल काय, हे देखील आपण पहिले पाहिजे. ही योजना बंद होऊ नये, या योजनेला प्रोत्साहन मिळाले असे मला देखील वाटते. या योजनेसाठी 90 हजार एवढे अर्ज आले आहेत.

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर....

सदर आकडा मी नुकताच आपल्याला सांगितला आहे. एक वेळी अशी परिस्थिती होती की, लोकांची अर्ज करण्याची प्रक्रिया देखील अत्यंत धीमी झाली होती. या योजनेसंबंधी अशी मानसिकता निर्माण झाली होती की, अर्ज करून लोन काही मिळत नाही आणि राज्य सरकार आपल्याला व्याजापोटी काही रक्कम देऊ शकणार नाही. म्हणून आपण राज्य स्तरावर बँकेची जी कमिटी आहे, त्यांच्याकडे गेलो. यात बँक ऑफ महाराष्ट्र ही लीड बँक होती. या बँकेचे चेअरमन व महाराष्ट्राचे मुख्य सचिव यांना आपण संयुक्त समितीवर नेमण्याचे काम केले आहे. ही संयुक्त समिती एकंदरीत सर्व बाबींचा आढावा घेऊन संबंधित बँकेकडे आग्रह धरते. किंबहुना बँकेने त्यांना धुडकावून लावण्याचा प्रयत्न केला किंवा ही योजना अयशस्वी करण्याचा प्रयत्न केला तर त्याची रितसर तक्रार सदर समिती केंद्र सरकारकडे करू शकते. केंद्र सरकारचा वित्त विभाग त्याची नोंद घेईल. त्यामुळे पुढच्या काळात ज्या काही अडचणी येतील त्या रोखण्याचे काम आपण करू शकू.

दोन-चार विभागामध्ये आपल्याला फारच कमी प्रोत्साहन मिळाले आहे. मी लोकप्रतिनिधींना आश्वासित करू इच्छितो की, तेथे परत स्टेट लेव्हल कमिटीची बैठक घेण्याचे काम करण्यात येईल व बँकांच्या अधिकाऱ्यांकडे अधिक आग्रह धरण्याचे काम करण्यात येईल. या विभागातील लोकांना वंचित ठेवून चालणार नाही, तुम्हाला कोणत्याही परिस्थितीमध्ये त्यांना कर्ज हे द्यावेच लागेल असे सांगण्याचा प्रयत्न बँकेच्या अधिकाऱ्यांकडे करण्यात येईल.

या चर्चेच्या माध्यमातून सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी एक गोष्ट आमच्या निदर्शनास आणून दिली की, ही योजना अजून आकर्षक कशी करता येईल ते पहावे. आपण बँकेकडून कर्ज घेणार आहोत. व्याजाची रक्कम शासन देणार आहे, त्यामुळे सबसिडीमध्ये अजून काही बदल करता येईल काय, अशी सूचना केली आहे. तसा विचार देखील करायला काही हरकत नाही. अर्थात या बाबी संबंधी राज्याच्या आदरणीय मुख्यमंत्र्या बरोबर चर्चा करावी लागेल. तसेच आवश्यकता वाटली तर हा विषय मंत्रिमंडळासमोर देखील घेऊन जावा लागेल. आम्ही दहा वर्षे त्यांना व्याज देणार आहोत. व्याजाची ती रक्कम आम्ही त्यांना 5 वर्षे देऊ. यातील अर्धी रक्कम आम्ही सबसिडीमध्ये कन्व्हर्ट करू शकतो काय हा ही एक प्रयत्न करता येईल काय, हे

...4



श्री.सचिन अहिर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देखील पहावे लागेल. आज लाभार्थीला दहा हजार रूपये भरावे लागतात, तर नव्वद हजार रूपये बँक कर्ज म्हणून देते. 90 हजार रूपयाच्या रकमे ऐवजी सबसिडी देऊन ती रक्कम कमी करू शकलो तर त्याने लोक देखील आकर्षित होतील. एपीएल धारकांना निवारा देण्याचा प्रश्न जटील आहे असे आपण म्हणत आहोत त्यात कुठे सुधारणा करता येईल काय, या दृष्टीकोनातून विचार करायला हरकत नाही असे मला वाटते.

भटक्या जमातीच्या लोकांना आपल्या व्यवसायामुळे वेगवेगळ्या ठिकाणी जावे लागते. ते एका गावी कधी स्थिर रहात नाहीत. त्यांच्यासाठी काही करता येईल काय, असा देखील प्रश्न विचारण्यात आला आहे. त्याचा देखील आम्ही विचार करीत आहोत. नाईट शेल्टर योजना महानगरपालिका आणि नगरपालिकेच्या क्षेत्रात राबविण्याचा विभागाचा विचार सुरू आहे.

यानंतर श्री.सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर...

ग्रामीण भागात तालुका व जिल्ह्याच्या स्तरावर आपल्याला हे करता येईल काय? आज काही गावामध्ये सरकारी जमिनीवर फक्त बारदाने लावून त्यामध्ये लोक राहतात. तसे न करता सरकारी जमिनीवर नाईट शेल्टर बांधावेत, जेणेकरुन एखादा माणूस दिवसभर काम करुन थकून आल्यानंतर त्याला रात्री आराम करता येईल. तशा प्रकारची संकल्पना आपल्याला करता येईल काय यादृष्टीने आपण विचार करु शकलो तर त्यामधून आपल्या अपेक्षा दूर करता येतील असे मला वाटते. ही संकल्पना व्यक्त करीत असतांना त्याकरीता एक सुधारित योजना लवकरात लवकर आणण्याचा राज्य शासनाचा निर्धार आहे. त्याचप्रमाणे 3 लाख लोकसंख्या असलेल्या शहरी भागामध्ये केंद्र सरकार व राज्य सरकारमार्फत राजीव आवास योजना आणण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. त्यामधून ग्रामीण भागाला सुध्दा न्याय देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. अशाप्रकारे केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या योजनांमधून सर्व घटकांना निवारा देणे हा आपल्यापुढील महत्वाचा प्रश्न असल्यामुळे ही बाब लक्षात ठेऊन आपण काम करण्याचा प्रयत्न करीत आहोत. माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांच्या अपेक्षेप्रमाणे ही योजना 100 टक्के सुधारित होणार नाही परंतु ही योजना सुधारित करुन त्यामधून लाभार्थ्यांची संख्या वाढवून आणि बँकाना अग्रक्रम देऊन आपण अंमलात आणू शकतो याची ग्वाही राज्य शासनाच्या माध्यमातून माननीय सदस्यांना देतो. या अत्यंत महत्वाच्या प्रश्नासाठी राज्य सरकार केंद्र सरकारबरोबर आग्रही भूमिका घेऊन पुढील काही वर्षाच्या कालावधीत निवाऱ्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही करणार आहोत. याकरिता माननीय सदस्यांनी केलेल्या उपयुक्त सूचनांचा पुढील काळात निश्चितपणे विचार करु एवढे सांगून माननीय सदस्यांनी मांडलेला अशासकीय ठराव त्यांनी मागे घ्यावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अतिशय विस्तृत व सर्वंकष असे उत्तर दिले आहे. परंतु माझ्या ठरावातील मूळ विषय बाजूलाच राहिला आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, ही योजना राबविण्याच्या बाबतीत जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारीच उदासीन आहेत. या करिता सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्याची गरज आहे. ही योजना राबविण्याकरिता जिल्हाधिकारी आपल्या अधिकाऱ्यांची नियमित बैठक घेत नाहीत, बँकाकडून आढावा घेत नाहीत. त्यामुळे जिल्हा प्रशासनाचा तेथील बँकावर वचक नाही. या निमित्ताने फक्त एकच उपयुक्त अशी सूचना करतो की, जिल्हा पातळीवर जिल्हाधिकाऱ्यांनी या योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घ्यावा, त्याकरिता मंत्री महोदयांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांचा आढावा घ्यावा. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांवर शासनाचे नियंत्रण राहील. सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनामुळे माझे समाधान झाले आहे. त्यामुळे मी माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अपघातग्रस्तांना वेळीच वैद्यकीय उपचार मिळण्याकरिता द्रुतगती मार्गावर ट्रॉमा केअर सेंटर सुरु करणे

**मु.शी.**: अपघातग्रस्तांना वेळीच वैद्यकीय उपचार मिळण्याकरिता द्रुतगती मार्गावर ट्रॉमा केअर सेंटर सुरु करणे या विषया वरील डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांचा ठराव

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

"राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसें दिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-गोवा (वडखळ नाका) नाशिक-शिडी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनांची वर्दळ असलेल्या द्रुतगतीत मार्गांवर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरु करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे".

सभापती महोदय, आज या राज्याच्या क्षेत्रफळ पाहिले तर साधारणपणे 3 लाख चौरस किलो मीटर आहे. या राज्याचे रस्ते पाहिले तर साधारणपणे 2 लाख 35 हजार 555 कि.मी.लांबीचे रस्ते आहेत. साधारणपणे 33 हजार 800 किलोमीटर लांबीचे राजमार्ग आहेत. या मुळे आपण जर पाहिले तर या ठरावाचे दोन भाग होतात. एक तर या रस्त्यांवर अपघात घडू नयेत याकरिता घ्यावयाची काळजी आणि अपघात झाल्यानंतर जखमींना तत्काळ मिळणारी वैद्यकीय मदत असे दोन भाग होतात. सभागृहामध्ये माननीय परिवहन मंत्री उपस्थित आहेत त्याचप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभागाचे माननीय मंत्री देखील उपस्थित आहेत. या दोन्ही मंत्रीमहोदयांनी सांगड घालून हा ठराव विचारात घेतला तर खरोखरच काही लोकांना जीवदान मिळू शकेल. साधारणपणे अपघातांची संख्या पाहिली तर मुंबई-गोवा, शिर्डी-नाशिक, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे आणि मुंबई-नागपूर या महामार्गावर सातत्याने अपघात होत असतात. अपघाताचे वाढलेले प्रमाण पहाता माननीय न्यायालयाने देखील त्याची नोंद घेतली. माननीय न्यायालयाने राज्य रस्ते विकास महामंडळाला विचारले की, या महामार्गांवर अपघात होतात त्यामधील जखमींवर वेळीच उपचार कां केले जात नाहीत? असे विचारल्यानंतर सुध्दा शासनाचे हे दोन्ही विभाग ढीम्म आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

सभापती महोदय, माझ्याजवळील आकडेवारी आपण पाहिली तर दरवर्षी 12 हजार लोक या रस्ते अपघातात मरण पावतात. संपूर्ण देशामध्ये या बाबतीत महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्र हे प्रगत राज्य आहे असे आपण म्हणतो. महाराष्ट्रातील वाहनांची संख्या देखील काही लाखांवर पोहोचली आहे. मुंबई-गोवा या महामार्गांवरुन साधारणपणे 1 लाख 85 हजार वाहने ये-जा करतात. कोकणामध्ये गौरी-गणपतीसाठी जाणारे भाविक, शिर्डीला साईबाबांच्या दर्शनासाठी जाणारे भाविक त्याचप्रमाणे मौजमजा करण्यासाठी सहलीला जाणारे लोक हे गेल्यानंतर परत आपल्या घरी येत नाहीत. बरेच लोक रस्त्यावरील अपघातामध्ये मरण पावतात. सभापती महोदय, मुंबई-पुणे महामार्गावर खोपोली येथे पोलीस स्टेशन आहे. त्या पोलीस स्टेशनजवळील आकडेवारीनुसार सन 2009 मध्ये 28 पुरुषांचे बळी गेले, 124 पुरुष जखमी झाले, 2 महिला मृत्युमुखी पडल्या. त्यानंतर सन 2010 मध्ये 36 पुरुषांचे बळी गेले, 7 महिला मृत्युमुखी पडल्या, 146 पुरुष जखमी झाले. त्यानंतर जुलै 2011 पर्यन्त 30 पुरुष मृत्युमुखी पडले, 5 महिला मृत्युमुखी पडल्या, 92 पुरुष जखमी झाले आणि 21 महिला जखमी झाल्या आहेत. मुंबई-गोवा महामार्गावर मागील आठ महिन्यात 422 लोक जखमी झाले व 109 लोक ठार झाले आहेत. ही आकडेवारी पाहिली तर या मागे अनेक कारणे आहेत.

सभापती महोदय, मुंबई-गोवा हा दुपदरी रस्ता असून त्याचे चौपदरीकरण केव्हा करणार आहात हे आपल्याला माहीत नाही. या बाबतीत सार्वजनिक बांधकाम विभागाने पर्यावरणाचे नियम आडवे येत असल्याचे उत्तर अनेक वेळा दिले आहे. पनवेलच्या पुढे असलेल्या कर्नाळा अभयारण्याची अडचण येत असल्यामुळे रस्त्याचे चौपदरीकरण होत नाही. या बाबतीत आरटीओ विभागाकडून काहीही कारवाई होत नाही. त्याचप्रमाणे ड्रंकन ड्रायव्हरचा मोठा गंभीर प्रश्न आहे, ट्रक चालक दारु पिऊन ट्रक चालवितात. ट्रकच्या पाठीमागे बॅक लाईट नसतात ज्याला आपण ब्रेक लाईट किंवा स्पार्क लाईट म्हणतो असे लाईट चालू नसतात. अशाप्रकारे अंधारामध्ये आपली वाहने उभी करुन निघून जातात. रस्त्यामध्ये वाहने नादुरुस्त होतात. लोक वेगमर्यादा पाळीत नाही. वाहन चालकांनी वेगमर्यादा पालनासाठी कोणतेही नियम नाहीत. याकरिता आरटीओने नियम कडक करण्याची आवश्यकता आहे. माननीय न्यायालयाने रस्ते विकास महामंडळाला सांगितले आहे की, प्रति 50 किलोमीटरवर एक रुग्णवाहिका ठेवली पाहिजे, अत्यावश्यक रुग्ण सेवा केंद्र असले पाहिजे.

डॉ. दीपक सावंत....

सभापती महोदय, आपण आणि या सभागृहामधील प्रत्येक सन्माननीय सदस्य या महामार्गावरुन गेले असतील. आपण पाहिले असेल की त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची व्यवस्था नाही. गेल्या काही वर्षामध्ये ही व्यवस्था आपण तातडीने उपलब्ध करणे आवश्यक होते. राज्य शासनाने अशी घोषणा अद्ययावत वैद्यकीय उपकरणांनी सुसज्ज अशा 950 रुग्णवाहिका आपण खरेदी करणार आहात. येत्या काही महिन्यात 300 रुग्णवाहिका राष्ट्रीय व राज्य महामार्गावर दाखल होणार आहेत. माझ्या या ठरावाचा मूळ गाभा असा आहे् की, रस्त्यांवर अपघात झाल्यानंतर जखमी माणसे काही तास रस्त्यावर पडून असतात. अपघाताचा पंचनामा झाल्याशिवाय कुणीही त्यांना दवाखान्यात हलवायचे नाही असा गृह खात्याचा नियम आहे. पेशंट मेला तरी चालेल, रक्तस्त्राव झाला तरी चालेल, त्याला रक्त नाही मिळाले तरी चालेल परंतु अगोदर अपघाताचा पंचनामा झाला पाहिजे....

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. रस्त्यावरील अपघातामध्ये जखमी झालेल्या रुग्णाला पंचनामा झाल्याशिवाय दवाखान्यात नेऊ नये अशी कोणत्याही कायद्यात तरतूद नाही. माननीय सदस्यांचा या बाबतीत गैरसमज झाला आहे. असे कोणत्याही क्रिमिनल प्रोसिजरमध्ये लिहिलेले नाही.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, क्रिमीनल प्रोसीजरमध्ये असे कुठेही म्हटलेले नसले तरी ज्यावेळी अशा प्रकारच्या पेशंटना हॉस्पिटल मध्ये किंवा पी.एच.सी.मध्ये किंवा रुरल हॉस्पिटलमध्ये घेऊन जातात, तेव्हा तेथील डॉक्टर पेशंटवर ट्रिटमेंट सुरु करीत नाही.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, त्यावेळी हॉस्पिटलमध्ये एम.एल.सी.करण्याची सूचना दिली जाते. याचा अर्थ तेथे ट्रिटमेंट दिली जात नाही असे नव्हे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांना सांगू इच्छितो की, अनेक वेळा असे होते की, एखाद्या वेळी अपघात झाला तर बहुतांशी लोक मृत्युमुखी पडतात आणि एखाद-दुसरा माणूस जखमी झालेला असतो.त्यावेळी जर त्या माणसाला काही मिनिटामध्ये ट्रिटमेंट मिळाली तर त्याचे अपंगत्व टळू शकते. तसेच जर त्यावेळी ॲम्ब्युलन्स् वेळेवर मिळाली तर पेशंट दवाखान्यामध्ये जाऊ शकतो. पण अपघात झाल्यानंतर बऱ्याच वेळेला पेशंट रस्त्यावर पडून असतो आणि त्या रस्त्यावरुन जाणारी माणसे त्याला हात लावावयास तयार नसतात कारण नंतर कोर्टामध्ये कोण जाणार असा प्रश्न असतो. त्यामुळे याबाबतीत कुठेतरी आपला कायदा आड येतो हे मला सांगावयाचे आहे. त्यामुळे अपघातामध्ये सापडलेल्या लोकांना वेळेवर ट्रिटमेंट मिळत नाही अशी स्थिती आहे.

सभापती महोदय, मी या ठरावामध्ये असे म्हटलेले आहे की, "द्रूतगती मार्गावर शासनाने सुसज्ज ट्रॉमा केअर सेंटर सुरु करावे" तशा प्रकारचे सुसज्ज असे ट्रॉमा केअर सेंटर राज्य शासन उघडणार आहे काय? आज पी.एच.सी.मध्ये डॉक्टर नाहीत, रुरल हॉस्पिटलमध्ये, सिव्हील हॉस्पिटलमध्ये डॉक्टर नाहीत अशी राज्यातील परिस्थिती आहे.गेल्या काही दिवसापूर्वी नर्सेस संपावर गेल्या होत्या. आज रुग्णालयामध्ये एक्स-रे मशीन असेल तर सी.टी.स्कॅन मशीन नाही आणि सी.टी.स्कॅन मशीन असेल तर एम.आर.आय.मशीन नाही आणि या सगळया सुविधा असल्या तर तेथे टेक्नीशिअन नाही अशी स्थिती आहे. जर या राज्याची अशी परिस्थिती असेल तर रुग्णाला चांगली ट्रिटमेंट कशी मिळणार आणि तो बरा कसा होणार हा प्रश्न आहे. शासनाने ट्रॉमा केअर सेंटर उघडण्याच्या मागील माझी भूमिका एवढीच आहे की, एखादा अपघात झाल्यानंतर पहिल्या 15 मिनिटांमध्ये, 20 मिनिटांमध्ये, 1 तासामध्ये तो पेशंट हॉस्पिटलमध्ये जावयास पाहिजे. एक तास हा अतिशय महत्वाचा असतो. पण प्रत्यक्षात एक तासामध्ये पेशंट हॉस्पिटलपर्यंत जाऊ शकत नाही. आपल्या कडील ॲम्ब्युलन्स्मध्ये ड्रायव्हर असला तर फक्त स्ट्रेचर असते.ती ॲम्ब्युलन्स् सुसज्ज नसते. आता मी जे वाचून दाखविले, त्याप्रमाणे 950 पैकी 300 ॲम्ब्युलन्स रस्त्यावर येणार आहेत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

काय हे मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो. कारण ही आजची पेपरमध्ये आलेली बातमी आहे, त्यामुळे त्याची ऑथेन्टीसिटी जात आहे. जर आपल्याकडे एवढ्या ॲम्ब्युलन्स् आल्या तर सुसज्ज ॲम्ब्युलन्स् मध्ये कोणत्या प्रकारची यंत्रसामुग्री ठेवण्यात येणार आहे? आपण त्याच्या मध्ये ट्रान्सपोर्ट व्हेन्टीलेटर ठेवणार आहात की ऑक्सीजन ठेवणार आहात की आणखी काही साधनसामुग्री ठेवणार आहात हे देखील स्पष्ट होणे आवश्यक आहे. कारण याठिकाणी बातमी फार मोघम स्वरुपात देण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, आज विदेशामध्ये अशा प्रकारचा पेशंट कशाप्रकारे हॅण्डल केला जातो हे माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री.सुरेश शेट्टीसाहेबांना चांगले माहिती आहे. याबाबतीत त्यांचे ज्ञान अतिशय चांगले असणारच याबद्दल माझ्या मनामध्ये शंका नाही. ते माझे चांगले मित्र आहेत. जर एखाद्या पेशंटला हेड इन्ज्युरी असेल किंवा नेक इन्ज्युरी असेल किंवा स्पायनल इन्ज्युरी असेल तर त्याला ठराविक पध्दतीने हॅण्डल करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी स्ट्रेचर तशाच प्रकारचे पाहिजे. आपल्याकडे असते त्याप्रमाणे फळकूटाचे स्ट्रेचर नको. यासाठी तेथे जे वॉर्ड बॉय असतील किंवा स्ट्रेचर हॅण्डल करणारे असतील किंवा जे क्लिनर असतील तर त्यांना पेशंटना हॅण्डल करण्याचे ट्रेनिंग दिले पाहिजे.कारण एखाद्या पेशंटला स्पायनल इन्ज्युरी झाल्यानंतर त्याप्रमाणे हॅण्डल केले नाही तर त्याला अपंगत्व येण्याची 100 टक्के शक्यता असते.ज्यावेळी आपण ट्रॉमा ॲम्ब्युलन्सेस निर्माण करणार आहात, त्यावेळी आपल्याकडे अशा प्रकारचा ट्रेण्ड स्टाफ असणार आहे काय ? ट्रॉमा केअर सेंटर सर्व रस्त्यांवर असणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, या ट्रॉमा केअर सेंटरमध्ये काय-काय असावयास पाहिजे तर यामध्ये ऑर्थोपेडीक सर्जन पाहिजे, जनरल सर्जन पाहिजे, ॲनेस्थेटीस्ट पाहिजे, सुसज्ज ओ.टी.असले पाहिजे. ज्याच्यामध्ये सी-आम असेल, व्हेन्टीलेटर असेल आणि एवढेच नव्हेतर रक्त देण्यासाठी रक्तपेढी असली पाहिजे.पण आपल्याकडे एवढे चांगले ट्रॉमा सेंटर उभे करणे मला हे सर्व स्वप्नवत वाटते.कारण आपल्याकडील पी.एच.सी., सिव्हील हॉस्पिटल, रुरल हॉस्पिटलमधील परिस्थिती पाहिल्यानंतर ते सगळे स्वप्नवत वाटते. विदेशामध्ये अशा प्रकारच्या सुसज्ज ॲम्ब्युलन्सेस आहेत. आपल्याकडे फक्त आय.सी.सी.यु.ऑन व्हील्स् असे म्हटले जाते, पण त्या ॲम्ब्युलन्समध्ये काय असते याची पुन्हा एकदा तपासणी करण्याची आवयश्यकता आहे. आपण ॲम्ब्युलन्सला परवानगी देतो पण त्यामध्ये खरोखरच आय.सी.सी.यु.ऑन व्हील असे लिहिल्याप्रमाणे पॅरा-मेडिकल स्टाफ



APR/ 14:40

असतो काय? तेथे डॉक्टर असतो काय, ऑक्सीजन असतो काय, व्हेन्टीलेटर असते काय, मॉनिटर असतो काय हे आपण कधीच पहात नाही. फक्त ती ॲम्ब्युलन्स वेगवेगळया प्रकारचे हॉर्न वाजवत जाते आणि आपण त्यांना रस्ता करुन देतो. बऱ्याच वेळेला ॲम्ब्युलन्समध्ये पेशंट देखील नसतो. पॅसेंजर असतात आणि ज्यावेळी आपल्यासारखा एखादा आमदार त्यांना विचारतो की, खरोखरच इमर्जन्सी आहे काय ? तर असे सांगितले जाते की, होय, पेशंटला घ्यावयास जात असल्याने हॉर्न वाजवत आहे. त्यामुळे ॲम्ब्युलन्स्च्या कोडवर देखील विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, प्रमुख रस्त्यांवर जे अपघात होतात त्याठिकाणी राज्य शासनाने ट्रॉमा केअर सेंटर उघडणे आवश्यक आहे. आपण राज्यात झालेले बॉम्ब ब्लास्टच्या घटना हॅण्डल करतो,आपले डॉक्टर चांगले आहेत. सगळे चांगले आहे पण त्यांना उपकरणांच्या दृष्टीने जी रसद लागते तीच नसते. त्यामुळे त्यांचे हात बांधलेले असतात. तुम्ही त्यांना लिहून देऊ शकत नाही की, तुमचा पेशंट आजारी असल्याने अमुक-अमुक इंजेक्शन बाहेरुन घेऊन ये. जर सुसज्ज असे ट्रॉमा सेंटर सुरु केले तर त्यामध्ये ही बाब देखील आली. अशा सर्व गोष्टी होणे हे आश्वासन मला या शासनाकडून अपेक्षित आहेत. माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये राज्यामध्ये अशा प्रकारची चार किंवा पाच ट्रॉमा सेंटर प्रायोगिक तत्वावर बांधण्यात यावीत अशी माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री.सुरेश शेट्टीसाहेबांना माझी विनंती आहे. त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला सांगावे कारण ते आपल्याला नेहमी मदत करण्यास तयार असतात. अजूनपर्यंत सार्वजनिक आरोग्य भवनाचा प्रश्न सुटलेला नाही. अजूनही तेथे पाणी गळतच आहे.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदया श्रीमती विमल मुंदडा सार्वजनिक आरोग्य मंत्री असताना, सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळसाहेबांनी जबाबदारी घेतली होती आणि असे सांगितले होते की, "डॉ.दीपक सावंत, त्यांनी केले नाही तर सार्वजनिक आरोग्य भवनामध्ये होत असलेली पाण्याची गळती मी बंद करीन." पण दुर्दैवाने अजूनपर्यंत याबाबतीत काहीही झालेले नाही, तेथे गळती होतच आहे. म्हणून मी सांगितले की, आपल्याला याबाबत माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री मदत करतील. तसेच येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये अशा प्रकारची घोषणा किंवा यासाठी विशिष्ट निधी राखून ठेऊन निदान मुंबई-पुणे रस्ता, मुंबई-नाशिक, शिर्डी-नाशिक रस्ता आणि धुळे रस्ता आणि मुंबई-गोवा रस्ता ज्याठिकाणी सगळयात जास्त अपघात घडतात, त्याठिकाणी सुसज्ज असे ट्रॉमा केअर सेंटर बांधावे. सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री

श्री.सुरेश शेट्टी हे माझे मित्र असल्यामुळे मला त्यांच्याकडून फार अपेक्षा आहेत. त्यामुळे त्यांनी याकडे जास्तीतजास्त लक्ष ्द्यावे. तसेच 950 सुसज्ज ॲम्ब्युलन्स कशा प्रकारच्या असणार आहेत याचे देखील त्यांनी विवेचन करावे. याठिकाणी मी जो ठराव मांडत आहे, त्याबाबत सकारात्मक उत्तर मिळाले तरच मी हा ठराव मागे घेईन. धन्यवाद.

ठराव प्रस्तुत झाला.

यानंतर कु.थोरात . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ( सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्य मंत्री ) : सभापती महोदय, एक महत्वाचा ठराव सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. अपधाताचा रेश्यो वाढलेला आहे अशा प्रकारचा मुद्दा त्यांनी उपस्थित केलेला आहे, त्याबद्दल दुमत नाही. ॲक्सिडेन्ट मोठया प्रमाणात वाढलेले आहेत असे आपल्याला दिसून येते. ॲक्सिडेन्ट प्रिव्हेंट झ ाले पाहिजेत, ॲक्सिडेंन्ट झाल्यानंतर लागणाऱ्या सुविधा शासनाने उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत या संदर्भात त्यांनी त्यांच्या प्रस्तावात मुंबई-गोवा मार्ग, नाशिक-शिर्डी, पुणे-कोल्हापूर व नाशिक-धुळे या सारख्या रस्त्यावर ट्रॉमा केअर युनिट्स सुरु करण्यात यावेत अशी मागणी केलेली आहे. या रस्त्यावर काही ठिकाणी ट्रॉमा केअर युनिट्स आहेत. या राज्यामध्ये 67 ठिकाणी ट्रॉमा केअर युनिट्स स्थापन करण्याचे शासनाने ठरविलेले आहे. त्यापैकी काही ठिकाणी ते स्थापन करण्यात आलेले आहेत. त्यापैकी जिल्हा रुग्णालयामध्ये 23, ग्रामीण रुग्णालयामध्ये 4, 100 खाटांच्या उप जिल्हा रुग्णालयामध्ये 6, 50 खाटांच्या उप जिल्हा रुग्णालयात 11, आणखी ग्रामीण रुग्णालयात 21 आणि इतर ठिकाणी 2 अशा प्रकारे एकूण 67 रुग्णालयामध्ये हे ट्रॉमा केअर युनिट्स स्थापन करण्यात येणार आहेत. या ट्रॉमा केअर युनिट्समध्ये 12 पदे असणार आहेत. त्यापैकी एक ऑर्थोपेडिशन, 2 ॲनेस्थेटिस्ट, 2 मेडिकल ऑफिसर, पॅरा मेडिकल वगैरे अशी 12 पदे असणार आहेत. या 67 पैकी 25 ठिकाणचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. 26 ट्रॉमा केअर युनिटचे बांधकाम चालू आहे आणि प्लॅन एस्टिमेटच्या स्थरावर 16 बांधकामे आहेत.

डॉ. दीपक सावंत : आज किती ट्रॉमा केअर युनिट्स अस्तित्वात आहेत.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, संपूर्ण कार्यान्वीत झालेले 22 टॉमा केअर युनिट्स आहेत. ज्या महामार्गावर अपघाताचे प्रमाण जास्त आहे आणि ज्या रस्त्यांचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे त्या ठिकाणी सुध्दा केंद्र शासनाच्या मदतीने 6 ठिकाणी ट्रॉमा केअर युनिट्स स्थापन केलेले आहेत. नवी मुंबई येथे महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये ट्रॉमा केअर युनिट कार्यान्वित झालेले आहे. त्यासाठी 3.69 कोटी रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे. ससून रुग्णालय, पुणे येथील ट्रॉमा केअर युनिटचे बांधकाम पूर्ण झाले असून 80 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे तसेच इक्विपमेंट्ससाठी केंद्र शासनाकडे अनुदानाची मागणी करण्यात आली आहे. सीपीआर कोल्हापूर येथील टॉमा केअर युनिटचे बांधकाम पूर्ण

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान. .

झालेले असून 80 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून इक्विपमेंटस्साठी केंद्र शासनाकडे मागणी करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालय सातारा येथील बांधकाम अंतिम टप्प्यामध्ये असून त्यासाठी 65 लाख रुपये अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. उप जिल्हा रुग्णालय, हिंगणघाट, वर्धा आणि उप जिल्हा रुग्णालय, डहाणू, जिल्हा ठाणे येथील ट्रॉमा केअर युनिट्सचे बांधकाम तीन महिन्यात पूर्ण होईल अशा प्रकारची परिस्थिती आहे. यासाठी 65 लाख रुपये अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी ज्या महामार्गांचा उल्लेख केलेला आहे. त्यापैकी मुंबई-गोवा महामार्गावर पनवेल, महाड, कंबळणी, संगमेश्वर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या ठिकाणी नाशिक-शिर्डी महामार्गावर नाशिक येथे, पुणे-कोल्हापूर महामार्गावर पुणे, सातारा कोल्हापूर आणि नाशिक-धुळे महामार्गावर नाशिक आणि चांदवड या ठिकाणी केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या ट्रॉमा केअर युनिटची सुविधा निर्माण करण्यात आलेली आहे किंवा ती प्रगतीपथावर आहे.

सभापती महोदय, इमर्जन्सी मेडिकल रिस्पॉन्स सर्व्हिसेस ही शासनाची महत्वाकांक्षी आणि खूप चांगली अशी योजना आहे, या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी घोषणा केली होती. तिचा सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. सन्माननीय सदस्यांच्या सर्व प्रश्नांचे निवारण इमर्जन्सी मेडिकल रिस्पॉन्स सर्व्हिसेसच्या माध्यमातून होईल असे मला वाटते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे फर्स्ट अवर, गोल्डन अवर महत्वाचा असतो आणि या गोल्डन अवरमध्येच सुविधा निर्माण करण्यात आपण यशस्वी ठरलो तर खूप जीवांना वाचविण्यामध्ये आपण यशस्वी ठरु शकतो. सन्माननीय सदस्यांनी अपघातातील मृत्यूची संख्या सांगितलेली आहे. त्यांना वाचविण्यासाठी याचा फार मोठया प्रमाणात लाभ होणार आहे.

सभापती महोदय, इमर्जन्सी मेडिकल सर्व्हिसेसच्या अँब्युलन्समध्ये काय सुविधा असणार आहेत असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आला आहे. अशा एकूण 937 ॲब्युलन्स असणार आहेत. जगामध्ये सर्वात मोठी अशी ही सर्व्हिस असणार आहे. यामध्ये दोन प्रकारच्या अँब्युलन्स असणार आहेत. एका अँब्युलन्समध्ये ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट देण्यात येणार आहे तो 30 टक्के असणार आहे आणि 70 टक्के बेसिक लाईफ सपोर्ट असणार आहे. यामध्ये ऑक्सिजन देण्याची सोय ई.सी.जी.मशीन, व्हेंन्टीलेटर्स, डी-फेब्रिलेटर्स, पल्स ऑक्सिलेटर या पध्दतीची जी अत्यावश्यक

..3..



SMT/ 14:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सोय आहे ती असणार आहे. अतिशय मॉर्डनाईझ पध्दतीच्या हया अँब्युलन्स असणार आहेत. या अँब्युलन्समध्ये कोलॅप्सेबल कॉट असणार आहेत. स्पाईन इन्जुरीचा पेशंट असेल तर त्याला लिफ्ट करण्याच्या दृष्टीने कोलॅप्सेबल कॉट असणार आहे. या अँब्युलन्सचा ड्रायव्हर ट्रेंड असणार आहे. या अँब्युलन्समध्ये पॅरा-मेडिकल डॉक्टर्स असणार आहेत. प्रत्येक अँब्युलन्समध्ये एक आयुर्वेदिक डॉक्टर असणार आहे आणि त्यांचे ट्रेनिंग व्यवस्थित पध्दतीने करण्यात येणार आहे.

सभापती महोदय, यासाठी एम्सला टेक्निकल कन्सल्टन्सी दिलेली आहे. या सर्व्हीसच्या माध्यमातून रोड अपघात झाला असेल, नैसर्गिक आपत्ती निर्माण झाली असेल, एपेडेमिक्स झाले असेल, सीरीयस इलनेस असेल, प्रेग्नसी, निओ-नेटल केअर असेल तर त्यांच्यासाठी ही सर्व्हिस उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. ती फ्री ऑफ कॉस्ट असणार आहे. अतिशय ॲडव्हान्स पध्दतीने पुण्यामध्ये एक कंट्रोल रुम असणार आहे. जर कोणी फोन केला तर तो फोन कंट्रोल रुममध्ये जाईल. त्यासाठी टोल फ्री नंबर जाहीर करण्यात येणार आहे. कंट्रोलरुमवरुन जे जवळचे सेंटर असेल तिकडे तातडीने संपर्क साधण्यात येईल आणि तातडीने ज्या जवळच्या रुग्णालयात किंवा संस्थेमध्ये ही सुविधा निर्माण करण्यात आली असेल त्या रुग्णालयात किंवा संस्थेमध्ये रुग्णाला पंधरा ते वीस मिनिटात पोहचता येईल, या पध्दतीची ही योजना आहे. या पध्दतीमध्ये कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी इन्टिग्रेशनचा वापर करण्यात येणार आहे. यामध्ये व्हाईस लॉगर सिस्टिम आहे. जीआयएस म्हणजे जिओग्रॉफिक इन्फॉर्मेशन सिस्टिमचा यामध्ये वापर करण्यात येणार आहे. जिओग्रॉफिक पोझिशन सिस्टिम म्हणजे जीपीएसचा वापर करण्यात येणार आहे. एव्हीएलटी म्हणजे ॲटोमॅटिक व्हेईकल लोकेटड सिस्टिम आहे आणि मोबाईल कम्युनिकेशन सिस्टिम आहे. या पध्दतीने अती अद्ययावत, सर्व संगणकीकृत अशी व्यवस्था निर्माण करण्यात येणार आहे. जेणेकरुन रुग्णाला वेळेवर मदत मिळेल आणि रुग्ण जास्तीत जास्त एका तासात रुग्णालयात पोहचेल. मला वाटते हे एक मोठे क्रांतीकारी पाऊल आहे. आरोग्य विभागाच्या माध्यमातून इतके मोठे काम होत आहे. ट्रॅामाचा रुग्ण असो किंवा कोणताही सिरिअस रुग्ण असो त्याच्यासाठी ही सुविधा मोठया प्रमाणात फायदेशीर ठरणार आहे. त्या संबंधीची टेंडर प्रोसेस सुरु झालेली आहे.

यानंतर श्री. बरवड....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान.....

टेक्निकल बिट झालेली आहे. फायनान्शियल बिटसाठी आता जात आहोत आणि ते सुध्दा होणार आहे आणि मार्च, 2012 मध्ये आपण हे प्रोजेक्ट रोडवर आणण्याचे ठरविले आहे.

सभापती महोदय, ह्युमन रिसोर्स असो, त्यांचे ट्रेनिंग असो किंवा या पध्दतीच्या सर्व सुविधा असो, ॲम्ब्युलन्सेसची खरेदी असो किंवा एमआरआय ॲम्ब्युलन्समध्ये असणारी इक्विपमेंट्स असो, या सर्व गोष्टींचे काळजीपूर्वक प्लॅनिंग करण्यात आलेले आहे. मॅन पावर, मेडिसिन, इक्विपमेंट्स, कॉल सेंटर्स, त्यांचे मेन्टेनन्स, त्याचे जनरल मॉनिटरींग, त्यावर रिकरींग पध्दतीचा होणारा खर्च या सर्व पध्दतीचे प्लॅनिंग यामध्ये करण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो अतिशय योग्य आणि अतिशय महत्वाचा आहे. कारण आपण आपल्या भाषणामध्ये लोकांची जी मोठी संख्या सांगितली ती पाहता. हे खरे आहे की, एवढ्या मोठ्या प्रमाणावर जर अपघात होत असतील तर शासनाने सुध्दा त्या प्रमाणातच रिस्पॉन्स दिला पाहिजे. त्या पध्दतीनेच या सर्व प्रश्नाच्या बाबतीत शासनाचा रिस्पॉन्स आहे, एवढेच मला सांगावयाचे आहे. It is not an easy thing to become the world's largest ambulance service provider. शासनाने खूप डिटर्माइन्ड पध्दतीने हे केलेले आहे. असे म्हटले जाते की, "The decision achieves nothing but determination achieves everything." त्यामुळे शासन डिटर्माइन्ड आहे. ही सुविधा निर्माण करण्यासाठी शासनाने खूप मेहनत घेतलेली आहे. शासनाने प्लॅनिंग केलेले आहे आणि हा प्रोजेक्ट आता रोडवर येण्याची वेळ आलेली आहे. त्यामुळे आपण ठराव ज्या पध्दतीने व ज्या उद्देशाने मांडलेला आहे त्या उद्देशाला शासन रिस्पॉन्स देत आहे. एवढेच मला सांगावयाचे आहे.

सन्माननीय सदस्यांनी ट्रॉमा केयर सेंटरचे अधिक आधुनिकीकरण करण्याच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केलेला आहे. Let us go one at a time. आपण जो मुद्दा उपस्थित केला तो शासनाच्या विचाराधीन आहे म्हणजे शासन त्यावर विचार करीत आहे. आम्ही गप्प बसलेलो आहोत असे नाही. जे जे अतिशय आवश्यक आहे ते शासनाकडून होईल एवढेच सांगते आणि मी

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

प्रा. फौजिया खान ....

सन्माननीय सदस्यांना विनंती करते की, आपण हा ठराव मागे घ्यावा. कारण शासन याबद्दल जे काही पाहिजे आहे, जे काही आवश्यक आहे ते करीत आहे.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी अत्यंत महत्वाकांक्षी अशा स्वरुपाच्या प्रोजेक्टची माहिती या सभागृहाला दिली आणि त्या प्रोजेक्टची अंमलबजावणी करण्यासाठी असलेले डिटर्मिनेशनही त्यांनी या ठिकाणी बोलून दाखविले. माझी शंका फक्त एकच आहे. अनेक वेळेला अनेक प्रोजेक्ट्स आपण सुरु करतो. विशेषत: मला आठवते की, मुंबईमध्ये गोल्डन अवर प्रोजेक्ट नावाचा एक ॲम्ब्युलन्स सर्व्हिसेसचा प्रोजेक्ट चालू केला गेला होता. 101 ॲम्ब्युलन्स त्या ठिकाणी घेतल्या गेल्या होत्या. त्या वायरलेसने जोडल्या गेल्या होत्या. परंतु कालांतराने त्या ॲम्ब्युलन्सचे मेन्टेनन्स किंवा इतर ज्या काही गोष्टी व्हाव्या लागतात आणि तो प्रोजेक्ट सस्टेन करावा लागतो तो प्रोजेक्ट सस्टेन होत नाही. हा सरकारी प्रोजेक्ट असल्यामुळे कदाचित त्या सर्व गोष्टीचा विचार आपण या निमित्ताने केला असेल. अनेक वेळेला आपण अनेक उपकरणांची खरेदी करतो, ती उपरकणे शासनाच्या हॉस्पिटल्समध्ये असतात. आपण ॲम्ब्युलंस खरेदी करतो परंतु त्यासाठी लागणारा जो काही कर्मचारीवर्ग आहे त्याचे प्लॅनिंग केल्याचे आपण सांगितले. परंतु या कर्मचारीवर्गासाठी वित्त विभागाची मंजुरी लागते. त्यामुळे हा जो काही कर्मचारी या सर्व स्किमसाठी लागणार आहे त्यासाठीची शासनाची मंजुरी मिळालेली आहे का आणि त्यांना एम्प्लॉय करण्यासाठी आपण काही पावले उचलली आहेत की, दुसऱ्या विभागातून यासाठी कर्मचारीवर्ग घेणार आहात ? दुसरी गोष्ट अशी की, हा संपूर्ण प्रोजेक्ट मॉडेल प्रोजेक्ट म्हणून आपण संपूर्ण देशामध्ये राबवित आहोत. या प्रोजेक्टचे यश निर्धारित करण्यासाठी येणाऱ्या पुढील अडचणींची चर्चा करुन त्यासाठी उपाययोजनेचा प्लॅन शासनाने तयार केला आहे का ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी माझा प्रश्न विचारतो आणि नंतर दोन्ही प्रश्नांची एकत्रित उत्तरे माननीय मंत्री महोदयांनी द्यावीत अशी विनंती करतो. सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांचे उत्तर ऐकल्यानंतर मी स्वप्नात आहे की काय असे मला वाटले. इतके सुंदर उत्तर त्यांनी दिले. Hats-off to you Madam. इतके चांगले उत्तर दिले की, या राज्यामध्ये खरोखरच सगळ्यांना चांगले दिवस येणार असे मला वाटले.. खरोखरच त्यांचा जो प्रोजेक्ट आहे तो कागदावर अतिशय सुंदर आहे. माननीय मंत्री महोदय श्री. सुरेश शेट्टी साहेबांची कल्पनाशक्ती सुध्दा खूप छान आहे, याबद्दल माझे काही दुमत नाही. पण मंत्री महोदयांनी माहिती देताना जी सगळी इक्विपमेंट्स सांगितली ती सगळी इक्विपमेंट्स आय.सी.सी.यू. ऑन व्हील्सची आहेत. कार्डियाक युनिटची ती इक्विपमेंट्स आहेत. माझा बेसिक शब्द ट्रॉमा केयर आहे. ट्रॉमा केयरमध्ये इंज्युरी झाल्यानंतर जे काही लागते त्यातील व्हेंटिलेटर सोडले तर बाकी दुसरे कोणतेही इक्विपमेंट नाही. 67 प्रस्तावित आहेत आणि त्यातील 22 कार्यान्वित आहेत. अशा प्रकारची माहिती त्यांनी दिली.

मी साधे उदाहरण देतो. आम्ही खूप भांडून भांडून कणकवली येथे ट्रॉमा केयर युनिट केले. कणकवलीला खूप मोठे ट्रॉमा केयर युनिट केले. त्याचे उद्‌घाटन माननीय मंत्री महोदयांनी केले. पण त्या ठिकाणी कोणीच नाही. त्या ठिकाणी व्हेंटिलेटर सुध्दा नाही. या सगळ्या ट्रॉमा केयर युनिटच्या ज्या साईट्स सांगितल्या ते सर्व सिव्हिल हॉस्पिटलमध्ये केलेले आहे. माझ्या प्रश्नाचा उद्देश तो नव्हता. मला हे अपेक्षित होते की, जशी परदेशामध्ये हायवेवर ट्रॉमा केयर युनिट असतात तसे युनिट करावे. म्हणून मी उदाहरणादाखल वडखळ नाक्याबाबत सांगितले. कणकवलीला अपघात झाला तर आपला पेशन्ट एक तासामध्ये कोल्हापूरला पोहचू शकणार नाही. त्याला पोहोचण्यास घाटातून जावयाचे असले तरी अडीच तास लागतात. सिन्नरला अपघात झाला तर आपला पेशन्ट एका तासात नाशिकला पोहोचणार नाही. धुळ्याला अपघात झाला किंवा नाशिकला अपघात झाला तर पेशन्ट चांदवडला पोहचू शकणार नाही. माननीय मंत्री महोदयांनी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये तयार केलेल्या वॉर्ड विषयी माहिती सांगितली. ट्रॉमा केयर सेंटर ही बेसिक संकल्पना यामध्ये कोठेही ध्वनित झालेली दिसली नाही.

तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे या ठिकाणी असे सांगण्यात आले की, आम्ही स्टाफ निर्माण



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

करणार. आपल्या या 350 ॲम्ब्युलन्सेस कधी कार्यान्वित होणार आहेत याची नेमकी तारीख सांगावी. आम्ही हे प्रस्ताव किंवा ठराव कशासाठी आणतो ? ठराव आणण्यामागे एकच कारण असते की शासनाने त्याचा पाठपुरावा करावा. शासनाने त्याचा पाठपुरावा केला तरच आम्ही ठराव मागे घेतो. त्यांनी आम्हाला जे सगळे सांगितले ते खूप सुंदर सांगितले. सर्व हायफाय सांगितले. मोबाईल कनेक्शनने जोडणार, इंटरनेटने जोडणार, पुण्यामध्ये सेंटर असणार असे त्यांनी सांगितले. मी आपल्या माहितीसाठी सांगतो की, कोकणामध्ये पेशन्टला ॲडमिट करावयाचे असेल तर पुण्याला कळविणार. हे फिजिबल वाटत नाही. ज्या राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे बरोबर नाहीत, ज्या राज्यातील लोक कुपोषणाने मरत आहेत, ज्या राज्यामध्ये साधे इंजेक्शन बाहेरुन घ्यावे लागतात जे एवढे सर्व करणार का ?

इथे कोठेही रक्तपेढी नाही. आपण मेडिकल क्षेत्रातील नसाल पण आपल्यालाही माहीत आहे की, अपघात झाल्यानंतर रक्तस्त्राव होतो. या ठिकाणी कोठेही ब्लड बँकेचा उल्लेख नाही. त्या बाबत शासन काय करणार आहे ? आज मुंबईमध्ये प्लेटलेट्स मिळत नाहीत, मुंबईमध्ये रक्त मिळत नाही तर रिमोट प्लेसेसला आपण रक्त काढून आणणार ? मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपण मला ठराव मागे घेण्याची विनंती करु नका. आपण या सगळ्या मुद्यांची उत्तरे द्यावीत. जरी काही सन्माननीय सदस्य सत्ताधारी बाकांवर बसले असले तरी त्या प्रत्येकाची अडचण हीच आहे. विरोधी पक्षाच्या सदस्यांची तर ती अडचण असेलच पण सत्ताधारी पक्षातील सदस्यांना आपण सभागृहाच्या बाहेर विचारले तर ते सुध्दा हेच बोलतील. त्यामुळे कृपा करुन आपण या सभागृहाची दिशाभूल करु नका. आपला प्रोजेक्ट हा खूप गोल्डन प्रोजेक्ट आहे पण गोल्डर अवरमध्ये जर तो प्रोजेक्ट कामी आला तर आम्ही आपल्याला नमस्कार करु एवढेच मी सांगू इच्छितो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, आमचे मित्र सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी 2-3 उपप्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनीही एक मुद्दा मांडला आहे. प्रथम मी त्यांच्या मुद्याला उत्तर देतो. सन्माननीय राज्यमंत्र्यांनी गोल्डर अवर प्रोजेक्टबाबत माहिती दिलेली आहे. गोल्डन अवर प्रोजेक्ट मुंबईत खासदार श्री.मुरली देवरा यांनी सुरु केला होता त्यावेळी आम्ही लहान होतो, कॉलेजमध्ये होतो. आपण युथ कॉंग्रेसमध्ये होतो त्यावेळी तो प्रोजेक्ट सुरु झाला आणि केव्हा बंद झाला ते आम्हालाच माहीत नाही. परंतु त्यांनी हा प्रयोग मुंबईत सुरु केला होता. गोल्डर अवर प्रोजेक्टमध्ये क्रिटिकल मोमेंन्टसमध्ये ॲम्ब्यूलन्स घटनास्थळी पोहोचली पाहिजे. अपघाताच्या वेळी लोकांना ॲम्ब्यूलन्स उपलब्ध करुन दिली पाहिजे.

शासन आता ही योजना सुरु करणार आहे त्याबाबत मॅन पॉवरची कोणती व्यवस्था केली जाणार आहे, वित्त विभागाची परवानगी घेतली आहे की नाही, असे विचारण्यात आले आहे. आम्ही कॉंग्रेसचे मंत्री याबाबत अधिक काळजी घेत असतो. वित्त विभागाची अगोदरच मान्यता घेत असतो. इमर्जन्सी रिस्पॉन्स सर्व्हिसचे काम शासनाने हाती घेतले आहे. यासंदभार्त सर्व्हिस प्रोव्हायडर नियुक्त करण्यासाठी टेंडर काढलेले आहे. त्याचे टेक्निकल बीड झालेले आहे, फायनान्शिअल बिड 4-5 दिवसात होऊन जाईल. त्या सर्व्हिस प्रोव्हायडर्सनी ड्रायव्हर्स प्रोव्हाइड करुन दिले पाहिजेत. संपूर्ण देशात महाराष्ट्र एकमेव राज्य आहे. या टेंडरमध्ये अशी अट घातलेली आहे की, कमीत कमी एक बीएएमएस डॉक्टर व अटेंडण्ट प्रत्येक ॲम्ब्यूलन्समध्ये असावयास पाहिजे. त्याचे एक कारण आहे. इमर्जन्सीच्या वेळी घटनास्थळी ॲम्ब्यूलन्स गेली तर किंवा पेशंटच्या घरी गेली तर त्या पेशंटवर लगेच उपचार सुरु झाले पाहिजेत. त्या ॲम्ब्यूलन्समध्ये ऑर्डिनरी अटेंडण्ट असेल तर नियमानुसार तो पेशंटवर उपचार करु शकत नाही. तो क्वालिफाईड असेल तरच करु शकेल. त्यासाठी सभागृहात एक नवीन कायदा आणावा लागला असता. त्यासाठी कदाचित एक वर्षाचा कालावधी लागला असता. म्हणून अटेंडण्टऐवजी आयुर्वेदिक डॉक्टर्सची सेवा घेण्याचा निर्णय घेतला. राज्यामध्ये बीएएमएस डॉक्टर्सची संख्या खूप आहे. त्यामुळे त्यांना या कामासाठी नेमण्याचे ठरविले आहे. संपूर्ण देशात या राज्याने प्रथम हा निर्णय घेतलेला आहे. या डॉक्टर्सचे प्रशिक्षण झ ाालेले असते. पेशंटला सलाईन कसे लावावयाचे, ऑक्सिजन कसे लावावयाचे,

2...

श्री.सुरेश शेट्टी.....

मायनर ट्रिटमेण्ट कशी द्यावयाची, डिलीव्हरी कशी करावयाची हे माहीत असते. त्यासाठी त्यांना या कामासाठी घेणार आहोत. मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की,काल माझ्याकडे एक शिष्टमंडळ आले होते. त्यांनी मला असे म्हटले की, शासन बीएएमएस डॉक्टर्सची सेवा घेणार आहे. मग युनानी डॉक्टर्सना सुध्दा या कामासाठी नेमावे. राज्यातील कॉलेजमध्ये शिक्षण पूर्ण केलेले 20-25 टक्के युनानी डॉक्टर्स आहेत. त्यांना सुध्दा ही संधी देण्यास मी संमती दर्शविली आहे. हे जॉब क्रिएशनचे काम एजन्सीचे असणार आहे. They will be on contract basis with the service provider of the Government of Maharashtra. हे मी स्पष्ट करु इच्छितो.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी असेही म्हटले आहे की, या योजनेची कंट्रोल रुम पुणे येथे असणार आहे. कणकवलीत अपघात झाला तर तेथून पुण्याला फोन करावा लागेल. संपूर्ण महाराष्ट्रात पोलीस कंट्रोल रुमसाठी 100 हा नंबर आहे. जननी शिशु सुरक्षा योजना सुरु केली आहे त्यासाठी 102 हा क्रमांक आहे. आरोग्य खात्याने डॉक्टर्स व पॅरा मेडिकल सेवा उपलब्ध होण्यासाठी आणखी एक नवीन योजना सुरु केली आहे त्यासाठी 104 नंबर आहे. त्याचप्रमाणे संपूर्ण देशामध्ये ॲम्ब्यूलन्स सर्व्हिससाठी 108 नंबर देण्यात आलेला आहे. त्या नंबरसाठी एमटीएनएलच्या माध्यमातून केंद्र सरकारकडे संपर्क साधलेला आहे. तो नंबर प्राप्त झाल्यावर संपूर्ण राज्यातून कोठूनही 108 हा टोल फ्री नंबर फिरविल्यानंतर त्यांचा कॉल प्रथम पुण्यामधील कंट्रोल रुममध्ये येईल. पुणे येथे शासनाने सॉफ्टवेअर निवडलेले आहे. जीपीआरएस मध्ये कॉल येईल. कणकवलीमधून फोन केल्यानंतर कॉल सेंटरमध्ये तो कॉल जाईल. फोन कणकवलीतून आला आहे हे त्यांना तो फोन घेतानाच कळेल. तसेच कणकवलीत आजूबाजूला ॲम्ब्यूलन्स किती आहेत हे त्यांना लगेच कळेल. त्याचबरोबर तो कॉल जेन्यूईन आहे की नाही हे 2-3 सेकंदातच ते आयडेंटीफाय करतील. जेन्यूईन कॉल असल्याचे सिध्द झाल्याबरोबर तो कॉल दुसऱ्या बाजूला कक्षात बसलेल्या डॉक्टर्सकडे ट्रान्सफर होईल. दुसऱ्या कक्षात पोलीस विभागाचे कर्मचारी असतील. अपघाताची केस असेल, नैसर्गिक आपत्तीची केस असेल, क्रिमिनलची केस असेल तर आरोग्य विभाग व पोलीस कंट्रोल रुम या दोघांकडून जॉईन्ट ऑपरेशन केले जाईल.

...3/-



NTK/ MMP

श्री.सुरेश शेट्टी.....

एकाच वेळी पोलीस व्हॅन व ॲम्ब्यूलन्स सुध्दा घटनास्थळी जाण्यासाठी निघेल. कणकवलीतून फोन आल्यानंतर एक तासाने ॲम्ब्यूलन्स जाईल असे होणार नाही. संपूर्ण राज्यासाठी ॲम्ब्यूलन्ससाठी 20 मिनिटांची कालमर्यादा घालून दिलेली आहे. मी माझ्या स्टेटमेण्टमध्ये असे सांगितले होते की, मुंबईत हे शक्य होईल की नाही याबद्दल मला शंका वाटते. मुंबईतील वाहतुकीच्या समस्येमुळे घटनास्थळी 20 मिनिटात ॲम्ब्यूलन्स पोहोचू शकत नाही. अंधेरीमधील ट्रॅफिकमध्ये गाडी अडकली तर 30 मिनिटे तेथेच जातात. हे सर्व प्रश्न सुरुवातीला भेडसावतील. हे प्रश्न आपण सर्वजण सॉर्टआऊट करु.

सन्माननीय राज्यमंत्र्यांनी 3 टाईपच्या स्ट्रेचर्स असतील असे सांगितलेले आहे. स्पायनलची केस असेल, नॅचरल डिझास्टरची केस असेल, ॲक्सिडण्टची केस असेल या केसमधील पेशटस्वर उपचार कसे करावेत याचे ट्रेनिंग दिले जाणार आहे. या डॉक्टर्ससाठी कमीत कमी 1-2 महिन्यांच्या कालावधीचा ट्रेनिंग प्रोग्रॅम चॉकआऊट केलेला आहे. So that they will be able to handle these type of cases. ॲक्सिडण्ट साईटपासून हॉस्पिटलपर्यंत ही सेवा उपलब्ध असेल.

जीवनदायी योजनेतील कार्डस् वाटप करण्याच्या योजनेचा शुभारंभ उद्या अमरावती येथे सुरु करीत आहोत. हॉस्पिटलचे एन्टायटलमेण्ट 8 जिल्ह्यात झालेले आहे. संपूर्ण राज्यात एन्टायटलमेण्ट झाल्यानंतर या ॲम्ब्यूलन्सला जवळच्या हॉस्पिटलची माहिती असेल. तेथे ते घेऊन जातील. जीवनदायी योजनेचे लाभार्थी असतील तर त्यांना मोफतच ट्रिटमेण्ट मिळेल. मग ते शासकीय हॉस्पिटल असो की खाजगी असो. ही सर्व व्यवस्था कोऑर्डिनेशन केल्यानंतरच केलेली आहे. या योजनेंतर्गत 690 ॲम्ब्यूलन्स येणार आहेत त्या केंद्र सरकारच्या निधीतून घेतल्या जाणार आहेत. उर्वरित 247 ॲम्ब्यूलन्ससाठी महाराष्ट्र शासन पैसे देणार आहे. ॲम्ब्यूलन्स इमर्जन्सी स्किम ही केंद्र सरकारची मूळ योजना होती. त्याबाबत शासनाने ग्रामीण भागासोबतच मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद या मेट्रोसिटींबाबत निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी 247 ॲम्ब्यूलन्स लागणार आहेत त्यासाठी राज्य शासन खर्च करणार आहे.

संपूर्ण जगात दुसऱ्या कोणत्याही देशात सन्माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितलेल्या या योजनेसारखी योजना नाही. त्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती आहे. लंडन शहरामध्ये अशी

...4/-



NTK/ MMP

श्री.सुरेश शेट्टी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

योजना आहे, परंतु आपण त्यांच्याही पुढे जाणार आहोत. सन्माननीय सदस्यांनी रिक्रुटमेण्ट व पीएचसीमधील ब्लड बँकबाबतचा उल्लेख केला आहे. प्रत्येक जिल्ह्यात ब्लड बँक सुरु केली जाणार आहे. काही ठिकाणी कम्पोनण्ट इक्विपमेण्टसह ब्लड बँक सुरुही झालेली आहे. प्रत्येक तालुका स्तरावर ब्लड स्टोअरेज युनिट सुरु करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी निधीची तरतूद सुध्दा अगोदरच केलेली आहे. त्यामध्ये फक्त टेक्निशिअन्सचा मुद्दा होता. टेक्निशिअन्स नसतील तर केंद्र सरकारच्या एफडीए आणि राज्याच्या एफडीएकडून परवानगी मिळत नाही.

सन्माननीय सदस्यांनी पीएचसीमधील तज्ज्ञ डॉक्टरांच्या नेमणुकांचा विषय उपस्थित केला होता. इतकी वर्षे आरोग्य खात्यामध्ये तज्ज्ञ डॉक्टर्सच नव्हते. सर्वच तज्ज्ञ डॉक्टरांना जनरल कॅटेगरीमध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमले होते. सर्वांना एकच पगार दिला जात होता. आरोग्य खात्याच्या इतिहासामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांना वैद्यकीय अधिकारी या पदापासून वेगळे केले आहे.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**

नंतर श्री.गिते......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुरेश शेट्टी...

पी.जी.साठी परवाच 850 पदे भरण्याबाबतची जाहिरात वृत्तपत्रात दिलेली आहे. मेडीकल ऑफिसरपेक्षा त्यांना जास्तीच्या दोन वेतनवाढ देण्याचा तसेच स्पेशालिस्ट डॉक्टरांना जास्तीच्या चार वेतनवाढ देण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतलेला आहे. आता कमीत कमी पी.जी. स्टुडण्ट आणि स्पेशालिस्ट आरोग्य खात्यात काम करण्यासाठी पुढे येतील. मेडीकल ऑफिसरचा पगार बघून कोणीही आरोग्य विभागात मेडीकल ऑफिसर म्हणून येण्यास तयार नव्हते. शासनाने अशा प्रकारचा निर्णय पहिल्यांदाच घेतलेला आहे.

रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि नक्षलग्रस्त भाग या ठिकाणी मेडीकल ऑफिसर म्हणून कोणी काम करण्यास जात नाहीत. ही वस्तुस्थिती असून त्याबाबतचे स्टेटमेंट मी सभागृहात देखील केलेले आहे. त्यासाठी पदे भरण्याबाबतची जाहिरात वृत्तपत्रात दिलेली आहे. त्यात नमूद केले आहे की, रत्नागिरी,सिंधुदुर्ग आणि नक्षलग्रस्त भाग आहे, तेथे काम करण्यास जे विलिंगनेस दाखवतील त्यांना मेरीट प्लस 20 मार्कस् अधिकचे दिले जाणार आहेत असाही निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे. क्लास-3 ची टेक्निशियनची पदे आहेत, ती जवळपास 5000 एवढी पदे आहेत. यात सर्व प्रकारच्या टेक्निशियनचा समावेश आहे. टेक्निशियनची पदे भरण्याबाबतची जाहिरात येत्या सोमवारी किंवा मंगळवारी वृत्तपत्रात छापून येणार आहे. 1500 डॉक्टरची पदे भरण्याबाबतची ऑलरेडी जाहिरात काढलेली आहे. 500 डॉक्टरांच्या पदोन्नतीची फाईल सामान्य प्रशासन विभागात प्रलंबित आहे. ती पदोन्नतीची फाईल क्लिअर झाल्यानंतर ती 500 पदे पुन्हा ॲड करुन घेऊ. वर्ग-1, वर्ग-2 आणि वर्ग-3 ची जेवढी रिक्त पदे आहेत, ती पदे भरण्याचा आरोग्य विभाग प्रयत्न करीत आहे. मी पुन्हा सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना विनंती करतो की, त्यांनी त्यांचा अशासकीय ठराव मागे घ्यावा. धन्यवाद.

डॉ.दीपक सावंत : माझा अशासकीय ठराव मागे घेण्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी विनंती केली आहे. त्यांनी या ठिकाणी जी माहिती दिली, ती ऐकल्यानंतर ती स्वप्नवत वाटते आहे. सभापती महोदय, या सभागृहात या विषयाच्या बाबतीत अनेक वेळा आपण देखील चर्चा ऐकलेली आहे. त्यांनी सांगितले की, बी.ए.एम.एस. डॉक्टर्स येणार, युनानी डॉक्टर्स येणार, आरोग्य विभाग त्यांना प्रशिक्षण देणार, त्यानंतर त्यांची रिक्रुटमेंट केली जाईल या गोष्टी मला खरोखरच

2..

डॉ.दीपक सावंत...

स्वप्नवतच वाटत आहेत. शासनाने दुसरा फंडा सुरु केला आहे, तो म्हणजे रत्नागिरी, सिंधुदुर्ग व नक्षलग्रस्त भागात काम करण्यास उत्सुक असलेल्या उमेदवारास 20 मार्कस् वाढवून देण्यात येणार आहेत. एम.बी.बी.एस.नंतर तुम्ही त्यांना मेरीट पेक्षा 20 मार्कस् वाढवून देणार आणि पी.जी.च्या ॲडमिशनसाठी त्यांना तयार करणार...

डॉ.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आम्ही गेल्या वर्षी रिक्रुटमेंट केली होती. त्यावेळी ऑन लाईन लेखी परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला होता. त्याप्रमाणे मेडीकल ऑफिसरच्या पदांसाठी ऑन लाईन लेखी परीक्षा घेतली होती. त्यावेळी व्यक्तिगत मुलाखती घेणे बंद केले होते. या वर्षी मेडीकल ऑफिसरच्या रिक्रुटमेंटसाठी ऑनलाईन परीक्षा घ्यावयाची नाही असा निर्णय घेतला आहे. त्यांचे एम.बी.बी.एस.चे त्यांचे मार्कस् आहेत, त्या मेरीटवर आम्ही उमेदवार निवडणार आहोत. रत्नागिरी,सिंधुदुर्ग व नक्षलग्रस्त विभागात काम करण्यास उत्सुकता दाखविली तर त्या उमेदवारास 20 मार्क जास्तीचे दिले जाणार आहेत.शासनाच्या आरोग्य विभागात मेडीकल ऑफिसर म्हणून कार्यरत आहेत. त्यात काही मेडीकल ऑफिसरांनी सहा महिने काम कंत्राट बेसीसवर केले आहे, काहींनी एक वर्ष कंत्राट बेसीसवर काम केले आहे, त्यांना देखील प्राधान्य देण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतलेला आहे.

डॉ.दीपक सावंत : सदरहू पदे भरण्याबाबत जाहिरात आलेली आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु एक गोष्ट पींच होते. एखादा एम.एस.आर्थोपेडीक आणि एखादा एम.बी.बी.एस. नेमले. एखाद्या एम.बी.बी.एस.ने एम.एस.आर्थोपेडीक सारखी ट्रीटमेंट करावी असे आपल्याला अपेक्षित आहे असे यावरुन ध्वनीत होते. या सगळया रिमोट एरियातील गोष्टी आहेत. एम.बी.बी.एस. झाल्यानंतर आर्थोपेडीकचे शिक्षण घेणारा वेगळा आणि आर्थोपेडीक झाल्या नंतर कन्सल्टींग प्रॅक्टीस करणारा वेगळा असा भेदभाव आपण करता आहात आणि त्या लोकांना पोस्ट एम.बी.बी.एस.डॉक्टर देत आहात. जो ऑर्थोपेडीक करीत असेल किंवा एम.बी.बी.एस.करुन त्यांनी त्या भागात काम करण्याची इच्छा दाखविली असेल त्यांना तेथे नेमणार आहात. यात शासन तज्ज्ञ डॉक्टर ही संकल्पना राबवित नाहीत असे मला स्पष्ट दिसून येत आहे. ही गोष्ट संपूर्ण सभागृहाला माहिती आहे. आपण एम.बी.बी.एस.डॉक्टरकडे गेल्यानंतर कन्सल्टंटकडे जातो. एम.बी.बी.एस.डॉक्टर एखादे ऑपरेशन करतो, परंतु त्यावेळी आर्थोपेडीक सर्जन त्या ठिकाणी उभा असतो. आर्थोपेडीक सर्जनच्या

3...



ABG/ प्रथम श्री.खंदारे 15:20

डॉ.दीपक सावंत..

मार्गदर्शनाखाली एम.बी.बी.एस.डॉक्टर ऑपरेशन करीत असतो. तुम्ही जी सर्व्हीस देत आहात, ती जगातील बेस्ट सर्व्हीस नाही. लार्जेस सर्व्हीस असेल पण बेस्ट सर्व्हीस नाही असे माझे म्हणणे आहे. मेळघाटात 1 लाख, 2 लाख रुपये देऊन डॉक्टर रिक्रूट करण्यात येणार आहेत अशी माहिती आम्हाला माननीय आरोग्य राज्यमंत्री श्रीमती वर्षा गायकवाड यांनी दिली. तशा प्रकारे आपण डॉक्टरांच्या नेमणूका केल्या तर लोकांना त्यांचा जास्त फायदा होईल. मी विरोधासाठी विरोध करावयाचा म्हणून मी बोलत नाही. सामान्य माणसाला फायदा होईल अशा प्रकारचे आरोग्य विभागाने निर्णय घ्यावेत. तसेच जास्तीत जास्त अलाऊन्सेस देऊन त्या विभागांमध्ये तज्ज्ञ डॉक्टर नेमले जावेत, अशी विनंती करतो

श्रीमती फौजिया खान : सजेशन फॉर ॲक्शन.

डॉ.दीपक सावंत : मी जो अशासकीय ठराव मांडला आहे, तो मागे घेण्यासाठी सभागृहाची परवानगी मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

-----------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्री.मोहन जोशी ) : सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांचा ठराव क्रमांक 47 चर्चेसाठी पुढील आठवडयात चर्चेसाठी घेण्यात येईल अशा प्रकारचे निदेश माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी मघाशी दिले आहेत. त्यामुळे सदर ठरावावर पुढील आठवडयात चर्चा घेण्यात येईल.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 19 डिसेंबर, 2011 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 27 मिनिटांनी सोमवार, दिनांक 19 डिसेंबर,2011च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही